# माणूस

शनिवार
२२ एप्रिल १९७२
पन्नास पैसे





कोणत्याही राष्ट्रीय
महाकाव्यातील कथानक
हे घटनांच्या पलीकडील
मूलभूत मानवी अनुभव
व्यक्त करणारे असते...
महाभारताचे मर्म
प्रो० विद्याधर पुंडलिकांनी
ओळखले आहे....
'माता द्रौपदी' हे त्यांचे नाटक
हा मराठी पौराणिक
नाटकाचा नवा मानदंड
मानावा लागेल..

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | २२ एप्रिल १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | सत्तेचाळीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे


**सप्रेम नमस्कार....**

▫ १५ एप्रिलचा भरगच्च अंक वाचला. विषयांची विविधता नजरेत भरली. अशोक चौसाळकरांचा लेख मोठा असूनही वाचनीय वाटला. विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्या लेखावर शांतपणे विचार करावा असे वाटते. ‘60,00,000 Accusers’ या पुस्तकाचा श्री. घोटीकर यांनी करून दिलेला परिचय आवडला. एकाच अंकात आला असता तर बरे झाले असते.

१५ एप्रिल, १९७२ — प्रकाश जाईल, मुंबई

▫ आठ एप्रिलच्या अंकात सुधीर गाडगीळ यांचे पत्र वाचले. चांगल्या योजना महाराष्ट्रात अनेक आहेत. पण फक्त कागदावर. त्यासाठी खटपट करणारे कोणी नाहीत, याचाच विषाद वाटतो.

कोकण रेल्वे केव्हापासून गाजत आहे. कोयना योजनेसाठी झालेले रामायण सर्वांना माहीतच आहे. अशा वेळी आपण तसल्या योजना सविस्तर प्रसिद्ध करून त्या संबधीत लोकांकडे पाठवल्यात (भेट-अंकाच्यारूपाने) तरच अशा योजनांना चालना मिळेल नाहीतर अळवावरचे पाणी !

१३ एप्रिल, १९७२ — राजाराम पो. नेटके, मुंबई


मुखपृष्ठ रचना : देवीदास बागूल

छायाचित्रे : राजदत्त, मुंबई

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५१



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ‘माणूस’ साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

केवळ बिगर काँग्रेसचे सरकार म्हणून
दिल्लीवाले
गोव्याच्या आठ लाख जनतेचे
हाल करण्याचे धोरण
चालूच ठेवतील
तर गोव्यात
काँग्रेसचे नावही
कोणी घेणार नाही....

# मुक्काम : गोवा

**जनार्दनशास्त्री गोरे**

मार्च १३ ची संध्याकळ. राजधानी पणजीतील ब्रागांझ हॉलचा परिसर माणसांनी फुलून गेला होता. मांडवीच्या तीरावर फटाक्यांच्या कर्णकठोर आवाजाने आसमंत दुमदुमत होता. गोवा विधानसभेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर होत होते. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला बहुमत मिळणार हे आता नक्की झाले होते. किती उमेदवार निवडून येतात तेवढेच समजायचे होते. म. गो. पक्षाचे उमेदवार जसजसे निवडून येत तसतसे त्यांचे चहाते त्यांना गुलालाने संपूर्ण स्नान घालीत होते. अखेर सर्व मतमोजणी झाली आणि निर्णय जाहीर झाले—महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष विजयी अठरा. युनायटेड गोवन्स विजयी दहा! दीव व दमणचा निर्णय पूर्वीच जाहीर झाला होता.

म. गो. पक्षाचे अठरा उमेदवार विजयी झाल्याचे जाहीर होताच मांडवीच्या किनाऱ्यावर फटाकड्यांचा ' न भूतो न भविष्यति ' असा कडकडाट होऊ लागला. गुलाल तर एवढा उधळण्यात आला, की त्याला सीमा नव्हती. लोकांच्या उत्साहाला पौर्णिमेचे उधाण आले आणि किमान दहा हजारांहून अधिक लोकांच्या प्रचंड जयघोषात विजयी उमेदवारांची मिरवणूक काढण्यात आली. सायकली, मोटर-

सायकली, टॅक्सीज, खाजगी मोटारी आणि पादचारी यांच्या मध्ये म. गो. पक्षाचे मानचिन्ह 'सिंह' मोठ्या दिमाखाने मिरवत होतें आणि ते अठरा विजयी वीर मोठ्या डौलाने, ठिकठिकाणी जनतेकडून मानसन्मान व हार तुरे स्वीकारीत चालले होते.

महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचा हा विजय, सामान्य विजय नव्हता. सामना मोठा अटीतटीचा होता. म. गो पक्ष विरुद्ध यु. गो. पक्ष हे आम्ही समजू शकतो. कारण हे दोनच पक्ष येथें सुरुवातीपासून आहेत. प्र. स. प., सं. सो. प., कम्युनिस्ट वगैरे पक्ष निवडणुकीच्या वेळी उगवत असत आणि निवडणुका संपताच बेडकांच्या छत्रीप्रमाणे अंतर्धान पावत असत. परंतु यंदा नवकाँग्रेस सारखा देशव्यापी व देश-विजयी पक्ष सामन्यांसाठी खडा होता. १९६३ मध्ये अखिल भारतीय कांग्रेसने—म्हणजे अ. भा. कॉं. च्या गोवा शाखेने—निवडणूक लढविली होती व पराभवाचा जबरदस्त तडाखा खाल्ला होता. कॉंग्रेसच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी अ. भा. कॉंग्रेसच्या नेत्यांना चुकीची माहिती दिल्यामुळे तो तडाखा बसला होता. यावेळीही नवकॉंग्रेसच्या श्रेष्ठींनी, त्याच स्थानिक कार्यकर्त्यांवर विसंबून निवडणुका लढविल्या आणि सर्व उमेदवार पराभूत होण्याइतका जबर तडाखा खाल्ला. १९६३ चे महाभारत घडल्यानंतर कॉंग्रेस श्रेष्ठींनी सत्यासत्याचे परिशीलन करायला हवे होते. स्थानिक नवकॉंग्रेसपक्ष हा जनतेचे प्रतिनिधित्व करीत नाही, तो एक राजकीय व्यवसाय करणारा कंपू आहे. तो जनताभिमुख नाही, स्वार्थी गटबाजीने पोखरलेला आहे हे स्पष्ट असूनही दिल्लीवाल्यांनी डोळ्यांवर झापडे बांधली व स्थानिक नव-कॉंग्रेसच्या बारभाईच्या नाकर्तेपणाकडे डोळेझाक केली. परिणामी १९६३ ची पुनरावृत्ती झाली. किंबहुना त्यापेक्षाही दारुण पराभव पदरी आला. साऱ्या भरत-खंडात नवकॉंग्रेसचा जय होत असताना गोव्याच्या निवडणुकांत झालेला हा दारुण पराभव दिल्लीकरांना धक्का देणारा होता यात शंकाच नाही.

१९६३ च्या पराभवानंतर काही दिवसांनी घडलेले स्थानिक कॉंग्रेसच्या अध्यक्षांचे हृषिकेश-पलायन प्रकरण कॉंग्रेस श्रेष्ठींना ठाऊक असूनही त्यांनी गोवा कॉंग्रेसबद्दल मुळीच विचार केला नाही. १९६७ मध्ये कॉंग्रेसने निवडणुकांत भाग घेतलाच नाही. परंतु 'गोवा ऑर्गनाइझ्ड अलायंस' या नावाचा एक तत्कालिन पक्ष जन्माला आला होता व त्यापक्षाने काही विशिष्ट उमेदवारांना पाठिंबा दिला होता. त्यावेळी सर्वांना समजून चुकले, की ते उमेदवार कॉंग्रेस प्रणीत होते. कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार नव्हते. लेबल 'अपक्षा'चे होते. पण प्रेरणा कॉंग्रेसची होती. अंतस्थ हेतू म. गो. पक्षाचा पाडाव करणे हा होता. परंतु त्यावेळी ही सर्व अपक्ष उमेदवारांना दणकून मार बसला आणि म. गो. पक्ष १६ व यु. गो. पक्ष १२ असे उमेदवार विजयी झाले.

एवढे झाल्यावर तरी कॉंग्रेस श्रेष्ठींनी अंतर्मुख होऊन गोव्याचे लोक खरोखरच

'अजब' आहेत व ते कसे, याचे संशोधन करायला हवे होते. 'अजब है यह गोवाके लोग' ही पंडित नेहरूउक्ती खरी व्हायची होती म्हणून गोव्यातील लोकांकडे काँग्रेस श्रेष्ठींनी दुर्लक्ष केले. १९६७ नंतर अ. भा. काँग्रेसमध्येच अनेक आश्चर्यकारक उत्पात घडून आले. श्रेष्ठींची अंतर्गत भांडणे, स्वार्थ व परस्परांची अवहेलना अशा व्याधींनी अ. भारतीय काँग्रेस पोखरली गेली. राष्ट्रपतींच्या निवडणुकीच्या निमित्ताने अ. भा. काँग्रेसची शकले उडाली. जुने आणि जाणिते श्रेष्ठी एकाकी पडले. जनमानसातील त्यांच्या प्रतिमा डागळल्या आणि ताज्या दमाचे व नव्या तरुण रक्ताचे नेते श्रीमती इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली पुढे सरसावले. नवकाँग्रेस जन्माला आली. केंद्रात जरी नवकाँग्रेसला बहुमत होते तरी काही प्रांतांतून जुन्या अथवा संघटना काँग्रेसची पाठराखी मंत्रिमंडळे होती. त्यांचा नवकाँग्रेसला विरोध होत होता. एकतंत्री राज्यकारभार चालविणे कठीण पडत होते. केंद्रातही विरोधी पक्ष मोठा होता. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी मुदतपूर्व निवडणुका घेण्याचा एक डाव टाकला आणि दान यशस्वी पडले. प्रचंड बहुमताने नवकाँग्रेस केंद्रस्थानी निवडून आली. लोकसभेत अशी स्थिरस्थावर झाल्यावर नवकाँग्रेसश्रेष्ठींनी गोव्यासारख्या उपेक्षित भागाकडे विशेष लक्ष द्यायला हवे होते. परंतु नवकाँग्रेस नेत्यांनी संपूर्ण डोळेझाक केली. मुदतपूर्व निवडणुकीत नवकाँग्रेसचा उमेदवार विजयी झाला होता. परंतु तो उमेदवार कसा विजयी झाला, त्याकडे श्रेष्ठींनी दुर्लक्ष केले. त्यावेळी नवकाँग्रेसने यु. गो. सारख्या धार्मिक व प्रतिगामी पक्षाशी युती केली व उत्तर गोव्या तील यु. गो. पक्षाची मते नवकाँग्रेस उमेदवाराला मिळाली. परंतु वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून त्या विजयाच्या उन्मादात नवकाँग्रेसश्रेष्ठी मशगुल होऊन गेले. आता गोव्यात नवकाँग्रेस रुजलीच असा त्यांचा समज झाला व स्थानिक काँग्रेस-कमिटीच्या लोकांनी त्यांना पूर्णपणे आंधळे बनविले. म. गो. पक्ष आता संपलाच आणि यु. गो. पक्ष तर आपलाच मित्र आहे. तेव्हा उडवा बत्ती आणि करा गोव्याचा किल्ला सर ! पण हा त्यांचा अंदाज साफ चुकला. अंदाज चुकला त्याचे कारण त्यांनी विश्वासार्ह असा संशोधक गोव्यात पाठविला नाही व जनमनाचा कानोसा घेतला नाही. गोव्याच्या विकासासाठी गोव्याने राष्ट्रीय प्रवाहात सामील व्हायला पाहिजे व त्यासाठी गोव्याने नवकाँग्रेसमध्येच विलीन व्हायला हवे एवढीच भूमिका श्रेष्ठींनी घेतली. पण येथे खरी स्थिती काय होती व आहे याचा अंदाज तिळमात्रही घेतला नाही.

नवकाँग्रेसच्या श्रेष्ठींना गोव्याबद्दल व म. गो. पक्षाबद्दल माहिती देणारे कोण ? तर गोवा काँग्रेसचे कर्तृत्वशून्य पुढारी आणि म. गो. पक्षाशी प्रतारणा करून काँग्रेसमध्ये जाऊ इच्छिणारे फुटीर. वस्तुतः फुटिरांना नवकाँग्रेसने जवळ करायला नको होते. पण अधिकारावर आल्यापासून गेल्या वीस वर्षांत काँग्रेसने केले काय, तर फुटीरांना प्रोत्साहन आणि त्यांची वाढ हे महत्कार्य केले. पक्ष बदलून काँग्रेसशी

घरोबा करणारे महाभागच आज अनेक ठिकाणी सत्तेवर आहेत. पण सर्व ठिकाणी ह्या पगडी फिरावू धोरणामुळे जय मिळतोच असे नाही. गोव्यात ह्या फुटिरांमुळे व पगडी फिरावू धोरणामुळेच काँग्रेसचा साफ धुव्वा उडाला. पेडण्याची निवडणूक झाली त्यावेळीसुद्धा नवकाँग्रेसला सणसणीत तडाखा बसला होता. परंतु त्या पराभवाची दखलही काँग्रेसश्रेष्ठींनी घेतली नाही. म. गो. पक्ष व ना. भाऊसाहेब बांदोडकर यांच्या कागाळ्या करणाऱ्यांवर नवकाँग्रेसश्रेष्ठींनी विश्वास टाकला व असा घात करून घेतला.

गोव्यात म. गो. पक्षाचे म्हणजे बिगर काँग्रेस सरकार अधिकारारूढ होते व दिल्लीला नवकाँग्रेसचे अगर पूर्वीच्या संयुक्त काँग्रेसचे सरकार होते. त्यामुळे गोव्याबद्दल दिल्लीकरांच्या मनात आपपरभाव होताच. गोवा संघप्रदेश असल्यामुळे कोणतीही बाब मंजूर करून घ्यावयाची म्हणजे दिल्लीपतींनी जास्तीच विलंब लावायचा व अनंत अडथळे निर्माण करायचे असे जणू ठरूनच गेले होते. दिल्लीकरांच्या आडमुठेपणामुळे गोव्याचा विकास कूर्म गतीने चालला होता. थोडक्यात म्हणजे गोव्यात बिगर काँग्रेस मंत्रिमंडळ असल्यामुळे गोव्याच्या आठ लाख जनतेचा जणू छळच होत होता. ना. भाऊसाहेब बांदोडकर वारंवार विनवीत होते, की 'गोवा सरकारला विकास साधण्यासाठी जादा हक्क द्या.' परंतु केंद्र सरकारने त्यांना जादा अधिकार तर दिले नाहीतच उलट जेवढी अडचण निर्माण करता येईल तेवढी केली. अ. भारतीय काँग्रेसने व नंतर नव काँग्रेसने गोव्यावर केलेला हा मोठा अन्याय होय.

## अत्यंत चुकीचे निर्णय

गोवा सरकारचे श्रेष्ठी ना. भाऊसाहेब बांदोडकर दिल्लीकरांशी संपूर्ण सहकार्य करायला तयार होते. ते स्वतः काँग्रेसमन म्हणवून घेतात. काँग्रेसची तत्त्वे, समाजवाद, गरिबी हटाव वगैरे त्यांना मान्य. पंतप्रधानांना ते सर्वोच्च व्यक्ती म्हणून मानतात. ह्या गोष्टींची तरी दखल नव-काँग्रेस श्रेष्ठींनी घ्यायला हवी होती. पण म. गो. पक्ष व ना. बांदोडकर द्वेषाने अंध झालेल्या नव-काँग्रेस श्रेष्ठींच्या कानांत स्थानिक गोवा काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी व म. गो. पक्षाच्या फुटिरांनी अनेक चहाड्या सांगून किल्मिष कालवून दिले. परिणामी अगदी पंतप्रधानांपासून तो तहत नवकाँग्रेसच्या लहानसहान नेत्यांपर्यंत सर्वांनी गोव्याबाबत अत्यंत चुकीचे निर्णय घेतले.

महाराष्ट्र गोमंतक पक्षाच्या सात फुटिरांमुळे कदाचित गोवा काँग्रेसला अल्पसा जय मिळण्याची संधी होती. परंतु ते सात फुटीरही एकसंध राहिले नाहीत. वैयक्तिक हेवेदावे व अर्थशून्य स्वयंप्रतिष्ठा आणि बांदोडकरविरोध ह्या दोषत्रयीमुळे ते सात फुटीर आणखी फुटले व निःशक्त झाले. त्यातील तिघे नव-काँग्रेस भक्त बनले व उरलेल्या चारांनी 'नवमहाराष्ट्रवादी गोमंतक' नावाचा एक तेरडा उभा केला. त्याचा रंग निवडणुकीपुरता टिकला. काँग्रेसमध्ये जाऊ इच्छि-

णाऱ्या त्या तिघांना गोवा काँग्रेसमध्ये स्थानच नव्हते. मात्र ते आपल्या परीने दिल्लीकरांना स्वतःची पात्रता पटविण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांचे म्हणणे एकच होते आणि ते म्हणजे, म. गो. पक्षाचे अध्वर्यू व गोवा सरकारचे मुख्यमंत्री वाईट आहेत, राज्यकारभार हाकायला अपात्र आहेत. त्यांना बुद्धी नाही, ते 'निरक्षरी मंत्री' या पद्धतीने कारभार करतात, वगैरे वगैरे. त्यांच्या सांगण्यात ना. बांदोडकर-द्वेष, व ना. बांदोडकरांचे चारित्र्यहनन होते. स्थानिक काँग्रेसच्या नाकर्त्यांनी ह्या तिघांना किंमत दिली नाहीच उलट त्यांच्याबद्दलच श्रेष्ठींकडे कागाळ्या केल्या. ह्या फुटिरांची, गोव्यात अॅडहॉक कमिटीची मागणी होती पण तीही नव-काँग्रेस श्रेष्ठींनी फेटाळली. आणि गंमत अशी, की त्यातल्या एकाला निवडणुकीत तिकीटच दिले नाही, तर एकाला महाप्रयासाने तिकीट मिळाले. पण मतदारसंघ भलताच मिळाला. आणि एकाचे तर नावच उमेदवाराच्या यादीत नजरचुकीने घातले गेले नाही. महाप्रयासाने ते नाव उमेदवारांच्या यादीत घातले गेले खरे, पण त्यालाही अपरिचित मतदारसंघ देऊन 'उगी बाळ...' असे थातुर मातुर करण्यात आले. इतक्या अनुल्लेखाने बोळवण केलेल्या त्या तीन फुटीरांची अवस्था काय झाली असेल बरे ?

## आरोपपत्र-एक स्टंट

स्थानिक गोवा काँग्रेसचे नाकर्ते नेते काय पात्रतेचे आहेत हे सर्वजण जाणतातच. या स्थानिक काँग्रेसच्या नाकर्त्या बारभाईंच्या चुकीच्या रिपोर्टांवर व म. गो. पक्षाच्या फुटिरांच्या चाहाडयांवर विश्वास ठेऊन एका तथाकथित आरोपपत्राच्या आधारे ना. बांदोडकरांची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती कपूर यांचे एकसदस्य कमिशन नेमले गेले. त्या कमिशनने गोव्यात व इतरत्र संबंधितांच्या साक्षी घेतल्या. सदरहू बाब अद्याप न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यावर मतप्रदर्शन करता येत नाही. पण जनमत असे, की ज्या अर्थी कमिशनचा निर्णय बाहेर यायला बराच कालावधी लागला त्या अर्थी ना. बांदोडकरांवर केलेले आरोप खोटे असावेत. किंबहुना सिद्ध होणारे नसावेत. त्यात काहीच तथ्यांश नसावा. अन्यथा कमिशनचा अहवाल यापूर्वीच बाहेर यायला हवा होता. जनमत असेही आहे, की ना. बांदोडकरांवरील आरोपपत्र हा नवकाँग्रेसचा एक स्टंट असावा व ना. बांदोडकरांना जनमाणसातून हटविण्यासाठी निवडणुकीच्या वेळी त्याचा उपयोग करता यावा. प्रचारासाठीही आरोपपत्र व तथाकथित कमिशनचे भांडवल त्यांना करायला मिळाले व दिल्लीहून आलेल्या श्रेष्ठींनीसुद्धा त्या कमिशनचा उल्लेख निवडणूक प्रचाराचे वेळी केलाच.

विकासकार्यात दिल्लीवाले अडवणूक करीत आहेत हे ना. भाऊसाहेब बांदोडकर यांनी ओळखले व केवळ बिगर काँग्रेस मंत्रिमंडळामुळे केंद्र सरकारकडून गोव्याच्या आठ लाख प्रजेचे हाल होऊ नयेत ह्या सद्भावनेने ना. बांदोडकरांनी नवकाँग्रेस श्रेष्ठींसमोर संपूर्ण शरणागती पत्करली होती. स्वतः निवडणुकीला उभे न रहाण्याचा व पक्षच

विसर्जित करण्याचा निर्णयही त्यांनीं घेतला. म. गो. पक्षातील सात फुटीर आमदारां-मध्ये दोघे मंत्रिमंडळात होते. अकार्यक्षमतेमुळे त्यांना कमी करण्यापूर्वीच त्यांनी संधी साधून मंत्रिपदाचे राजीनामे दिले व झाकली मूठ सव्वा लाखाची ठेवली. त्याच्याही पुढे जाऊन आपल्या फुटीर सहकाऱ्यांशी प्रतारणा करून, काँग्रेसशी म्होतूर लावून, विधानसभेत काँग्रेसचे आमदार म्हणून बसू लागले. त्यांच्या त्यागाचा डांगोरा निवडणुकीच्या काळात पिटला जात होता.- मंत्रिपदाचा त्याग ! केवढा अलौकिक त्याग ! पण ना. बांदोडकरांच्या त्यागाचा उल्लेखही कोणी करीत नव्हते.

ना. भाऊसाहेबांनी केलेल्या उपकाराची यत्किंचितही कृतज्ञता नसलेले गोव्याच्या विसर्जित विधानसभेचे सभापती यांची कहाणी अगदीच केविलवाणी आहे. हे स्वतः पेशाने वकील, शिवाय स्वातंत्र्यसैनिक ! गोव्याच्या स्वातंत्र्यानंतर ते काँग्रेसमध्ये सामील झाले व १९६३ च्या निवडणुकीत गोवा काँग्रेसचे उमेदवार म्हणून उभे राहिले. विरोधी म. गो. पक्षाचे उमेदवार व हे महाशय यांच्यात सर्वतोपरी जमीन अस्मानाचे अंतर असूनही मतदारांनी ह्यांना चांगलेच भुईसपाट केले. हे सद्गृहस्थ काँग्रेसमधून व स्थानिक राजकारणातून फेकले गेले. नंतर मात्र ह्यांच्या कुंडलीत बरेच ग्रह उच्चीचे आले आणि त्यांनी ना. बांदोडकरांची मर्जी संपादन केली. व म. गो. पक्षात गेले. १९६७ च्या निवडणुकीत निवडून आले. हे केवळ आमदार झाले इतकेच नव्हे तर त्याना ना. भाऊसाहेबांनी सभापती केले. गेली पाच वर्षें त्यांनी मजेत काढली. 'आमचे भाऊ' ह्या ना. बांदोडकरप्रशंसा पुस्तकात अगदी लेखणी तुटेपर्यंत ना. भाऊसाहेबांची स्तुती केली. पण पाचवर्षांनी ग्रहदिशा फिरली. ना. भाऊसाहेबांच्या विरुद्ध जाण्याचे ठरविले. त्यांना दिल्लीहून म्हणे नवकाँग्रेस श्रेष्ठींकडून पाचारण आले आणि आता गोव्यात नवकाँग्रेसशिवाय कोणतेही सर-कार येणे शक्य नाही. तेव्हा ना. भाऊसाहेबांशी द्रोह करून काँग्रेसमध्ये जायला हरकत नाही. नवकाँग्रेसच्या तिकिटावर आपण निवडून येणारच व मंत्रिपद नाहीतर सभापतीपद आहेच, अशा स्वप्नरंजनात हे दिल्लीहून आले व नवकाँग्रेसच्या तिकिटावर उभे राहिले. खरे म्हणजे त्यांनी ना. बांदोडकरांशी प्रतारणा न करता म. गो. पक्षाच्या तिकिटावरच उभे रहायचे. जय निश्चित होता व सभापतीपदही कायम होते. पण त्यांनी आपल्या हातांनी आपल्या पायावर दगड मारून घेतला, आणि आधी गेली बुद्धी नि मग गेले डिपॉझिट.

## प्रचारपद्धती

नवकाँग्रेसचे एकूण एक उमेदवार व प्रचारक एकाच आजाराने पछाडलेले होते व तो आजार म्हणजे ना. बांदोडकरांना विरोध करणे. "बांदोडकर हटाव" हे घोषवाक्य होते. काहीही करून ना. बांदोडकरांना उलथून टाकायचेच असा त्यांचा पण होता व त्यासाठी पंतप्रधानांच्या नावाचा, कीर्तीचा, दुरुपयोग नवकाँग्रेसने केला. सबंध गोवाभर फक्त पंतप्रधानांच्या छायाचित्राचे पोस्टर्स हजारो, लाखो

चिकटविण्यात आले होते. स्थानिक उमेदवारांची चित्रे तर नव्हतीच पण त्याचे नाव बारिक टाइपात कोठेतरी छापण्यात आलेले होते. फार काय नवकाँग्रेसची निशाणी गायवासरू, त्याचे चित्रही दिसले न दिसले असे छापलेले होते. जर ह्या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार निवडून आले नाहीत तर तो पराभव प्रत्यक्ष पंतप्रधानांचा समजला जाईल असा आभास निर्माण करण्यात आला होता. प्रचाराच्यावेळी भारत-पाक युद्धातील विजयाचा उल्लेख करून राजनीतीत चीन, अमेरिकेवरही विजय मिळविणाऱ्या पंतप्रधानांची प्रतिष्ठा इरेस घातली गेली होती. आणि ना. बांदोडकरांना व त्यांच्या उमेदवारांना बदनाम करण्यात व त्यांचे चारित्र्य हनन करण्यात जणु चढाओढच लागली होती. त्याउलट ना. भाऊसाहेबांनी सकाळी ९ पासून रात्रौ १२ वाजेपर्यंत मतदारसंघात जाऊन लोकांची गाऱ्हाणी ऐकली, तक्रारी ऐकल्या, त्यांना दिलासा दिला. मने आपलीशी करून घेतली. प्रचारात कुणाही विरोधकाविरूद्ध शब्द उच्चारला नाही. स्वत: आठवर्षांत काय केले व पुढे काय करणार तेवढेच सांगितले. सहकारी पाठीत सुरा खुपसून पक्षाशी प्रतारणा करून गेले. विश्वासघात करून गेले. त्याबद्दल त्यांनी अनुदार उद्‌गार काढले नाहीत. पंतप्रधान व त्यांच्या राष्ट्रविकासाच्या कार्यक्रमांवर पूर्ण विश्वास प्रकट केला. परिणामत: ना. भाऊसाहेब बांदोडकर हेच आपले खरे नेते आहेत हे मतदारांनी जाणले.

जे पक्षाशी प्रतारणा करतात, नेत्याचा विश्वासघात करतात, एकदा म. गो. पक्षाचे उमेदवार म्हणून निवडून दिल्यानंतर स्वार्थासाठी पक्ष बदलून दुसऱ्याच पक्षाशी म्होतूर लावतात, जनतेने राजकारणातून उडवून दिल्यानंतर ना. बांदोडकर यांनी आपल्या दयाळू अंत:करणामुळे, आपलेपणाच्या भावनेने परत राजकारणात महत्त्वाचे स्थान देऊनही जे ना. भाऊसाहेबांचा विश्वासघात करतात, त्याच्याशी कृतघ्न बनतात ते उद्या मतदारांना, साऱ्या जनतेला फसविणार नाहीत कशावरून? अशा सरळ पण सडतोड विचाराने मतदारांनी योग्य ते निर्णय घेतले, म. गो. पक्षाला निवडून दिले. काँग्रेसला भुईसपाट केले.

केवळ बिगर काँग्रेसचे सरकार म्हणून दिल्लीवाले गोव्याच्या विकासात अडथळे आणून, मुद्दाम अडचणी निर्माण करून आठलाख जनतेचे गेली आठवर्षे हेतुपुरस्सर हाल केले तसेच धोरण चालू ठेवतील व प्रदेश काँग्रेसच्या अकार्यक्षम व जनतेच्या मनात तिळमात्र प्रेम नसलल्या बारभाईंना डच्चू न देता पुनरपी जैसे थे ठेऊ पहातील तर गोव्यात काँग्रेसचे नावही कोणी घेणार नाही आणि ना बांदोडकरांचा महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष व त्यापक्षाचे सरकारच अधिकारारूढ राहील.

□ □ □

नलिनी अंबाडे

# गरजवंताला अक्कल नसते !

गरजवंताच्या अकलेचं थोडावेळ राहूदेत बाजूला, पण ही म्हण ज्या कुणी शेकडो वर्षापूर्वी प्रचारात आणली तो नक्कीच बुद्धीमान असला पाहिजे. कालमानाप्रमाणे 'नसते'च्या यादीत थोडीशी भरच पडलेली आहे. सध्याच्या गरजवंताला लाज शरम, वेळेचे महत्त्व, कॉमनसेन्स, स्वाभिमान इ. सुद्धा नसावे लागते. गरजवंत कोण ? फक्त तुम्ही आम्ही जनता. जितकी गरज अधिक, तितकी अक्कल कमी, हे गणितामधील व्यस्त प्रमाण इथेच फक्त लागू पडते. कमी कमी होते अन् शून्याखाली जाते हे पाहायचंय का तुम्हाला ? चला, आपण मद्रास शहराची सहल करूयात !

समजा तुम्ही मद्रासला आलेले असाल, किंवा येणार असाल, तर काय पहायला मिळेल ? मरीना चौपाटी, म्युझियम, झू, गांधीपार्क, अड्यार आणि माऊंट रोडवरील रौडयाना ते जेमिनी चौक. आपण जाऊ एन्नोर भागात. कारखान्यांचा व झोपडपट्ट्यांचा आणखी भाग म्हणजे ओटेरी, चूलै वेपेरी, वॉशरमनपेंट आणि खूप खूप. कुडवुडी हॉटेले अन् किराणा दुकानांच्या मध्ये एखादे रिकामे दुकान दिसेल. काही दागिने, रेडियो, एखादी जुनी सायकल, दहाबारा घागरी सामान दिसेल. शुद्ध तमीळमध्ये बोर्ड दिसेल 'धनमल चंदनमल पान ब्रोकर'—म्हणजेच कायद्याने सावकारी करणारा मनीलेंडर. कुणातरी झोपडपट्टीतल्या बाईला तो शुद्ध तमीळमध्ये सांगत असतो काहीतरी आणि ती शेजारच्या आपल्या घागरीकडे पहात मान डोलावीत असते. बोलता बोलता तो पावती बनवितो, तिचा अंगठा तीवर घेतो आणि हातावर ठेवतो आठ रुपये बारा आणे – पावती असते दहाची. सध्याचा व्याजवट्टयाचा दर आहे रुपयाला, महिन्याला दहा नये पैसे, म्हणजेच शंभर रुपये हवे असतील तर नव्वदच प्रत्यक्ष हातात पडतात. पावतीला लावलेल्या २ तिकिटांचे २० पैसे व छपाईपोटी चार आणे अर्थातच निराळे कापले जातात. नेहमीचे गिऱ्हाईक नसेल तर मग डाग दागिना ठेवावा लागतो. ३०० रुपयांच्या ट्रान्झिस्टरवर फक्त १०० रु मिळतात. अर्थात पावतीवर व्याजाचा दर सरकारीच असतो, म्हणजे

२० नये पैसे. म्हणजेच शंभराला, एका महिन्यास २ रु. थोड्याफार अधिक प्रमाणात सगळीकडे देशभर असाच व्यवहार आजतरी चालतो आहे. समजून उमजून व कळून सवरून. कारण ? गरजवंताला अक्कल नसते.

मारवाड्याने २० पैशांची पावती करून २ रु. घेतले तर ती मग लबाडी-फसवणूक-गोरगरिबांची मिळवणूक-भाडवलशाही इत्यादी सारे काही ठरते. पण सरकार बसभाडे १० न. पै. मिनिमम्चे ३० पैसे करते–विनाकारणच. तो काळाबाजार नसतो. दोन रु. किलोची साखर, साडेतीन रुपये मिळते. का ? दूर कशाला, ह्याच मारवाड्यांना लायसेन्स फी २५ रुपये आहे; ती एकाएकी एकदम १०० रुपये करण्याचा सरकारचा विचार झाला आहे.

त्याचं काय झालं ? गोरगरिबांची ही व्याजापोटी होणारी पिळवणूक फसवणूक वगैरे वगैरे आमच्या तमीळनाडू सरकारला पाहवली नाही. वास्तविक व्याजाचा धंदा पुराणकाळापासून चालत आलेला आहे व जगाच्या अंतापर्यंत त्याला मरण नाही. समाजात आर्थिक सुबत्ता आली की आपोआपच ह्या धंद्याचे प्रमाण कमी होईल. ज्या वस्तूंची टंचाई तिचा काळाबाजार हा ठरलेलाच. आज महागाईमुळे पैशाचीच टंचाई झालीय तर, पैशाचाच काळाबाजार न झाला तरच नवल ! अहो, खुद्द मंडईमध्ये सुटे पैसे, मोड, चिल्लर विकत मिळते – अगदी नाणेटंचाई होण्यापूर्वीपासून. तेव्हा केवळ एखादा कायदा करून ह्याला आळा बसणार नाही. जोवर गरज भागत नाही, तोवर गरजवंताला अक्कल नसते व तोवर हे असेच चालणार. कायद्याने कदाचित अधिक ' काळचा बाजारास ' उत्तेजन मिळेल.

कालच्या ३ एप्रिलला तमीळनाडू असेंब्लीत नवे बिल आले आहे. ' तमीळनाडू डेट रिलीफ अॅक्ट–१९७२ ' असे कायद्याचे नाव राहील. सत्तारूढ पक्षाच्याच वीजमंत्र्यांनी ते सभागृहात मांडले. एक ऑक्टोबर १९७१ ही तारीख सरकारने निवडली व पक्की केली. त्या तारखेवर सर्व कर्जाऊ रकमांचे हिशेब येऊन थांबतील. ज्या ज्या ठिकाणी देणेदाराने भरलेल्या दरमहा व्याजाची + थोड्याफार मुद्दलाची बेरीज, मूळ मुद्दलाच्या दुप्पटीपेक्षा अधिक आहे, ती ती कर्जे आपोआपच ' संपली ' असे समजण्यात येईल. एका दृष्टीने हे उत्तमच आहे. इतर खात्यांवर एक ऑक्टोबर १९७१ पर्यंत जेवढे व्याज जमा झाले असेल तेवढेच. येथून पुढे व्याजाचा हिशेब निव्वळ मुद्दलावर होईल व तो दरसाल दर शेकडा ६½ रु. पेक्षा अधिक दराने होणार नाही. सध्याचा अंधारातील दर काय आहे, ठाऊक आहे ? १०० रु. चे एक वर्षाचे व्याज १२० रु. ! सध्या बाजारात १२० रुपयास जाणारी एखादी वस्तु खुद्द सरकार तरी सव्वासहा रुपयास विकेल काय ? परिणाम एकच होईल. मनीलेंडर्स सरकारला जशा हव्यात त्या भावात पावत्या बनवीत जातील व प्रत्यक्षात १००. वर सही अन् हातावर ८९–५५ ! व्याजाचे वहा (एक महिन्याचे), पावतीची तिकिटे २० न. पै. आणि पावतीबुक छपाईपोटी २५ न. पै. ! सरकारी

नव्या कायद्याने, गोरगरिबांवरच अधिक भुर्दंड पडणार. ते सहन करणार. कारण गरजवंताला...

नवीन कायद्याचा आधार, दरमहा ६०० रु. किंवा कमी उत्पन्नाच्या सर्व थरातील सर्वांना मिळणार आहे. हा कायदा कोर्टाच्या डिक्ऱ्यांवरही मात करू शकेल. येथून पुढे सावकारांच्या शब्दकोषातील 'चक्रवाढ व्याज' शब्दच ह्या नव्या कायद्यान्वये जणू नाहीसा होत आहे. निदान सरकारला तसे गोड समाधान वाटेल. अर्थात खुद्द सरकारी कर्जे, केंद्रिय सरकारची कर्जे, बँकांची व सहकारी सोसायट्यांची कर्जे यांना हा कायदा धक्का लावणार नाही.

सभागृहातच एका माननीय सभासदांनी सूचना केली. 'प्रत्येक सावकाराकडून दहा हजार रुपयांपर्यंत सिक्युरिटी डिपॉझिट घ्यावे' दुसरे एक सभासद म्हणाले, 'लायसेन्स फी १०० च नव्हे तर १००० रु. करावी!' कुणी सांगावे? कायदा सध्या बिल-स्वरूपात आहे, कदाचित वरील कलमांचा त्यात अंतर्भाव होईलही. अर्थात समजा झालाच तरी तो भुर्दंड गरजवंतांनाच! कारण कायदा सर्वस्वी तोकडा पडतो. ३०० रुपयांचा दागिना घेऊन, दीडशेच रुपये दिले जातात व प्रत्यक्ष हातात जेमतेम १३५ रुपये पडतात. तरीसुद्धा आज इतकी वर्षे 'गरजवंत' विनातक्रार कर्जे घेतात. जमले तर डाग सोडवून आणलात; नाहीतर हरी हरी! पण ह्यामुळे तरी एक प्रकारे लोक सावकारांपासून दूर रहातात हा एक अप्रत्यक्षपणे फायदाच नव्हे काय?

तेव्हा तमीळनाडूच्या ह्या नव्या कायद्याने सावकारी व्याजवट्ट्यांचा 'आतला भाव' मात्र वाढेल. ज्या गोरगरिबांच्या रक्षणाकरिता हा केला जात आहे, ते बाजूलाच रहातात. रोग एकीकडे व मलमपट्टी भलतीकडे अशातला काहीसा प्रकार होतोय असं वाटतं. समाजातली खरी आर्थिक सुबत्ता वाढली जाणे हाच निरोगी खरा रामबाण उपाय. प्रत्यक्षात दिवसेंदिवस अधिकाधिक महागाई–अधिकाधिक परमिटे– तेथे लाचलुचपत – परिणाम पुन्हा महागाई – हे दुष्टचक्र चालू आहे. वरील प्रकारच्या कायद्यांनी त्याला कितपत आळा बसेल ते आता पहायचे.

एक मात्र खरं, जोवर गरजवंताला अक्कल नाही, तोवर असा कोणताही कायदा केवळ पुस्तकातच राहील!

□ □ □

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## नावात काय आहे ?

तसं पाहिलं तर पश्चिम बंगाल नि पूर्व बंगाल हे पाठीला पाठ लावून असलेले सख्खे भाऊ...एकाच वंगभूमी नामक मातेचे पुत्र. पण सत्तेचाळीस साली स्वातंत्र्याबरोबरच ह्या दोघांमध्ये सावत्रपणाचं विष पेरलं गेलं. एक भाऊ राहिला भारतात नि दुसरा पाकिस्तान्यांनी पळवून नेला. साहजिकच राजकीय लेखणीने काळी कुळकुळीत लक्ष्मणरेषा आखली दोघांच्या मधोमध. आतून रक्ताची नाती चिरडली गेली नि वरपांगी वैमनस्याचा थर जमला...

पूर्व बंगालनें इतिहास घडवला. नवं राष्ट्र जन्माला घातलं. त्याचं बारसं थाटात केलं नि नाव ठेवलं बांगला देश. आपोआपच सावत्रपणाचं विष उतरलं. सख्ख्या भावांनी गळ्यात गळे घातले. एक भाऊ दुसऱ्या भावाला डोक्यावर घेऊन नाचू लागला. हळूहळू आनंदाचा-उत्साहाचा भर ओसरला. नंतर निवडणुकांचा धुमाकूळ आटोपला. जीवनाला जरा स्थैर्य आल्यागत वाटलं. आता विद्वानांच्या नि सामान्यांच्याही डोक्यात विचारचक्रे उलटसुलट फिरू लागली. मतमतांतरे व्हायला लागली. आता आपल्याही राज्याचं नव्याने नामकरण व्हावं अशी एक लाट पसरली. कुणी म्हणाले – पूर्व बंगालचा बांगला देश झाला. हरकत नाही. पण तिथले तेवढेच बंगाली का ? आम्ही काय बंगाली नाही ? मग आमचा देश सुद्धा बांगला देश का नको ? कोणी म्हणाले – च्...च्... ' बांगला देश ' देखील उगाच नाव पडलं. पूर्व पाकिस्तानचा पूर्व बंगाल झाला असता की पुरे होतं. आमचा पश्चिम बंगालही सुखाने आहे त्याच नावाने वावरला असता. ह्यांनी आपलं नाव बदलून ' बांगला देश ' केलं. आता आली ना पाळी आमच्यावरही नाव बदलायची !

कोणत्याही प्रश्नाला दोन बाजू असणारच. एक बाजू मांडली जाते न जाते तोंच दुसऱ्या बाजूचेही योद्धे तयारच असतात शब्द फेकून मारायला. कोणी म्हणाले, असे ना का तो बांगला देश. आपण पश्चिम बंगाल न म्हणता आपल्या राज्याला

मुटसुटीत असं बांगला (बंगाली) किंवा बंगाल (हिंदी) किंवा बेंगॉल (इंग्रजी) नाव देऊ या म्हणजे झालं. ही सूचना बरी वाटली. थोडे दिवस राजेशला राजू म्हणून हाक मारावी तसं पश्चिम बंगालला आम्ही 'बंगाल' म्हणून पाहिलं. पण थोड्यावर आटोपलं तर ते वाग्युद्धच नव्हे! पुन्हा लोक उलटले. म्हणाले पश्चिम बंगालचा 'बंगाल' बनवताना आमच्यासारख्या सामान्य लोकांच्या भावनांची जरा तरी कदर करायची होती! आणखी एक आवाज उठला – नाव बदलायचं होतं तर महाराष्ट्रासारखं बंगराष्ट्र किंवा बांगलाराष्ट्र तरी ठेवायचं! आता तर जाडे विद्वानही ह्या प्रश्नात डोकी खुपसू लागले. नॅशनल प्रोफेसर सुनीतिकुमार चाटरजी म्हणाले– अहो, असे वेड्यासारखे नाव बदलायच्या मागे का लागता? जगात अनेक राष्ट्रे दिशादर्शक उल्लेख धारण करून वावरणारी आहेत. याची कैक उदाहरणे देता येतील. पश्चिम जर्मनी, पूर्व जर्मनी, नॉर्थ कोरिया, साऊथ व्हिएटनाम अन् असे कितीतरी! पश्चिम बंगाल म्हटलं तर कुठे बिघडलं?

दुसऱ्या काहींनी त्यांचीच री ओढली. म्हणाले– हो, आम्हाला सराव झालाय पश्चिम बंगाल म्हणायचा, तेच नाव असू देत. नाव बदलल्याने इथलं जीवन का बदलणार आहे? ते तेच रहाणार. नाव तेच राहिलं म्हणून कुठे बिघडलं?

मग एक बाई पदर खोचून पुढे सरसावल्या. गंमत अशी, की डॉ. सुनीतिकुमार सारख्या विद्वत्ताप्रचुर व्यक्तीसमोर सहसा कोणी बोलत नाही. पण ह्या बाईंनी चांगलेच आक्षेप घेतले सुनीतिकुमारांच्या विधानावर म्हणाल्या– पश्चिम जर्मनी पूर्व जर्मनी असले तरी त्यातलं एक राष्ट्रं जर्मन डेमॉक्रेटिक रिपब्लिक या नावाने प्रसिद्ध नाही का? अन् इतरही दिशादर्शक नावं धारण करणारी राष्ट्रं निराळ्या नावांनीच वावरतात हे खोटं का आहे? (बाईंना उदाहरणादाखल आणखी काहीच आठवत नसावं!)

त्यानंतर दुसऱ्या एका बाईंना स्फूर्ती आली. त्या म्हणाल्या, डॉ. सुनीतिकुमारांच्या विधानावर आक्षेप घेण्याचं ह्या बाईंना काय कारण? याचं असं म्हणणं आहे काय की मुटसुटीत 'पश्चिम बंगाल' ऐवजी आम्हीही काहीतरी लांबलचक नामाभिधान लावून बंगालचा उल्लेख करावा?

असा हा उहापोह.. असं हे वाग्युद्ध...क्षुल्लक प्रश्नाबाबत होणारा बुद्धि, वेळ आणि शक्ति ह्यांचा हा अपव्यय... हे सगळ आमचे मुख्यमंत्री पहात आहेत, ऐकत आहेत. शेवटचा निर्णय त्यांनाच घ्यायचा आहे म्हणून ते विचार करीत आहेत. पश्चिम बंगालचं नाव बदलायचा त्यांचा निर्धार मात्र कायम दिसतोय. आता त्यांच्यासमोर तीन नावं आहेत. वंगदेश, वंगभूमी, वंगप्रदेश. त्यापैकी वंगप्रदेश हेच नाव बहुतेक पक्कं होणार अशी चिन्हे दिसताहेत. उत्तर प्रदेश आहे, मध्य प्रदेश आहे, तसाच एक वंगप्रदेश अस्तित्वात येईल. काही वाईट नाही. नाव एकदम पसंत. म्हणा आता – 'जय वंगप्रदेश!'

# शहराचे रूपांतर फुलबागेत होणार ?...पण मग....?

आमचे मुख्य मंत्री सिद्धार्थ शंकर रे यांनी नुकतेच असे उद्‌गार काढले आहेत. त्यांनी तशी अनेक आश्वासनं दिली आहेत. त्यांपैकी हेही एक आहे. त्यांना कलकत्ता शहराची फुलबाग बनवायची आहे आणि हे आश्वासन नुसतं हवेत विरून जाण्यासाठी नव्हे तर कृतीत उतरवण्यासाठी आहे. त्या दृष्टीने प्रयत्नही जोमाने सुरू झाले आहेत.

शहराचे रूपांतर फुलबागेत व्हावे ही कल्पनादेखील केवढी रम्य आहे ! त्या दिशेने सुरू झालेले आजचे प्रयत्न पाहून तरी ती प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता आहे असे नगरवासीयांनी गृहीत धरायला काहीच हरकत नाही. शहरातले कचऱ्याचे ढीग हलवण्यात येत आहेत. रस्ते दुरुस्त होऊ लागले आहेत. रात्रीबेरात्री जाग आल्यास गिट्टी पसरण्याचा आवाज किंवा डांबराचा वास त्याची साक्ष देतात. शहराचे विविध भाग पाहून त्या त्या विभागातील स्वच्छता राखण्याचे काम तरुण मुले हाताशी धरून पार पाडण्यात येईल. आवश्यक तेथे नवी झाडे लावून शहरातील प्रत्येक विभाग सुशोभित करण्याचा प्रयत्न केला जाईल. ज्या विभागातील काम सर्वांत उच्च दर्जाचे आढळेल तेथील तरुणांना बक्षीस देण्यात येईल. याशिवाय खास बालकांसाठी नवी बाग, स्टेडियम–स्वीमिंग पूलसह इत्यादी नव्याने तयार करण्याच्या योजनाही आहेत. अलीकडे सकाळ-सायंकाळ रस्ते धुतले जाऊ लागले आहेत. फूटपाथवर ठिकठिकाणी असलेले गंगेचे नळ गेली पाच-सहा वर्षे सुप्तावस्थेत होते. आता पुन्हा दोन दोन माणसे जाड व लांब पाईप खांद्यावर घेऊन ठिकठिकाणच्या फूटपाथवरील नळापाशी दिसू लागले आहेत. रस्ते धुतल्यामुळे पाहणाराचे डोळे देखील थंडगार होतात. पण कित्येक दिवस हे दृश्य नजरेला पारखे झाले होते. आणखी एक अत्यंत महत्त्वाची योजना म्हणजे फुटफाथ अडवणारी छोटी छोटी तात्पुरती दुकाने उचकवणे ! फुटपाथवर ठाण मांडून बसणारे सर्व हॉकर्स हाकलून लावण्याची मोहीम पोलिसांनी हाती घेतली आहे. गेल्या वर्षापासून ही दुकानं अनिर्बंधपणे व्यवस्थित सुरू होती. एवढंच नव्हे, त्यांचं प्रमाणही दिवसेंदिवस वाढतच होतं. त्यांना कॉर्पोरेशनकडून मूक प्रोत्साहन दिलं जात होतं म्हटलं, तर अतिशयोक्ति होणार नाही. पण आता मात्र त्यांच्यावर धाड आली आहे. परिणामत: मेट्रो सिनेमासमोर फुटपाथ जणू नव्याने उपस्थित झाल्याचा आता भास होतो. तेथून चालणारांनादेखील अडथळे नसल्याने निराळंच वाटतंय.

ह्या मोहिमेबद्दल तर अनेकांनी पत्रें लिहून मुख्यमंत्र्यांचे तोंड भरून कौतुक केलं. पण अनेकांना पुळकाही आला त्या हॉकर्सचा. बिच्चारे ! कुठं जावं आता त्यांनी ? कसेतरी बिनाभांडवलाने थोडासा व्यापार करून चार पैसे कमावीत होते, बायका-

मुलांना पोसत होते. आता त्यांच्यासमोर केवढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे ? 'गरिबी हटाव' ह्या योजनेला विसंगत असाच हा कार्यक्रम नव्हे काय ? शेकडो हॉकर्स व त्यांची कुटुंबे यांना उपासमारीची पाळी येणार हे निश्चितच ! मग त्यांच्यासाठीदेखील काही योजना तयार असायला हवी होती–त्यांना फुटपाथवरून हाकलून लावण्यापूर्वी. पुण्यात मध्यंतरी झोपडपट्ट्या नष्ट करण्याच्या कार्यक्रमाविषयी वातम्या वाचल्या होत्या. गरिबांच्या झोपड्या भराभर जमीनदोस्त करण्यात आल्या पण त्यांनी कुठं जावे, काय करावे, कसे राहावे ह्या प्रश्नांचा विचारच झाला नाही. तीच परिस्थिती ह्या हॉकर्सची आहे. दोन्हीमध्ये काहीही फरक नाही. अशा शेकडो लोकांचे जीवन चिरडून जर शहरात फुलबागा फुलणार असतील तर... तर......

## दोन पत्रे

मला एकदा एक अनपेक्षित पत्र आलं. एका हायस्कूलच्या विद्यार्थ्याचं ते पत्र होतं. त्याने लिहिलं होतं– 'आपण सोमनाथ कँपमध्ये भेटलो होतो हे आठवत असेलच.'–अनेक विद्यार्थ्यांशी ओळख झाली होती. त्यांपैकी हा एक असावा हे लक्षात आलं. पुढे तो लिहितो, 'हे पत्र मुद्दाम लिहिण्याचे कारण ..आपला बांगला देश स्वतंत्र झाला त्याबद्दल मी आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो. आतापर्यंत तुम्हाला तेथे खूपच त्रास झाला असेल पण आता मात्र तुम्ही खुषीत असाल'... इ. इ....

प्रथम हसू आवरेना. नंतर मात्र महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचं भूगोलाचं ज्ञान पाहून मला त्याची कीवच आली.

ह्याहीपेक्षा नवल करण्यासारखी गोष्ट म्हणजे छिंदवाडा जिल्ह्यात असलेल्या एका खेड्यातील शाळामास्तरांचं आलेलं पत्र. त्यांनी पाकिटावरचा पत्ता Calcutta 27 इथपर्यंत बरोबर लिहिल्यानंतर त्याखाली मात्र चक्क East Bengal लिहून टाकलं. पत्र मला बरोबर मिळालं म्हणून पोस्टखात्याची मी आभारी आहे. परंतु एका शिक्षकाला पूर्व आणि पश्चिम बंगालमधील फरक कळू नये ही खेदाचीच गोष्ट नव्हे काय ?

□ □ □

खरं म्हटलं तर परदेशांत जाणं यात काही नाविन्य उरलंय का आता? एक ना दोन अनेक मार्गांनी लोक परदेशी जातात. परंतु निरनिराळ्या कुटुंबांमध्ये, निरनिराळ्या खेड्यांमध्ये, शहरांमध्ये राहून एका परकीय जीवनाची ओळख करून घेण्याची संधी मिळणं हे दुर्मिळ नाही तर काय?... ही दुर्मिळ संधी माणूसच्या साहाय्यक संपादिका सौ. निर्मला पुरंदरे यांना मिळाली. आणि पॅरिसमधील पुणे मित्रमंडळ या संस्थेच्या निमंत्रणावरून ३० एप्रिल १९७० या दिवशी त्या फ्रान्सला गेल्या. त्यांनी एक वर्षाच्या आपल्या मुक्कामात तिथे जे काही पाहिलं, वाचलं, अनुभवलं त्याचा हा वृत्तांत. या अंकापासून क्रमशः सादर होत आहे.

तूच का, अनेकजण मला माझ्या फ्रान्समधील एक वर्षाच्या वास्तव्यासंबंधी लिहायला सांगताहेत. मलाही सारखी मनाला टोचणी लागली आहे. आपल्याला मिळालेल्या या दुर्मिळ अनुभवात, त्याच्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घ्यावं असं कुणाला नाही वाटणार? अगदी अपराधीपणा वाटतो बघ. लिहीणं जमत नाही याचा अगदी राग येतो मग.

आता मी बोलायचं, तुला सरळ सांगायचं ठरवलं आहे, कोणी वाचो न वाचो. फक्त तूच वाचलंस तरी चालेल. या समृद्ध अनुभवानं मन कसं गच्च भरलंय. खरं म्हटलं म्हणजे परदेशात जाणं यात काय नाविन्य उरलंय का आता? एक ना दोन अनेक मार्गांनी लोक परदेशी जाताहेत. परंतु निरनिराळ्या कुटुंबांमध्ये, निरनिराळ्या खेड्यांमध्ये, शहरांमध्ये राहून एका परक्या जीवनाची ओळख करून घेण्याची संधी मिळणं हे दुर्मिळ नाही तर काय?

तुला माहीतच आहे की १९६७ पासून मी पुण्याच्या फ्रान्स-मित्रमंडळात काम करते आहे. दोन देशामध्ये सामान्य पातळीवर परस्पर परिचय व्हावा, एकमेकां-बद्दलचे गैरसमज दूर व्हावेत, या उद्देशानं या संस्थेचं काम सुरू झालं. गेल्या चार वर्षांत या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुणे, कोल्हापूर, विजापूर, जळगाव, नासिक, गोवा येथे संस्थेचं काम सुरू झालं. पूर्वेकडच्या या भल्यामोठ्या देशात सर्व-



# स्नेहयात्रा

सामान्य माणूस रहातो कसा, त्याचे विचार काय आहेत, सामाजिक परिस्थिती कशी आहे, प्रेक्षणीय स्थळं कोणती आहेत, लोकांच्या चाली-रीती, सण-समारंभ आहेत तरी कसे या सामान्य कुतुहलानं फ्रेंच मित्रमंडळी महाराष्ट्रात आली होती. अनेकांशी ओळखी झाल्या होत्या. फ्रान्समध्ये परत गेल्यावरही त्यांनी पत्रव्यवहार सुरू ठेवला होता. व्यक्तींच्या माध्यमातून सामाजिक कुतुहल माझ्या मनात निर्माण झालं होतं.

१९६७, ६८, ६९ मध्ये तिसऱ्यांदा फ्रेंच लोक पुण्यात आले, तरी एकाच वेळी शंभर ते दीडशे भारतीय लोकांना फ्रान्समध्ये जायला भारत सरकारकडून परवानगी मिळेना. या एकतर्फी आतिथ्याचा फ्रेंच मित्रांना संकोच वाटू लागला होता. आणि यातून काय मार्ग काढावा यावर ते निरनिराळ्या मार्गांनी विचार करत होते.

पैकी ही एक योजना. त्यांचं म्हणणं असं की जोपर्यंत तुम्हाला भारत सरकारची परवानगी मिळत नाही तोपर्यंत फ्रान्स-मित्रमंडळातर्फे एक व्यक्ती एक वर्षभर फ्रेंच जीवनाचा अनुभव घेण्यास यावी. फ्रान्समधील पुणे मित्रमंडळाला भारतात मिळालेल्या अगत्यशील आतिथ्याची काही अंशी परतफेड करण्याची संधी त्यांना यानिमित्तानं मिळणार होती.

ही योजना मंजूर झाली. आणि तिच्यात माझ्या नावाची प्रशस्ती आणि फ्रान्स-मधील पुणे मित्रमंडळाची तिला मान्यता हे मला कै. रावसाहेब पटवर्धनांकडून

कळलं. माझी प्रतिक्रिया तुला सांगितली, तर तू हसशील. सांगू ? अरे, रावसाहेबांनी मला हे सांगितलं तेव्हा या अनपेक्षित बातमीनं मी इतकी संकोचून गेले, की त्यांना एक अवाक्षरही पुढं विचारलं नाही की घरी आल्यावर घरातही कुणाला काही सांगितलं नाही. तूच सांग. कुठल्याही प्रकारची पदवी किंवा विशेष शिक्षणक्रम यापैकी काहीच जवळ नसताना पुणे मित्रमंडळाच्या योजनेत मला संधी मिळेल असं माझ्या मनात यावं तरी कसं ? पण कै. रावसाहेबांनी या बातमीनं न कळत माझ्याच मनातला माझ्याबद्दलचा अविश्वास दूर केला म्हणेनास. ठरवलं होतं अगदी की पासपोर्टचं काम झालं की पहिल्यांदा रावसाहेबांकडे जायचं नमस्कार करायला. दुर्दैवानं अगदी अकस्मात आजारानं ते आमच्यातून कायमचे निघून गेले.

कै. रावसाहेबांनी शुभं-भवतु म्हणून मार्गी लावलेली योजना रीतसर पत्रव्यवहार होऊन प्रगत झाली. माझी फ्रेंच भाषेशी झटापट सुरू झाली. घरातली माणसं सोडून माझा पासपोर्ट हाती येईपर्यंत आम्ही फारसं कुठं बोललोच नव्हतो. तुलासुद्धा ही बातमी तशी उशीराच समजली असावी. हो नं ? माझ्या आणि मुलांच्या मनांची तयारी करत करत एकेक सोपस्कार पार पाडीत होते. संपूर्ण वर्षभर मुलांना सोडून दूर रहायचं म्हणजे गंमत नाही. मुलं तरी किती शहाण्यासारखी वागत होती म्हणून सांगू ? एका वर्षाच्या माझ्या गैरहजेरीत मुलंही खूपसं काही शिकून घेणार होती. स्वतंत्रपणानं रहाणं म्हणजे काय याचा हा वस्तुपाठच नव्हता का ?

जसजशी इष्टमित्रांना ही बातमी समजली, तशी चहा–जेवणासाठी निमंत्रण यायला लागली. परदेशी जायची संधी मिळाली म्हणजे मी काही महत्त्वाचं कार्य करणार आहे असं मलाच मुळी वाटत नव्हतं. त्यामुळे या निमंत्रणांचा स्वीकार करायला अतिशय संकोच वाटत होता. शिवाय तो वेळ वाचवला, तर मी माझी तयारी अधिक करू शकेन असही वाटत होतं. तयारी म्हणजे प्रथम माझा अभ्यास, प्रवासाबद्दलची जमेल तेवढी माहिती, फ्रान्सची माहिती, इतिहासाची थोडी ओळख, बरोबर नेण्याच्या रंगीत Slides चा तपशील ठरवणं वगैरे कितीतरी गोष्टी होत्या. शिवाय नेहमीची कामं होतीच. हे सर्व काही कसं उरकेल हे दडपण होतं. तेव्हा ही निमंत्रणं स्वीकारून नसलेल्या मोठेपणाचं धनी व्हायला नको या विचारानं दिलगिरी-पूर्वक मी 'नको' म्हणून कळवलं, जर माझा हा प्रवास व्यवस्थित झाला, यशस्वी झाला तर आल्यावर मी अगत्यान येईन असंही कळवलं होतं.

३० एप्रिल १९७० रोजी सर्वांचा निरोप घेऊन विमानात चढले. माया कशी असते बघ. 'माणूस'च्या कार्यालयात जेव्हाजेव्हा मी जाई तेव्हा माझ्या जाण्याच्या संबंधातील प्रगती बोलण्यात येत असे. कोण काय म्हणाले याची चर्चा होत असे. घरात माझ्या आईच्या समोरच ही बोलणी चालू असायची. बिचारी उघड तर काही बोलायची नाही. एक दिवस कोणी आसपास नव्हतं. मला म्हणते, 'कुमुद तुला तिकडे उतरवून घ्यायला कोणी आलं नाही तर काय करशील ग ? भाषा

अजून येत नाही.' तिच्या मनात चाललेली खळबळ, काळजी फक्त या एका वाक्यानं लक्षात आली. आजही मला तिचं हे वाक्य आठवतं व तिच्या मनातल्या कासाविशीची कल्पना येते.

विमानात गर्दी नव्हती. खिडकीशी जागा मिळाली. खिडकीची काच बाजूला करता आली असती तर हवी होती मला. विमानतळाच्या गच्चीवर सगळेजण मला अजूनही दिसू शकले असते. सगळं फार अंधुक होतं. पीटर बहुतेक सगळ्यात उंच, त्याचे पांढरे केस. तो ओळखायला आला. माधुरीनं मी बसमध्ये बसताना मारलेली 'आई' ही हाक कानांत घोळत होती. वर्षभर आता घराची सगळी जबाबदारी तिच्यावर टाकून निघाले होते.

एक का दोन सांगू तुला ! नाना प्रकारच्या आठवणींनी मनात असा धुमाकूळ घातला होता बघ. आज मागे वळून बघितलं, की माझंच मला खरं नाही वाटत की परक्या मुलखात, परक्या भाषेची फारशी ओळखदेख नसताना मी हे धाडस केलं कसं ? तुम्हा सर्वांच्या प्रोत्साहनामुळेच हे शक्य झालं असं मी समजते. माझं हे जाणं म्हणजे दोन संस्थांनी माझ्यावर व्यक्त केलेला विश्वास होता. मी त्यांच्या कसोटीला उतरेन ही जिद्द मनात होतीच.

विमान माझ्या विचारांची दखल न घेताच सुसाट चाललं होतं. सौदी अरेबियातील दुबाय विमानतळावर रखरखीत वाळवंटात पहिला एक तासाचा विमानाचा मुक्काम झाला. विमानातून पाय मोकळे करायला उतरणे आणि पुन्हा त्याच विमानात चढून बसणे एवढाच काळ इथे थांबलो. मला हसू आलं. संजीव आमचा मोठा गमत्या. मुंबईहून निघायच्या आधी म्हणतो, 'मावशे, अधेमधे विमानातून उतरशील तर उतर. पण पुन्हा नेमकी तुमच्याच विमानात चढून बैस हो. त्याचा काय नेम ! निघालीस पॅरिसला अन् जायचीस झांझीबारला.' नकळत विमानात चढताना AIR INDIA या ठळक अक्षरांकडे नजर गेली खरी.

दुसरा असाच पाऊण तासांचा मुक्काम कैरोला. इजिप्तची राजधानी. लहानपणी शाळेत स्फिंक्स, नाईल नदी, इजिप्तच्या राजघराण्यातील राजेरजवाड्यांना मृत्यूनंतर दागदागिने, जडजवाहिर, त्यांच्या जिवंत दासदासींना त्यांच्याबरोबर पुरण्याची पद्धत, ममीज आणि अशाच लक्षात राहिलेल्या मनोरंजक गोष्टींची या भूमीवर पाय ठेवल्याबरोबर आठवण आली. मुंबईपासून माझ्याजवळ बसलेले काही प्रवासी कैरोला उतरले. Business Managementच्या कोर्ससाठी ते भारतात आले होते. त्यांचा देश पहायला येण्यासाठी त्यांनी मला निमंत्रण दिलं. प्रवासात माणसाची औपचारिकपणाची कितीतरी बंधनं सुटून जातात नाही ? श्रीनगरमध्ये ओळख झालेल्या अमरनाथ चिरवींची आणि मद्रासमधल्या श्री. प्रसाद यांची उगीचच आठवण झाली. वाऱ्यापेक्षाही मनाच्या प्रवासाचा वेग कितीतरी जास्त आहे नाही का ?

आता मी खिडकीशी एकटीच होते. शेजारी कोणी नव्हतं. वाळवंटातील डोळे दिपवून टाकणारा रखरखीतपणा झपाट्यानं मागे पडत होता. विमान जिनिव्हाच्या दिशेनं सुसाट निघालं. वेळोवेळी घड्याळ मागं करण्याच्या सूचना मिळत होत्या. जिनिव्हाला विमानातून विमानतळावर जाईपर्यंत दातांवर दात आपटतील अशी थंडी. सदोदित स्वेटर जवळ बाळगण्याची सवय अजून व्हायची होती नं! गरम कपड्यांशिवाय बाहेर पडायचं नाही हा पहिला धडा येथे मिळाला. 'जिनिव्हा नंतर ४५ मिनिटांच्या प्रवासानंतर आपण पॅरिसला पोचणार' ही वार्ता मिळाली होती. माझी उत्सुकता अगदी शिगेला पोचली होती.

फ्रान्समधील पुणे मित्रमंडळाच्या प्रमुख चिटणीस श्रीमती सुझान ज्वीयरा यांचा ओझरता परिचय १९६७-६८ मध्ये झाला होता. माझा पहिला मुक्काम त्यांच्या घरी होणार होता. श्री. हेन्री (ऑरी) ज्वीयरा व त्यांची कन्या दोमिनिक हे विमानतळावर घ्यायला आले होते. माझ्या मोडक्या नव्हे तर अक्षरशः तुटक्या फ्रेंचचे हे पहिले बळी हं. पण मी इंग्रजीत न बोलता मोडक्या फ्रेंचमध्ये सुरुवात केल्याचा दोमिनिकला काय आनंद वाटला! पुण्यात असताना एकही सलग वाक्य मी बोलल्याचं मला आठवत नव्हतं अन् हा कंठ एकदम फुटला तरी कसा! गंमतच आहे.

पाऊस पडत होता. थंडी झोंबरी. गाडीतून भिरभिरी नजर फिरत होती. सांस्कृतिक जगतात फार पूर्वीपासून मानाचं स्थान प्राप्त झालेली पॅरिस नगरी. श्री. ऑरी म्हणालेसुद्धा, 'बघ, आल्या आल्या तुला Paris by night चंच दर्शन झालं.'

रस्ते शोधण्याचा, सापडण्याचा माझा उरक बेताचाच हे तुला माहीत आहेच. त्यातून सर्वस्वी परक्या वातावरणात, संध्याकाळच्या वेळी, पाऊस पडत असताना मोटरीतून कुठकुठल्या रस्त्यानं घरी पोचलो कोण जाणे. कधीपासून गाजत असलेली वीस किलो वजनाची अवजड बॅग हातात घेऊन श्री. ऑरी वर आले ते पाहून मला इतका संकोच वाटला. पण करते काय!

दारात मला पाहिल्याबरोबर घट्ट मिठी मारून सौ. सुझान ज्वीयरा म्हणाल्या, 'मला सुझान म्हणायचं, माझी धाकटी बहीण आहेस असं समजून रहायचं. आणि हवं नको ते सांगायचं.' माझ्या मनावरचं केवढं दडपण उतरलं म्हणतोस! मग माझ्या प्रवासाचा शीण जावा म्हणून स्नानाची तयारी करण्यापासून ते जेवण करून मी लवकर झोपावं म्हणून त्यांची केवढी लगबग. मुलांना ठेवून संपूर्ण वर्षभर रहाण्याच्या बेतानं आलेली मी. माझ्याकडे वारंवार बघून, पाठीवर प्रेमानं हात फिरवून धीर देणं अन्, एकीकडे तोंडानं सारखं या धाडसाचं कौतुक करणंही चाललं होतं त्यांचं.

३० एप्रिलला मी पॅरिसला आले. १ मे हा मित्रमंडळींना शुभेच्छा व्यक्त करण्याचा दिवस. म्युगे (Muget) नावाच्या फुलांची भेट देऊन ही मित्रत्वाची

भावना प्रकट करतात. सकाळी उठून मी सामानाची आवराआवर करत होते तोच दारावर टकटक. श्री. आँरी ज्वीयरा न्याहरीचा ट्रे घेऊन दारात उभे होते. ट्रे मध्ये म्युगेच्या फुलांचा गुच्छ होता. ती फुलं माझ्या हाती देत त्यांनी या १ मे चं फ्रान्समधील महत्व सांगितलं. २–३ दिवस लागोपाठ सुट्ट्या असल्यामुळे आपण सर्वजण आमच्या खेड्यातील घरी जाणार आहोत असं ते म्हणाले. 'तुझं आवरलं की बाहेरच्या खोलीत ये सहलीची तयारी पहायला.' सुझानची हाक तेवढ्यातच ऐकू आली. भाज्यांचे पॅकबंद डबे, फ्रोमाज (चीज), दह्याचे लहान लहान सुबक डबे, निरनिराळ्या प्रकारची सरबतं, लांबच लांब दांडक्यासारखा ब्रेड. ब्रेडचा हा प्रकार पाहून मला गंमतच वाटली. फ्रोमाजचे निरनिराळे प्रकार दाखवताना आँरी म्हणतात, 'आम्ही फ्रेंच लोक फ्रोमाज, वाईन व कॉफीचे फार वेडे हं. फ्रोमाजचे सुमारे ४०० प्रकार तयार केले जातात. जेवण झालं, की फ्रोमाज हवं. आणि कुठल्या फ्रोमाजबरोबर कुठली वाईन घ्यायची हे पण अस्सल फ्रेंच खवय्याला माहीत असतं. ते संकेत ठरलेले असतात. तसंच मद्यपानासंबंधीही ठराविक संकेत आहेतच. विवाह समारंभ शँपेन हे मद्य घेऊन वधूवरांचा मान ठेवला जाईल. द्राक्षापासून केलेलं मद्य जितकं जुनं तितकं त्याचं मोल जास्त. घरमालक मोठ्या अभिमानानं त्याचा इतिहास सांगेल.'

एकीकडे मला माहिती देता देता सामान व्यवस्थित भरण्याचं काम चाललंच होतं हं. दोमिनिकनं पाण्याच्या बाटल्याही टोपलीत भरल्या तेव्हा मला पीटरची आठवण झाली. तुला आठवतो का आमचा अमेरिकन मित्र पीटर हुक? तो म्हणाला होता, की युरोपमध्ये पाणी बाटल्यांमधून विकत मिळतं. पाणी फार प्यायची सवयच नाही त्यामुळे पुरतं ते.

२–४ दिवसांच्या सहलीची बोलबोल म्हणता झालेली तयारी बघून मला चुकल्यासारखं झालं बघ. तळणीचा वास नाही. मंडळींची लगबग नाही, मुलांचा कल्ला नाही म्हणजे काय ही ट्रिप झाली की काय? वातावरण निर्मितीचं काय? मनाला बजावलं, 'विसरा बाईसाहेब त्या बटाट्याची भाजी-शिरा पुरीला.'

अन् निघालोसुद्धा हें विचवाचं बिऱ्हाड घेऊन. पॅरिसपासून ३००–३२५ किलोमीटर्स अंतरावरच एक खेडं. संपूर्ण रस्ताभर मोटारींच्या रांगाच रांगा लागल्या होत्या. सलग सुट्टी असल्यामुळे पॅरिसमधील या धकाधकीच्या आयुष्यापासून निवांत जागी जाण्याचा हा केवढा उद्योग? केवढी हौस तरी? काही मोटरींच्या मागे Caravans होते. म्हणजे सुरेख रंगीत, आत सुशोभित, सुसज्ज असं छोटंसं चाकावरील घरच म्हणेनात. सर्व सुखसोयी त्यात असतात. मिनी घरच ते.

दुपारचं जेवण मध्येच एका खेड्यातला उपाहारगृहात घ्यायचं असा ज्वीयरा मंडळींचा रिवाज दिसला. मला काय आवडेल यावर दोघा पतिपत्नीत गंभीर विचार चालू होता. मला तर त्या मेन्यू कार्डवरील एक पदार्थ कळेल तर शपथ.

तरी मी त्यांना परोपरीनं सांगते आहे, की जे तुम्ही मागवाल ते मला चालेल. त्या हॉटेलच्या बाईंनी झटपट काही शाकाहारी पदार्थ करून आणले. मी मनापासून जेवावं यासाठी त्यांचाही आटापिटा दिसून येत होता. हॉटेलमधून बाहेर पडतांना मी आत जाऊन त्यांना नमस्ते करून निघाले.

खेड्यातील घर म्हणजे शहरातल्या घरापेक्षा कमी सुखसोयी असलेली असणार ही माझी कल्पना. पण टेलिव्हिजन पासून सर्व आधुनिक सुखसोयींचं असं हे श्री. ज्वीयरा यांचं घर होतं. भर म्हणजे जुन्या पद्धतीची शेकोटी. दुपारी ४–४॥ च्या सुमारास घरी पोचलो होतो. सायंकाळी हिंडायला निघालो मोटरीतूनच हं. ज्वीयरांचा १२–१४ वर्षांचा मुलगा ॲलँ याला घेऊन तेथील अश्वशाळेत गेलो. घोड्यावर बसायला या शाळेत शिकवतात. सुमारे १०–१२ मुलं-मुली आलेली होती. एक स्त्री शिक्षिका शिस्तीत शिक्षणाचं काम करीत होत्या. मुलांची भीती नाना प्रकारांनी बोलून घालवयाचा प्रयत्न चालू होता त्यांचा. त्यांचा पोषाख पाहून मला कुणाची आठवण झाली सांग बघू. हसू नकोस हं. अगदी लहानपणी अंदाज हा चित्रपट पाहिला होता. अगदी सुरुवातीलाच नर्गिस जिन्यावरून उतरताना दिसते ती अशा पोषाखात. बघ आता मनानं केवढा लांबचा पल्ला गाठला तो.

गावातून चक्कर मारताना लक्षात आली ती तेथील टापटीप. अगदी लहान लहान का होईना पण सुरेख स्वच्छ रस्ते, आटोपशीर घरं. घरांच्या, दुकानांच्या काचा स्वच्छ, शक्य तिथं छोटाशा बागा; सुरेख रंगांची फुलं. रस्त्यावर माणसं मात्र तुरळक. गरम कपड्यांमध्ये. वातावरण शांत. मधूनच कुठं मोटारींचा आवाज. तेथील रहिवाशांपेक्षा आमच्या सारख्या सुट्टीसाठी आलेल्यांचीच ये जा कदाचित जास्त असावी.

दोन दिवस ह्या व आसपासच्या खेड्यांमध्ये हिंडणं, शेकोटीभंवती गप्पा मारणं यात केव्हा गेले समजलं नाही. जसे सुटसुटीतपणानं पटकन आलो, तसे येथील घर आवरून, चकपक करून ठेऊन पॅरिसला जाण्यासाठी निघालोसुद्धा. पुन्हा मोटारींच्या लांबचलांब रांगा. दोन दिवस शांततेत, मोकळ्या हवेत घालवल्यानंतरचे प्रफुल्ल समाधानी चेहरे.

३ मे ला दुपारी २ च्या सुमारास पॅरिसला पोचलो, माझं सामान आवरून लगेच परत मोटरीत बसले व स्टेशनवर श्री. ज्वीयरांबरोबर आले. माझ्या ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणेच आज मला बेझाँसो या गावी पोचायचं होतं. ४ मे पासून फ्रेंच भाषेचा अभ्यासक्रम सुरू व्हायचा होता नं ! फ्रेंच रेल्वेनं हा पहिलाच प्रवास. गाडी सुटायच्या अगदी वेळेवर धापा टाकीत पोहचलो होतो. समोर दिसेल त्या डब्यात शिरलो. जेमतेम बॅग डब्यात ठेऊन श्री. ज्वीयरा खाली उतरले. तो डबा होता फर्स्ट क्लासचा. झाऽऽलं. आता तिकिटामधील फरक देणं भाग पडलं माझं तिकीट दुसऱ्या वर्गाचं. बरं कारे. फ्रेंच रेल्वेला फक्त दोनच वर्ग. तिसऱ्या वर्गाचे

डबे तेथे नाहीतच. गाडी सुरू झाल्यावर काही वेळाने आला तिकीट तपासनीस. आतापर्यंतच्या आयुष्यात भारतीय नाण्याशीच माझी जेथे जेमतेम ओळख झालेली तिथं चार दिवसात फ्रेंच चलन काय समजतंय कपाळ ? तो काहीतरी म्हणाला न् मी माझं तिकीट आणि हातात येतील त्या नोटा त्याच्यासमोर धरल्या. बहुतेक त्याच्या गुबगुबीत गालातल्या गालात तो हसला असावा. हिशेब करून त्यानं उरलेले पैसे परत दिले. सुटले एकदाची.

रात्री ९ वाजता बेझाँसो (Besancon)ला पोचले. श्री. व सौ. बेव्हालो, रने लिये व आणखी काही मंडळी असे स्टेशनवर आले होते. साडी नेसलेली भारतीय स्त्री शोधून काढणं मुळीच अवघड नव्हतं. श्री. ज्याँ, सौ. जेनव्हिएव्ह माझ्याशी इंग्रजीतून बोलावं लागणार, माझ्या आवडी निवडी कशा असतील वगैरे चिंतांनी जरा धास्तावलेलेच दिसले. त्यांच्याकडे मी महिनाभर रहाणार होते. मला पुण्याला असतानाच त्यांच्या कुटुंबाचा फोटो व त्या सर्वांची सविस्तर माहितीवजा पत्रं वरचेवर येत असत. नंतर कळलं, की त्यांच्या एका मित्राकडून ते इंग्रजी भाषांतरं करून पाठवत असत.

पहिल्याच रात्रीच्या जेवणाच्या वेळी टेबलाभोवतीच्या खेळीमेळीच्या वातावरणानं परकेपणाची भित दूर झाली. सर्वच कुटुंब फार सुसंस्कृत, उद्योगी आहे बरं का. रेकॉर्डर्स, कॅमेरे विकण्याचं त्यांचं दुकान आहे. दोघेही पति-पत्नी त्यात काम करतात. ज्याँ यांना सार्वजनिक कामकाजात भाग घ्यायची हौस. म्युनिसिपालिटीचे ते एक सभासद आहेत. १९६७ साली पुण्याला आमच्या संस्थेमार्फत आले होते आणि गंमत सांगू ? त्यावेळेला योगासनांच्या वर्गासाठी ते खडकीहून रोज सकाळी ७ ला पुण्यात येत असत. अजूनही अगदी नियमानं ते आसनं करतात. सौ. जेनव्हिएव्हही अगदी व्यवस्थित, चटपटीत आणि कर्तव्यदक्ष. ज्याँ सतत बाहेरच्या कामात. तेव्हा जेनव्हिएव्ह घराचा कारभार अगदी आत्मविश्वासानं चालवतात. यांना सात मुलं. सगळी एकापेक्षा एक रूपवान, सुदृढ, वागण्याबोलण्यात सुसंस्कृत. खरंच सांगते माझा पहिला दीर्घ मुक्काम या कुटुंबात आखला गेला हे अगदी भाग्य बघ. इतकं समजुतीनं, काळजीनं वागवलं प्रत्येकानं की विचारू नयेस. पुढच्या मुक्कामात सततच फ्रेंच शब्द अडायचे रे. अगदी छोट्या कॅथरीन व ल्युक पासून ज्याँ यांच्यापर्यंत सर्वजण डिक्शनरीच्या साहाय्यानं शब्द शोधून अडखळलेलं संभाषण चालू करायचे.

दुसरा दिवस उजाडला. धडधडत्या मनानं सकाळी ८ ला ज्याँबरोबर भाषेच्या शिक्षणासाठी कॉलेजमध्ये गेले. आवश्यक ती चाचणी होऊन प्रवेश मिळाला. लगेच अभ्यास सुरू झालाही. इंग्रजी व फ्रेंच शिक्षणाचे Audio-Visual अभ्यासक्रम येथे सतत चालू असतात. देशोदेशीचे लोक येत असतात. आवश्यक ते लहानमोठे अभ्यासक्रम करतात. अद्यावत वसतिगृहांची, दुपारी जेवणासाठी स्वस्त दरातील भोजनालयांची व्यवस्था त्यांच्यासाठी केली जाते.

पृष्ठ ६३ वर

" तिसरा खून ! "

" होय, तिसरा खून ! फरशीवर एका वृद्धाचा मृतदेह पडला होता. पाठीवर गोळीची जखम होती. लागोपाठ पडलेला तिसरा खून पाहून पोलिसांचेदेखील धाबें दणाणले. अंधारात कोणी तरी असल्याचा सुगावा लागला. त्या व्यक्तीला लगेच अटक करण्यात आली.

वसन्त डोळस

अठरा एप्रिल १९०९ ची संध्याकाळ. मी इटालीच्या गुप्तचर विभागाचे डायरेक्टर ल्यूची अनासाल्दी यांच्यासमोर खुर्चीवर बसले होते, याच खुर्चीवर बसवून त्यांनी कितीतरी गुन्हेगारांकडून कबुलीजबाब घेतले होते.

" आपण कार्न फोर्थ याना ओळखता का ? ते बोरेली बंगल्यातून बेपत्ता झाले आहेत. स्कॉटलंडयार्डला ते हवे आहेत ! "


" मीच त्याना लपवून ठेवलं आहे असंच तर आपल्याला म्हणायाचं नाही ना ?"

" तसा माझा म्हणण्याचा उद्देशही नाही. पण आपण आम्हाला मदत मात्र निश्चितपणे करू शकाल. कार्न फोर्थ सहा महिन्यांपूर्वीच इकडे आले होते हे मात्र आम्हाला माहीत आहे. ते हसतमुख व मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या बंगल्यात जाण्याची संधी फक्त दोघाच व्यक्तींना मिळाली होती. त्यातील एक आपण आहात. मी म्हणतोय हे खरं आहे ना ?"

इतके बोलून झाल्यावर त्यांची संशयी नजर माझ्या चेहऱ्यावर घिरट्या घालू लागली.

" होय ! मी श्रीमती केनेडी फास्टर या माझ्या मालकिणीचा संदेश घेऊन त्या बंगल्यावर जात असे !"

" आश्चर्याची गोष्ट म्हणजे तुमची मालकीणदेखील बेपत्ता आहे. त्यामुळे त्यांच्याकडून काही थोडी थोडकी माहिती मिळविण्याचीदेखील आशा मावळली आहे. पण आपण एक मात्र निश्चितपणे सांगू शकाल, की कार्न फोर्थ व श्रीमती फास्टर याचे संबंध कसे होते ?"




" असाधारण असे नव्हते ! "

" कार्न फोर्थ साहेब आपल्या बंगल्यात कोणालाच बोलावीत नसत. बंगल्यात काही तरी रहस्य असल्याशिवाय ते असं वागणार नाहीत. मग बंगल्यात असं कोणत रहस्य होतं ?"

" मला काहीच माहीत नाही ! "

" त्यांच्या परिचित अशा एखाद्या वृद्धेला आपण ओळखता का ?"

" नाही ! "

" पण नुकतेच आम्हाला कळले आहे, की कधी कधी रात्रीच्या वेळी कुरूप आणि वृद्ध अशी एक स्त्री हातात कसलीशी बॅग घेऊन बंगल्यात येत असे. तिच्यासाठी कार्न फोर्थ स्वत: दरवाजा उघडायला येत असत. सुमारे तासभर थांबून ती परत जात असे. पण तासाच्या अवधीत ते दरवाजा बंद करून घेत असत, कदाचित नोकरांच्या कानांवर आपलं बोलणं पडू नये यासाठी ते कदाचित ही खबरदारी घेत असावेत आणि त्यामुळेच बंगल्यातील एकाही नोकराला त्या वृद्धेबद्दल अजिबात माहिती नाही ! "

अनासाल्दीच्या मुद्रेवर चिंतेच्या छटा दिसू लागल्या.

" पण यात एवढं चिंता करण्यासारखं काय आहे ? कदाचित् ते बाहेर गेले असतील. येतील एक दोन दिवसात ! " मी म्हटलं.

अनासाल्दीने माझ्याकडे दृष्टिक्षेप टाकला. किंचितसं हास्य त्यांच्या मुद्रेवर विलसू लागलं. नंतर परत त्यांच्या मुद्रेवर गांभिर्य पसरलं आणि गंभीर होऊनच ते म्हणाले,

" आपल्याला गंभीरतेची कल्पना नाही, म्हणून आपण असे म्हणता. आपण जर गौप्यस्फोट करणार नाही अशी शपथ घेणार असाल तरच मी सर्व हकीकत आपणाला सांगेन !"

" मी आपणाला तसं वचन देते, की आपण सांगितलेल्या हकीकतीचा मी कोठेही गौप्यस्फोट करणार नाही !"

" आज दुपारी तीन वाजता मला स्कॉटलंडयार्डची तार मिळाली. त्यांनी मला कॉर्न फोर्थच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास सांगितलं आहे. एका भयंकर प्रकरणाच्या संदर्भात रोममध्ये ब्रिटिश राजदूत त्यांना पकडण्यासाठी वॉरंट मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत. मी यासाठी एका गुप्तहेराची नेमणूक केली आहे. चार वाजता बंगल्यातून एक वृद्धा बाहेर पडली आहे. त्यानंतर बंगल्यातून दुसरं कोणीही बाहेर पडलं नाही. दहा वाजता मी जेव्हा वॉरंट घेऊन तेथे गेलो तेव्हा ते तेथे नव्हते !"

" कदाचित वृद्धेचं रूप घेऊन ते बाहेर पडले असावेत !"

" या गोष्टीची शक्यतादेखील नाकारता येत नाही. बंगल्यात एक लोखंडी दरवाजा असलेली एक रूम आहे. नोकरांनी सांगितले, की ती कॉर्न फोर्थची अभ्यासाची रूम आहे. बराच प्रयत्न केला. पण तरीदेखील आम्हाला तो लोखंडी दरवाजा उघडता आला नाही. आम्ही लोखंडी कपाटं बनविणाऱ्या कंपनीकडून कुशल कारागीर बोलाविले आहेत. सध्या ते कदाचित लोखंडी दरवाजा उघडण्याच्या प्रयत्नातच असतील.

इतक्यात टेबलावरील फोन खणखणला. अनासाल्दींनी फोन उचलला. फोनवरचा संदेश ऐकून घेतल्यावर ते म्हणाले, " ठीक आहे. मी आता लगेच येतो !"

फोन खाली ठेवीत ते म्हणाले, " मी बोरेली बंगल्याकडेच चाललो आहे. तुम्ही येणार का माझ्याबरोबर ?"

मी मान हलवून लगेच होकार दिला. सहा महिन्यांपूर्वी लंडनमध्ये मी श्रीमती केनेडी फॉस्टर यांची परिचारिका म्हणून काम करीत होते. काही दिवसांनतर त्यांच्याबरोबर फ्लॉरेन्सला आले. श्रीमती फॉस्टर यांचा बंगला बोरेली बंगल्याच्या अगदी जवळच होता. ती एक श्रीमंत विधवा होती. देशोदेशींची पर्यटने हा तिचा आवडता छंद होता. आता ती फ्लॉरेन्समध्येच जवळजवळ स्थायिक झाली होती. तिची पत्रे घेऊन कॉर्न फोर्थना ती देण्याची कामगिरी ती माझ्यावर सोपवीत असे. पण फोर्थ साहेबांची वागणूक मला केव्हाच संशयास्पद वाटली नाही. बऱ्याच वेळा ते आमच्या मालकिणीच्या बंगल्यावर जेवणासाठी आले होते. माझी मालकीण वरचेवर ड्रेसडनला जात असे. काही दिवसांपूर्वीच त्या ट्रीस्टला गेल्या होत्या. दोन दिवसांपूर्वीच मला त्यांचं पत्र आलं आहे. त्या आता परत फ्लॉरेन्सला येणार नाहीत आणि आता तर कॉर्न फोर्थदेखील बेपत्ता होते व स्कॉटलंडयार्ड त्यांच्या मागावर होते.

थोड्या वेळाने आम्ही बोरेली बंगल्यावर येऊन पोचलो. कुशल कारागीर दरवाजा उघडण्याच्या उद्योगात होते. त्यातील एक कारागीर म्हणाला,

" हा दरवाजा आमच्या फर्मनेच बनविला आहे. कॉर्न फोर्थने हे गुप्त ठेवावयला सांगितलं होतं. ही रूम चांगली भक्कम आहे. हिच्या भिंती पोलाद आणि काँक्रीटच्या मिश्रणाने बनविल्या आहेत. "

" पण ही एवढी भरभक्कम रूम कशासाठी बनविली होती ? "

—अनासाल्दीने विचारले.

" आम्ही फक्त हुकुमाचे ताबेदार ! "

काही वेळानंतर कारागीरांच्या प्रयत्नाला यश येऊन रूमचा दरवाजा उघडला गेला. मोठ्या उत्सुकतेने आम्ही आत प्रवेश केला. मी एक भयंकर दृश्य पाहून मोठ्याने ओरडले. टेबलाजवळ कॉन फोर्थचा मृतदेह पडला होता. लाईटच्या प्रकाशात रक्ताचे डाग उठून दिसत होते.

" कदाचित अटकेपासून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी कॉर्न फोर्थने आत्महत्या केली असावी ! "—एक पोलीस अधिकारी म्हणाले.

अनासाल्दीने बारकाईने कॉर्न फोर्थचा मृतदेह न्याहाळला. त्यांच्या चेहऱ्यावर अनेक प्रश्न उभे राहिल्यागत दिसले. गंभीर स्वरात ते म्हणाले,

" ही आत्महत्या नाही. याचा जाणून बुजून खून करण्यात आला आहे. अंगावरील जखमा या त्यांच्या स्वतःकडून झालेल्या नाहीत. जॅकेटचे कापड जळल्यागत धुरकट झाले आहे. गोळी अगदी जवळून घालण्यात आली आहे. मारेकऱ्याने ती पाठीमागून झाडली ! "

अगदी सूक्ष्मपणे तपास करण्यात आला, पण कोणतेही शस्त्र सापडले नाही. अनासाल्दीने आदेश दिला, की आता कॉर्न फोर्थच्या तपासाची चक्रे थांबविण्यात यावीत. डॉक्टरांनी मृत देहाची तपासणी केली. त्यांनीही अनासाल्दीच्या मताला पाठिंबा दिला.

" पण मग खुनी बंद रूममधून बाहेर कसा काय गेला ? रूमचा दरवाजा तर आतून बंद होता. शिवाय रूमला खिडकी किंवा एखादी फटदेखील नव्हती ! " आपली शंका अनासाल्दीने बोलून दाखविली.

" पण खुन्याचा तपास लावणं हे तुमचं काम आहे. माझं मात्र स्पष्ट मत आहे, की कॉर्न फोर्थचा खून झाला आहे व खुन्याने पाठीमागून गोळी झाडली. गोळी बरीच मोठी होती ! " डॉक्टरने आपले मत स्पष्ट केले.

रूममधून प्रेत बाहेर काढण्यात आले व परत दुसऱ्यांदा रूमची सूक्ष्मपणे तपासणी करण्यात आली. पण काहीच पुरावा हाती लागला नाही.

" स्कॉटलंडयार्डकडून फोर्थ कोणत्या प्रकरणात संलग्न होता हे कळल्याशिवाय या खूनावर प्रकाश पडणार नाही ! " ...

निराशेच्या सुरात अनासाल्दी म्हणाले.

स्कॉटलंड यार्डकडून संध्याकाळी उत्तर आले. त्यामुळे तर या प्रकरणाने आणखीच गुंतागुंतीचे वळण घेतले. स्कॉटलंडयार्डकडून जी तार आली होती तीत पुढीलप्रमाणे मजकूर होता :–

" विलियम कॉर्न फोर्थच्या मृत्यूची बातमी आपण वर्तमानपत्रांना प्रसिद्धीसाठी देऊ नका. प्रेताची छायाचित्रे पाठवा. प्रकरण अत्यंत रहस्यमय असल्यामुळे अधिक माहिती देण्यास आम्ही असमर्थ आहोत क्षमस्व !"

" हे प्रकरण आत्महत्येचं नाही, तर खूनाचं आहे हे आपण स्कॉटलंडयार्डला कळविलं होतं का ?" मी विचारले.

" होय ! तरीदेखील लंडनचे पोलीस खातं प्रकरण दडपण्याच्या प्रयत्नात आहे. कॉर्न फोर्थ हे श्रीमती फॉस्टरचे मित्र होते की आणखी दुसरीच भानगड होती ? श्रीमती फॉस्टर बेपत्ता आहे आणि जेव्हा पोलीस खातं कॉर्न फोर्थच्या शोधात होतं नेमका त्याचवेळी त्यांचा खून झाला. कॉर्न फोर्थची आर्थिक स्थिती सर्वसामान्य अशीच होती. मग असं असतानादेखील बाँबचादेखील परिणाम होणार नाही इतकी भक्कम रूम त्यांनी का बनविली ? अशी कोणती बहुमोल वस्तू त्यांनी याठिकाणी लपवून ठेवली होती ? रात्रीच्या वेळी एक कुरूप वृद्धा त्यांना कशासाठी भेटायला येत होती ?"

असे एक ना दोन, किती तरी प्रश्न माझ्या मनात उभे आहेत. त्यांपैकी एकालाही मी अद्याप बरोबर उत्तर देऊ शकत नाही.

काही रहस्य असेल तर ते दुसरे तिसरे कुठे नसून याच रूममध्ये असेल आणि त्यासाठीच आणखी परत एकदा रूमची तपासणी करण्याचा विचार मी बोलून दाखविला.

" ठीक आहे. बोरेली बंगला अजून पूर्णपणे पोलिसांच्याच ताब्यात आहे !"

परत एकदा बोरेली बंगल्यातील त्या रूमची अगदी सूक्ष्मरीत्या तपासणी करण्यात आली. परंतु तरीदेखील कोणतीही संशयास्पद वस्तू हाती लागली नाही. मी शेवटी कंटाळून एका स्टुलावर बसले. पण अनासाल्दी इतक्या लवकर नाऊमेद होणारे नव्हते. त्यांनी एक स्टूल मागविला व त्यावर उभे राहून उंचावर टांगलेले फोटो उलटे पालटे करून पाहू लागले आणि शेवटी ते जवळजवळ ओरडलेच.

" सापडलं ! सापडलं !!"

" काय सापडले ?" स्टुलावरून उठतच मी विचारलं.

" गुप्त सेफ !" असे म्हणून त्यांनी फोटोच्या मागची छोटोशी तिजोरी उघडून त्यात हात घातला. त्यांच्या हाताला बरीचशी लहान मोठी रत्ने लागली.

" हे आहे या रूमचं रहस्य !"

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, की कॉर्न फोर्थ ही व्यक्ती रत्नं चोरीत असावी

आणि ह्याच तिचा धंदा असावा आणि हे पहा, ही सर्व रत्नं अलंकारांतून काढून आणल्यासारखी वाटतात. पण हा जर जगविख्यात चोर असता तर तो माझ्या निदान आठवणीत तरी असता. कदाचित ही सर्व रत्नं इंग्लंडहून चोरून आणलेली असावीत आणि म्हणूनच लंडनचं पोलिस खातं याच्या शोधात असावं!"

एका दमात अनासाल्दींनी आपल्या मनातील विचार बोलून दाखविला.

"आणि या रत्नांसाठीच कदाचित कॉर्न फोर्थचाही खून झाला असावा!" मी माझा विचार बोलून दाखविला.

"कदाचित आपल्या जोडीदारांना फसवून हा इकडे पळून आला असावा आणि संधी साधून त्याच्या जोडीदारांनीच त्याचा अशारीतीने काटा काढला असावा!"

पण ह्या सर्व कल्पना होत्या. कॉर्न फोर्थचा खून केल्यावर खुनी बाहेर कसा गेला? या प्रश्नाचं उत्तर अजून देखील मिळालं नव्हतं.

"कदाचित हा खून त्यांना भेटावयास येणाऱ्या त्या वृद्धेने तर केला नसावा?" मी माझी शंका बोलून दाखविली.

आपल्या विचाराशी मी तरी सहमत होणार नाही. कारण ती वृद्धा वरचेवर येऊन त्यांना भेटत होती. यावरून त्यांचे संबंध चांगले असावेत हीच गोष्ट अधिक स्पष्ट होते!"

त्याठिकाणी सापडलेली मौल्यवान रत्ने ब्रिटिश कॉन्सलच्या स्वाधीन करण्यात आली.

त्या घटनेला बरेच दिवस झाले. हळूहळू त्या रहस्याचा विचार करण्याचे मीदेखील सोडून दिले होते. एके दिवशी अनासाल्दीच माझ्याकडे आले.

"त्या प्रकरणावर काही प्रकाश पडला की नाही?"

"अहो, त्या प्रकरणावर प्रकाश पडणं तर बाजूलाच राहिलं. पण त्या बोरेली बंगल्यात आमच्याच गुप्तचर विभागातील एक अधिकारी ब्रूनो यांचा खून झाला!"

"पण खुनी त्या ठिकाणी आला कोठून?"

"गुन्हेगार प्रवृत्तींशी मी चांगलाच परिचित आहे. गुन्हेगार हातून गुन्हा पडल्यावर परत एकदा घटनास्थळी जात असतो. आणि तो परत रत्नंच पळवून नेण्यासाठी आला असावा. आणि म्हणूनच त्याही अगोदर सावधगिरीचे उपाय म्हणून मी दोन गुप्तचर अधिकारी, ब्रूनो आणि मेर्ली यांना टेहळणीसाठी त्याठिकाणी ठेवले होते. आणि ते आळीपाळीने आपली टेहळणीची कामगिरी पार पाडीत होते.

आज सकाळीच मेर्ली जेव्हा बोरेली बंगल्यावर गेला व बाहेरची घंटी वाजविली तरीदेखील ब्रूनो दरवाजा उघडण्यासाठी बाहेर आला नाही. नंतर बाजूची खिडकी फोडून मेर्ली आत गेला, तर ज्या रूममध्ये कॉर्न फोर्थचा खून झाला त्याच ठिकाणी ब्रूनोचाही मृत देह पडल्याचं त्याला दिसलं."

" ब्रूनोवरदेखील गोळी झाडून त्याचा खून करण्यात आला होता !"

"आणि हेच मेर्लीने फोनवरून सांगितले. मी आता बोरेली बंगल्याकडेच चाललो आहे. वाटलं. आपल्यालाही बरोबर घेऊन जावं म्हणून आपल्याकडे आलो."

ब्रूनोच्या हृदयाजवळ नेमकी जखम झाली होती. बंगल्यातील दिवे अजूनही तसेच पेटलेले होते. रूममधील कोणत्याही वस्तूला मेर्लीने सावधगिरी म्हणून हात लावला नव्हता.

अनासाल्दींनी ब्रूनोचा मृत देह काळजीपूर्वक नजरेखालून घातला. डॉक्टरपण आले. त्यांनी लगेच ब्रूनोच्या मृत देहाची तपासणी केली व स्वतःचा निष्कर्ष काढला, की कॉर्न फोर्थचा खून ज्या पद्धतीने करण्यात आला अगदी त्याच पद्धतीने ब्रूनोचाही खून करण्यात आलेला आहे !

त्यांनी आपले असेही मत दिले, की कॉर्न फोर्थ आणि ब्रूनो या दोघांचा खून करणारी व्यक्ती एकच असावी.

त्या रूमची परत बारकाईने तपासणी करण्यात आली तरी देखील रिव्हाल्वर आढळली नाही.

काही दिवसांनी माझी बहीण आजारी पडली म्हणून मला इंग्लंडला जावे लागले. माझी बहीण तेथील फ्रेंच वकिलातीत नोकरीला होती. सहज बोलता बोलता कॉर्न फोर्थच्या खुनाची हकीकत मी फ्रेंच वकिलांच्या कानांवर घातली. त्यांना ते ऐकून भलतेच आश्चर्य वाटले. दुसऱ्या दिवशी ते मला घेऊन स्कॉटलंड-यार्डच्या ऑफिसात गेले. तेथील चीफ इन्स्पेक्टर स्टिफेन्सने आमचं हसतमुखानं स्वागत केलं.

" आपण कॉर्न फोर्थना ओळखत होता काय ?" त्यांनी पहिलाच प्रश्न मला विचारला.

" होय. त्यांच्या फ्लॉरेन्समधील बोरेली बंगल्याच्या नजीकच मी रहात होते !"

" इटालीच्या पोलीस खात्याप्रमाणे आमच्याही खात्याला या प्रकरणाने पेचात टाकले आहे. त्या रूममध्ये सापडलेल्या वस्तूंपैकी काही वस्तू चोरीस तर गेल्या नाहीत ना ?"

" तसं काही नाही. त्याठिकाणी जी रत्नं सापडली ती सर्व बँकेत सुरक्षित आहेत !" मी उत्तरले. नंतर मी भीतभीतच विचारले,

" आपण कॉर्न फोर्थच्या मागे कशासाठी लागला होतात ?"

" हे प्रकरण अत्यंत गंभीर आणि रहस्यपूर्ण आहे. आणि गृहखात्याचादेखील तसा आदेश होता म्हणून आम्ही मागेही काहीच कळवू शकलो नाही व आता-देखील ते सांगण्यास असमर्थ आहे !"

" पण आपण जी गुप्तता राखीत आहात त्यामुळे अनासाल्दी भलतेच वैतागले आहेत !"

"ते वैतागणे स्वाभाविकच आहे. पण आम्ही ते सांगण्यास असमर्थ आहोत. आम्ही कॉर्न फोर्थला अटक करून सुरक्षित ठेवणार होतो, पण तो प्रश्न आता त्यांच्या खुनानेच सोडविला आहे!"

चीफ इन्स्पेक्टरच्या या वक्तव्याने त्या प्रकरणाभोवती अधिकच रहस्यमय वलये चढली. मी खूप प्रयत्न केला, पण कॉर्न फोर्थ प्रकरणी काहीही सांगण्यास त्यांनी स्पष्टपणे नकारच दिला.

"त्या कुरूप वृद्ध स्त्रीबद्दल आपणाला काय वाटते?"

मी विचारले.

"माझ्या दृष्टीने त्या म्हाताऱ्या वृद्धेला फारच महत्त्व आहे. मला वाटतं तुमची मालकीण श्रीमती केनेडी फॉस्टरच म्हाताऱ्या स्त्रीचं रूप घेऊन रोज रात्री कॉर्न फोर्थला भेटायला जात असावी!" चीफ इन्स्पेक्टरने आपला विचार बोलून दाखविला.

श्रीमती केनेडी फॉस्टर...एका वृद्धेच्या रूपानं! मला त्यांचे अनुमान असंभवनीय असं वाटलं नाही. आता त्या साऱ्याच प्रकरणाकडे मी दुसऱ्या दृष्टिकोनातून पाहू लागले.

"श्रीमती फॉस्टर सापडल्या का?" मी विचारलं. "नाही. त्याचप्रमाणे कॉर्न फोर्थचा एखादा वारसही आम्हाला आढळला नाही!"

आम्ही त्यांचा निरोप घेऊन बाहेर पडलो.

इंग्लंडमध्येच एक रूम घेऊन मी राहू लागले. एके दिवशी आमच्या रूमच्या मालकिणीने मला येऊन सांगितले, की 'तुमच्याकडे पाहुणे आलें आहेत!"

"माझ्याकडे आणि पाहुणे?"

"होय हे त्यांच्या नावाचं कार्ड!"

कार्ल फ्लूजेल! मी हे नाव कधी ऐकलंही नव्हतं आणि त्या नावाची एखादी व्यक्तीही यापूर्वी माझ्या पहाण्यात आली नव्हती. तरीदेखील त्यांना भेटण्यास मी नकार दिला नाही.

थोड्या वेळाने एक वृद्ध आला. त्याचे डोक्यावरचे केस पांढरे फटक दिसत होते व त्याने दाढी वाढविली होती. सोनेरी फ्रेमचा चष्मा डोळ्यांवर अडकविला होता. अंगातील सर्वच कपडे सैल असेच होते. त्याच्याबरोबर एक सुंदर अशी तरुणीही होती. तिचं वय विशीच्या दरम्यान असावं, तिचा चेहरा मात्र एखाद्या लहान बालकाप्रमाणे निष्पाप दिसत होता.

"आपल्याला आमच्या येण्यामुळे जो त्रास झाला असेल त्याबद्दल क्षमा करावी!" जर्मनी भाषेच्या ढंगात तो फ्रेंच भाषेत म्हणाला.

"अहो, यात त्रास कसला, बसा की!"

दोघेजण बसली. माझ्या नजरेला नजर भिडवीत फ्लूजेल म्हणाला, "उगीच


ही पहा-
कपडे धुण्यासाठीं
डिटर्जंट शक्तिशाली वडी
कपडे कितीहि घोळले तरी स्वच्छ निघतच नाहीत मुळी. मला वाटतं, या पाण्यामुळें होत असावं असं.
अग, पण मी याच पाण्याने धुते ना कपडे ? मग माझे कपडे कसे स्वच्छ निघतात? हां, पण मी साबण मात्र वापरीत नाही.
असं ? मग वापरतेस तरी काय तू ?
आता मिळू लागलेली डिटर्जंट वडी.
काय असते तीत एवढं ?
तिच्यात असते डिटर्जंट शक्ति. तिनं फेस तर चांगला येतोच पण शिवाय साबणापेक्षा ती कितीतरी प्रभावी असते. तिनं कपडे स्वच्छ नि उजळ निघतात. नीळ किंवा इतर तसलं काही वापरण्याची आवश्यकता नसते.
अगदी खरं ! उटर्जंट वडीने साबणापेक्षा दीडपट कपडे धुतले जातात. त्यामुळे तिचा वापर करणं खूप काटकसरीचं होतं !
NEW det
डेट डिटर्जंट वडी
५०% कपडे अधिक धुणारी
अन् तेही साबणापेक्षा अधिक शुभ्र.
पाणी कसेहि असो–अगदीं क्षारयुक्त असलें तरी !

आडवळणानं बोलणं मला पसंत नाही. एकदम मुद्दयालाच हात घालू. मला असं कळलं आहे, की माझे दिवंगत मित्र कॉर्न फोर्थला आपण ओळखत होता !"

कॉर्न फोर्थ नाव ऐकताच माझ्या काळजाचे ठोके जोराने पडू लागले. रहस्यमय व्यक्ती—कॉर्न फोर्थ व त्याचा मित्र आता माझ्यासमोर उभा होता. जर यावेळी स्कॉटलंडयार्डचे चीफ इन्स्पेक्टर स्टिफन्स व इटालीच्या गुप्तचर विभागाचे डायरेक्टर अनासाल्दी येथे असते तर...!

"होय, मी त्यांना ओळखते. फ्लॉरेन्सहून इथे येऊन मला फक्त दहाच दिवस झाले आहेत !"

"आपण श्रीमती केनेडी फॉस्टरबरोबर रहात होता ना ? मग कधी काळी बोरेली बंगल्यावरदेखील गेला असाल ?"

"होय. आपल्या मित्राचा मृत देह मिळाला तेव्हा मी पोलिसांबरोबर गेले होते !"

"त्या दुर्घटनेची माहिती मला तारेने मिळाली !"

"आपल्याला कोणी तारेने ही हकीकत कळविली ?"

"कॉर्न फोर्थच्या एका विश्वासू मित्राने !"

ती तरुणी मात्र आम्हा दोघांचे संभाषण शांतपणे ऐकून घेत होती.

"कॉर्न फोर्थच्या मृत्यूचं रहस्य अजून उजेडात आलेलं नाही. आपण जर ते कृपा करून सांगितलं तर...!"

"नाही तर आपण प्रत्यक्ष इटालीच्या पोलीसखात्याबरोबरच संपर्क प्रस्थापित करा. त्यांनाही कॉर्न फोर्थच्या परिचितांना भेटायचे आहे !"

"हे सारं मला माहीत आहे. त्यांनी त्यासाठी वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिराती-देखील मी प्रत्यक्ष वाचल्या आहेत. बोरेली बंगल्यात जी मौल्यवान रत्नं सापडली आहेत. त्यावर फोर्थच्या वारसाचाच हक्क पोहोचतो आणि फोर्थची वारस आहे ही तरुणी !"

फ्लूजेलने तिच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हटलं.

मी त्या तरुणीकडे पाहिलं. तिचे डोळे आसवांनी डबडबले होते. ती म्हणाली, "दोन वर्षांपासून आमची गाठभेट नाही. ते फ्लॉरेन्समध्ये आहेत, याची मला कल्पनाच नव्हती !"

फ्लूजेलच्या आग्रहाखातर मी कॉर्न फोर्थचा मृत्यू व सापडलेली रत्ने या संदर्भात सर्व माहिती सांगितली. गुप्तचर विभागातील एक अधिकारी ब्रूनो यांच्या मृत्यूचीही हकीकत ऐकून तिला वाईट वाटलं.

"माझ्या वडिलांचा मृतदेह ज्या अवस्थेत सापडला, त्याच अवस्थेत ब्रूनोचा देह सापडला काय ?"

"होय !"

ती तरुणी काही तरी बोलणार होती, पण तिला बोलू न देता फ्लूजेल मध्येच म्हणाला, "त्या रत्नांवर याच मुलीचा आता हक्क आहे. पण दुर्भाग्य असं, की सध्या तसं स्पष्टपणे बोलताही येत नाही !"

"का ? पोलीस हिला त्रास देतील ?"

"वडिलांचं रहस्य सांगण्यास ते मला भाग पाडतील !"

"इटालीच्या पोलीसखात्यालादेखील त्या रूमचं रहस्य अद्याप कळलेलं नाही !"

"पण ते रहस्य स्कॉटलंडयार्डला माहीत आहे !" फ्यूजेल उत्तरला.

"पण स्कॉटलंडयार्ड आपल्या मित्राच्याच मागे का लागले होते ?"

त्यावर फ्लूजेलने टोलवाटोलवीचेच उत्तर दिले.

तो म्हणाला, "बोरेली बंगल्याच्या एका रूममध्ये जे खून झाले आहेत व त्यामुळे जे रहस्य निर्माण झाले आहे ते शेवटपर्यंत रहस्यच राहील. लंडनच्या आणि इटालीच्या पोलीसखात्यालादेखील त्या रहस्याचा शेवटपर्यंत थांगपत्ता लागणार नाही. खुनाचे रहस्य शेवटपर्यंत खुन्यालाच ठाऊक राहील !"

"खुनी ?"

"होय. ते रहस्य मला माहीत आहे. पण ते माझ्याकडून अखेरपर्यंत कोणालाही कळणार नाही !"

"आपल्या मित्राचा खून करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा झाली पाहिजे, असं आपणाला नाही का वाटत ?"

"आपण कृपा करून ती माहिती पोलिसांना द्यावी !" कॉर्न फोर्थची तरुण मुलगी कळवळून म्हणाली.

"मी सांगेन, पण फक्त एका अटीवर. पोलीस खात्याने रत्नांचा निम्मा वाटा तुला दिला पाहिजे व निम्मा मला. परंतु तू पुढे येऊ शकणार नाहीस. कारण तुला जे रहस्य ठाऊक आहे, ते त्या रत्नांपेक्षाही अधिक मोलाचं आहे !"

"पण ही तरुणी पुढे आली तर बिघडलं कुठं ?"

"कारण हिच्याबद्दल सर्व जगाने अशी कल्पना करून घेतली आहे, की ही दिवंगत झाली आहे. पोलीस खात्याने हिच्या पाठीमागे लागू नये म्हणून हिने आत्महत्या केल्याचं केवळ नाटक रचण्यात आलं होतं !"

"पण ही जिवंत असल्याचं कळलं तर असा कोणता भयंकर परिणाम होईल?"

"कल्पनाही करवत नाही इतका भयंकर परिणाम होईल. वडिलांचे रहस्य मला शेवटपर्यंत सुरक्षित ठेवायचे आहे. कृपा करून बाहेर कोठेही मी आपल्याला भेटल्याचं सांगू नका !"

मिस् कॉर्न फोर्थ कळवळून म्हणाली. मी तिला तसं वचन दिलं. नंतर दोघेही निरोप घेऊन निघून गेली.

काही दिवसांनंतर मी परत फ्लोरेन्सला आले. अनासाल्दी अजूनही त्या

प्रकरणाचे धागेदोरे उघडयावर आणण्याच्या प्रयत्नात होते. मी त्यांना चीफ इन्स्पेक्टरच्या भेटीचा वृत्तांत सांगितला. पण फ्लूजेल व कॉर्न फोर्थच्या मुलीबद्दल अवाक्षरदेखील सांगितलं नाही.

एके दिवशी अनासाल्दीने मला बोलावून घेतले. ते प्रसन्नचित्त दिसत होते. मला पहाताच म्हणाले, " या प्रकरणात आशेचा किरण दिसू लागला आहे. या प्रकरणी आम्ही एकाला अटक केली आहे.

आज सकाळी त्या बंगल्याजवळून जाणाऱ्या एका व्यक्तीला एका रूममध्ये प्रकाश दिसला. त्याने लगेच पहारेकऱ्याला खबर दिली. पहारेकऱ्याने लगेच मदतीला काही पोलीस घेऊन तिकडे मोर्चा वळविला. ठाऊक आहे काय मिळालं असेल ?"

" एखाद्या संशयिताला अटक करण्यात आली असेल ! "

" नाही. त्या रूममध्ये आणखी एकाचा मृत देह मिळाला आहे ! "

" मृतदेह ! " खुर्चीवरून उठत मी म्हणाले,

" तिसरा खून ! "

" होय, तिसरा खून ! फरशीवर एका वृद्धाचा मृतदेह पडला होता. पाठीवर गोळीची जखम होती. लागोपाठ पडलेला तिसरा खून पाहून पोलिसांचंदेखील धाबं दणाणलं. अंधारात कुणीतरी असल्याचा सुगावा लागला. त्या व्यक्तीला लगेच अटक करण्यात आली.

त्याचवेळी दरवाजा उघडला गेला. आणि दोघा गुप्तचरांसमवेत एक तरुणी बाहेर पडली.

माझा स्वतःच्या डोळयांवर विश्वास बसेनाच कारण ती तरुणी दुसरी तिसरी कोणी नसून कॉर्न फोर्थची मुलगीच होती. तिलाच बंगल्यात अटक करण्यात आले होते.

मी तिला ओळखत नाहीच असा अविर्भाव आणला. पण तिने दम धरला नाही. मला पहाताच माझ्याकडे आली आणि मला बिलगली. आणि म्हणाली,

" मला वाचवा ! तुम्ही माझ्या बहिणीसारख्या आहात ! " ते ऐकून अनासाल्दी माझ्याकडे पाहू लागले.

ती पुढे म्हणाली,

" माझ्या वडिलांचा खून ज्या ठिकाणी झाला ते ठिकाण पाहण्याचा मोह मला आवरता आला नाही. इथे आले हा माझा मूर्खपणाच झाला म्हणायचा ! "

" वडील ? कॉर्न फोर्थ आपले वडील ?" अनासाल्दीने विचारले.

पण तो प्रश्न न ऐकलासा करून ती पुढे म्हणाली,

" फ्लूजेलच्या विनंतीवरून मी बोरेली बंगल्यात माझ्या वडिलांच्या त्या अभ्यासाच्या रूमचं निरीक्षण करण्यासाठी आले होते ! "

अनासाल्दी म्हणाले, " प्रथम माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. तू कॉर्न फोर्थची मुलगीच

का ?"

"होय !"

माझ्याकडे पहात अनासाल्दी म्हणाले, "तुमचा दोघींचा बराच जुना परिचय दिसतोय ?"

"होय. पण मी तिला तसं वचन दिलं होतं. म्हणून हिच्या संदर्भात मी आपणाला काहीच सांगितलं नाही !"

"आपण आता सर्व काही सविस्तर सांगा ?" अनासाल्दी फोर्थच्या मुलीला उद्देशून म्हणाले.

"आम्ही एका खिडकीतून बंगल्यात उतरलो. फ्लूजेल माझ्या वडिलांच्या अध्ययन करण्याच्या रूमचं बारकाईने निरीक्षण करू लागले. मी बंगल्यातील इतर रूम्सचं निरीक्षण करण्यासाठी वरच्या मजल्यावर गेले. थोडया वेळाने खाली परतले तर त्यारूममध्ये फरशीवर पडलेला फ्लूजेलचा मृत देह आढळला."

"पण तुम्ही बंगल्यात कशासाठी शिरलात ?"

"हे मी सांगणार नाही !"

"सांगणार नसाल तर आपल्याला तुरुंगात खितपत पडावं लागेल. आपल्याला माहीत नाही काय ! की, कॉर्न फोर्थच्या वारसासाठी आम्ही अनेक वृत्तपत्रांमधून जाहिराती दिल्या होत्या !"

"वाचल्या होत्या !"

"मग आमच्याबरोबर संपर्क प्रस्थापित न करता आपण अशा अंधारात का राहिलात ?"

"हे कारणदेखील मी आपणाला सांगू शकत नाही !"

काही क्षण थांबून अनासाल्दींनी विचारले,

"हे फ्लूजेल कोण ?"

"माझ्या वडिलांचे अगदी जवळचे मित्र !"

"मग आता त्यांचा खून कोणी केला असावा ?"

"हे मला कसं काय सांगता येईल ?"

"मी आपणाला एक विचारू का ?"

"विचारा की !"

"माझ्या वडिलांचाही खून अशाच रीतीने पाठीमागून करण्यात आला होता काय ? रूममध्ये गोळी सापडली होती ?"

"नाही. गोळीही सापडली नाही आणि तिची रूमच्या भिंतीवर उमटलेली खूणही दिसली नाही व रूममध्ये रिव्हाल्वरदेखील सापडलं नाही !"

"काहीच सापडणार नाही याची मलादेखील अगोदर पासून चांगलीच कल्पना होती.

" आपणाला जर हे सारं रहस्य ठाऊक आहे. मग आपण अनासाल्दींना सांगून का टाकीत नाही ? आपली इच्छाच असेल तर अनासाल्दी स्कॉटलंडयार्डपासून हे रहस्य दूर ठेवतील !"

अनासाल्दीही लगेच म्हणाले,

" मी आपणाला वचन देतो. आपण हे सारं रहस्य सांगून टाका !"

ममतेने तिच्या पाठीवर हात टाकून मी विचारले,

" फ्लूजेलला माझा पत्ता कोणी सांगितला ?"

" वडिलांनी पत्राने अगोदर आपलं नाव सूचित केलं होतं. वडिलांनी एकदा नकळत एक भलतंच रहस्य श्रीमती फॉस्टर यांना सांगून टाकलं होतं. व नंतर ही चूक लक्षात आल्यावर त्यांनी आपले जवळचे मित्र फ्लूजेल यांचा सल्ला मागितला. फ्लूजेलने सल्ला दिला, की हे रहस्य अबाधित ठेवण्यासाठी तुम्ही दोघांनी आत्महत्या करावी !"

" पण ते रहस्य कोणतं ?" मी विचारले.

त्यावर ती म्हणाली, " आपण मला परत त्या बंगल्याकडे घेऊन चला !"

लगेच तिला घेऊन आम्ही बंगल्यातील त्या रहस्यमय रूमकडे गेलो. लगेच फोर्थची मुलगी म्हणाली,

" सावध – प्रथम मला पुढे होऊ द्या !"

आम्ही जागच्या जागीच थांबलो. ती रूमचे आतून सूक्ष्म रीतीने निरीक्षण करू लागली. ती हळूहळू पुढे सरकली व स्विच बोर्डकडे सरकली. बटन्स दाबली आणि बंद केली.

दिवे लागले. विझले.

" आपण सर्व भिंती तपासल्या आहेत काय ?"

" होय !"

" परत एकदा तपासा !"

हातोडी आणि छन्नीचा आवाज सर्वत्र घुमू लागला. एके ठिकाणी एका भिंतीतला वर्तुळाकार तुकडा हलू लागला. लगेच फोर्थची मुलगी ओरडून म्हणाली,

" सापडला !"

तिने तो तुकडा हळूच काढून घेतला. आत बॅटरी होती. त्या ठिकाणी आत बऱ्याच बॅटऱ्या सापडल्या.

इतक्यात अचानक हातोड्याच्या प्रहाराने भिंतीचा एक तुकडा निखळून खाली पडला व त्याबरोबरच एका मशीनचा एक भाग खाली पडला व खाली फरशीवर पडून त्याचे तुकडे झाले, त्यामुळे आत बसविलेले मशीनही निकामी झाले.

" हे मशीन आपल्या वडिलांनी बनविलं होतं ?" अनासाल्दींनी विचारले.

" होय. हे अद्भुत मशीन वडिलांनी बनविलं होतं व त्यासाठी त्यांनी आपल्या

जीवनातील बरीचशी वर्षं खर्ची घातली आहेत. प्रथम या मशीनच्या संदर्भात माझ्या वडिलांनी ब्रिटनच्या संरक्षण खात्याला कळविलं होतं. पण अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केलं. नंतर माझे वडील दुसऱ्या देशात वास्तव्यास गेल्यावर ब्रिटनच्या स्कॉटलंड यार्डला भीती वाटू लागली, की ह्या मशीनचं गुपित त्यांनी परकीय देशाला विकलं तर ? पण माझे वडील देशद्रोही नव्हते. ते दुसऱ्या देशात राहून आपल्या मशीनमध्ये आणखी सुधारणा करीत होते. आणि यासाठीच त्यांनी बोरेली बंगल्यात ही खास रूम बनवून घेतली होती. त्यांच्या या उद्योगामुळे माझ्या आईलादेखील घरदार सोडून त्यांच्यामागे इकडे यावं लागलं ?"

"आपल्या आई इकडे रहात होत्या ?" अनासाल्दीने आश्चर्यचकित होऊन विचारले.

"होय. विधवा श्रीमती केनेडी फॉस्टरच्या रूपात ती येथे वावरत होती !"

"आता आलं लक्षात. आणि ते मशीन ?"

"डॅडी हर्टजियन किरणांना केंद्रित करून ते विशिष्ट दिशेने सोडण्याच्या प्रयत्नात यशस्वी ठरले होते. हे किरण लोखंडाच्या खांबावर सोडले तर त्याचंदेखील वितळून पाणी होत असे. लंडनमध्ये त्यांनी हा प्रयोग गुपचुपणे रात्रीच्या वेळी रस्त्यावरून जाणाऱ्या माणसांवर केला. व परिणामस्वरुप किरणाच्या कक्षेत सापडणारी माणसं धडाधड जमिनीवर कोसळू लागली. प्रेते सापडत पण खूनी सापडत नव्हता. एका वैज्ञानिकाने स्कॉटलंडयार्डला सांगितले, की हा सारा हर्टजियन किरणांचा प्रताप आहे. साहजिकच पोलिसांचे लक्ष वळले वडिलांकडे !


"मग फोर्थ, ब्रूनो, फ्लूजेल यांचे खून कोणी केले ?"

"या मशीनने ! चुकून डॅडी मशीनचं बटन बंद करायचं विसरले असावेत व नकळत किरणांच्या कक्षेत येऊन त्यांचा बळी पडला. नंतर ब्रूनो व त्यानंतर फ्लूजेल !"



# प्राक्तन

## "60,00,000 ACCUSERS"



इस्रायलचे अॅटर्नी जनरल गिडाँ हाजनेर यांच्या

**60,00,000 ACCUSERS** या पुस्तकाचा धावता परिचय.

**उत्तरार्ध : चित्तरंजन घोटीकर**

न्या. हॅलवे : हा जाहीरनामा आरोपीनं स्वखुषीनं लिहून दिला आहे, असं आप-ल्याला म्हणायचं आहे ?

अॅ. जनरल : तसा तो आहे किंवा नाही, याला मुळीच महत्त्व नाही. हा खटला चालविण्याच्या या कोर्टाच्या आधिकाराच्या मुद्यासंबंधात त्याला कायदेशीर मोल शून्य आहे. मी त्याचा उल्लेखही केला नाही. स्वतःचा स्वार्थ साधताना तो कायदेशीर ठरतो नि इतर बाबतीत मात्र बेकायदेशीर ठरतो, ही दुटप्पी भूमिका काय म्हणून ? एकतर हा जाहीरनामा संपूर्णपणे बेकायदेशीर मानला पाहिजे किंवा सर्वार्थानं कायदेशीर तरी धरायला पाहिजे. दोन्ही भूमिका कशा मान्य होऊ शकतील ? आणि कोर्टानं जर हा जाहीरनामा कायदेशीर ठरवून, पुरावा म्हणून दाखल करून घेतला, तर मात्र मी आरोपीविरुद्ध त्याचा आधार घेऊन, हवा तसा त्याचा उपयोग करायला मोकळा राहीन, हेही ओघानंच आलं. माझा विरोध आहे, तो दुटप्पी भूमिकेला.

डॉ. सरव्हॅशियस : जाहीरनाम्यासंबंधात दोन भिन्न गोष्टी आहेत. एक: बळ-जबरी, दडपणामुळे या कोर्टासमोर आरोपी म्हणून उभं रहाण्यास आरोपीनं दिलेली नाखुषीची कबुली व दोन : त्याला आवश्यक ती सर्व कायद्याची मदत नि सोयी देण्याचं इस्रायलनं दिलेलं आश्वासन. हे आश्वासन पुरं केलं गेलं पाहिजे.

ॲ. जनरल : जरूर, जरूर ! आरोपीच्या साक्षीदारांसंबंधात बोलतो. इस्रायलच्या ज्यू राष्ट्रात हा खटला चालू असल्यामुळे आरोपीचे (नाझी) साक्षीदार इथे येण्यास धजणार नाहीत; कारण त्यांपैकी काहींना जिवाची, सुरक्षिततेची शाश्वती नाही. उरलेल्यांना जर्मनीतून इथे येण्याचा प्रवासखर्च झेपण्याची नि इथे रहाण्याचा खर्च सोसण्याची ऐपत नाही, असा आरोपीचा दावा आहे. याबाबतीत, कोर्टानं मान्य केल्यास, अशा साक्षीदारांनी जर्मनीत शपथेवर दिलेल्या लेखी जबान्या मी सादर करून घेण्यास तयार आहे.

न्या. हॅलवे : म्हणजे प्रत्यक्ष कोर्टात साक्षीदारांची उलट-तपासणी घेण्याचा आपला अधिकार आपण गमावणार ?

ॲ. जनरल : असं नाही. पण आरोपीच्या वकीलानं त्याची बाजू सुसंबद्धपणे मांडणारे काही प्रामाणिक साक्षीदार खरोखरच आहेत, अशी माझी खात्री पटवून दिली, तर काही सहकार्य देण्याची माझी तयारी आहे, इतकंच. हे आम्ही प्रत्येक गोष्टीची नि लेखी जबानीची छाननी करूनच ठरवू. सत्याच्या नि निर्भेळ न्यायदानाच्या दृष्टीनं अशा साक्षीदारांची आवश्यकता आहे, असं माझं समाधान झालं तरच मी या गोष्टीला दुजोरा देईन.

न्या. हॅलवे : तरीही अडचणी रहाणारच. प्रत्यक्ष कोर्टात उलट तपासणीच झाली नाही, तर जर्मनीत निव्वळ शपथेवर दिलेल्या लेखी जबान्यांतून साक्षीदारांच्या विश्वासार्हतेबद्दल कोर्टाची खात्री कशी पटणार ? त्यांची लेखी साक्ष विश्वासार्ह आहे की नाही, हे त्यांच्या पश्चात कसं ठरविणार ? शिवाय अशा लेखी जबान्या स्वीकारायचं ठरविल्यास त्यांचा पाऊस पडेल.

ॲ. जनरल : पडू दे की ! त्याला मी डरत नाही. त्यातून सत्य किती नि असत्य किती, याची प्रचिती येण्यास कोर्टाजवळ भरपूर साहित्य जमा होईल. त्यातूनच असत्याचे खडे वेचून काढून सत्याच निर्भेळ धान्य कोर्टाला बाजूला काढता येईल. हा खटला जर्मनीत चालला असता, तर आरोपीच्या साक्षीदारांवर साक्ष देण्याचं बंधन मी कोर्टामार्फत घातलं असतं. पण लेखी जबान्याही द्यायची ज्यांची इच्छा नाही, त्यांच्यावर कसं बंधन आणणार ? याला एक पर्याय असा आहे, की प. जर्मनीतल्याच एखाद्या न्यायमूर्तीसमोर आइशमनच्या वकिलांनी त्यांना आवश्यक वाटणाऱ्या साक्षीदारांना उपस्थित करावं; तिथे त्यांची तपासणी-उलटतपासणी आम्ही करावी. आरोपीच्या हिताच्या नि बचावाच्या दृष्टीनं मला जे जे करता येईल ते शक्य तितकं करण्याची माझी तयारी आहे. तथापि, अशा त्यांना अत्या-

“The wicked even at the gate of the hell, do not repent.”



अॅडॉल्फ आइशमन

वश्यक वाटणाऱ्या नि असुरक्षिततेच्या भीतीमुळे इथे येऊ न शकणाऱ्या एकाही विशिष्ट साक्षीदाराचं नाव आइशमनच्या वकिलानं अद्यापपर्यंत मला दिलेलं नाही.

आता, आइशमनला आर्जेंटिनात पकडून इस्रायलला आणल्यामुळे निर्माण होणाऱ्या कायदेशीर समस्यांबद्दल ! एखाद्या व्यक्तीवर एखाद्या गुन्ह्याबद्दल योग्य रीतीनं आरोप ठेवल्यावर आणि तिच्यावरील खटल्यास सुरुवात करण्याच्या अवस्थेत असलेल्या कोर्टापुढे तिला आणल्यावर; त्याचप्रमाणे, तिला कायदेशीर कोठडीत ठेवल्यावर, तिला आणण्यापूर्वीच्या घडून गेलेल्या परिस्थितीचा विचार कोर्टास करता येणार नाही. थोडक्यात, आरोपीची धरपकड नि त्याची इस्रायलमध्ये करण्यात आलेली बदली, इत्यादी गोष्टी या कोर्टाच्या आधिकाराच्या दृष्टीनं सर्वस्वी असंबद्ध आहेत. म्हणून या कोर्टाच्या कक्षेबाहेरील घटनांची चर्चा करण्यांची आवश्यता नाही. त्यांच्या पुराव्याची ही जरुरी नाही. शिक्षेच्या भीतीनं जीव मुठीत घेऊन पळून गेलेल्या आणि म्हणूनच शिक्षा करण्याकरता धरपकड करून आणलेल्या अशा गुन्हेगारांवरचे खटले जगातील न्यायालयात कायदेशीरपणे चालवले गेल्याचे

अनेक दाखले आहेत. (असे काही खास दाखले सादर केले गेले.) एक गोष्ट नजरेस आणतो. आरोपीच्या धरपकडीसंबंधात नि त्याच्या बदलीसंबंधात इस्रायलच्या शासनानं आर्जेंटिनाच्या शासनाशी वाटाघाटी, चर्चा जरूर केल्या आहेत आणि सिक्युरिटी कौन्सिलच्या ता. २३ जून १९६० च्या ठरावानंतर ३ ऑगस्ट १९६० रोजी, या दोन्ही राष्ट्रांच्या शासनांनी जेरुसलेम व ब्यूनास आयर्समध्ये संयुक्तरीत्या एक फतवाही प्रसिद्ध केला आहे :

The Governments of Israel and of the Republic of the Argentine, imbued with the wish to give effect to the Resolution of the Security Council of the 23rd June 1960, in which the hope was expressed that the traditionally friendly relations between these two countries will be advanced, have to regard as closed the incident that arose out of the action taken by Israel nationals which infringed the fundamental rights of the State of Argentina.'

हा संयुक्त फतवा या खटल्याच्या दृष्टीनं फार महत्त्वाचा आहे असं नाही. जरी या दोन राष्ट्रांमधील या घटनेबद्दलचे मतभेद मिटले नसते आणि जरी आर्जेंटिनानं इस्रायलविरुद्ध हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयात दावा गुदरला असता, तरीही हा खटला चालविण्यास हे कोर्ट सर्वस्वी पात्र ठरलं असतं. आर्जेंटिनानं प्रत्यक्षात या हक्कभंगाबद्दल इस्रायलविरुद्ध कायदेशीर कृतीचा बडगा उगारण्याची धमकीही दिली होती. इस्रायलनं त्याबद्दल माफीही मागितली होती. म्हणूनच उपरीनिर्दिष्ट ३ ऑगस्ट १९६० च्या संयुक्त पत्रकानुसार, आरोपीची धरपकड नि त्याची बदली, या घटनांवर या दोन्ही राष्ट्रांनी कायमचाच पडदा पाडला आहे. त्यांची चर्चा आता करताच येणार नाही.

न्या. लँडॉ. : तरीही झ्वी तोहर आणि जॅक शिमोनी या दोघांनी कुठल्याही क्षणी साक्ष देण्यास तयार राहावं, अशी आज्ञा मी त्यांना करतो. त्यांनी आपले टेलिफोन नंबर्स कोर्टाजवळ देऊन ठेवावेत.

डॉ. सरव्हॅशियस : आइशमनवर लादलेले तथाकथित गुन्हे त्यानं इस्रायलच्या भूमीवर केलेले नाहीत. त्यानं इस्रायलच्या शासनाविरुद्ध किंवा इस्रायलच्या नागरिकांविरुद्ध प्रमाद केलेला नाही. त्याच्यावर लादलेल्या गुन्ह्यांच्या काळात (१९३९–४५) आजचे न्यायमूर्ती नि इस्रायल नावाचं राष्ट्रही अस्तित्वात नव्हतं. म्हणून दोन प्रमुख कारणांकरता हे कोर्ट हा खटला चालवूच शकत नाही. एक : आरोपीला जुलूम-जबरदस्तीनं इथं पळवून आणणं आणि दुसरं म्हणजे, ज्या कायद्याखाली हा खटला चालविला जातोय तो कायदाच मूलभूत अशा आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरुद्ध आहे. हा कायदा बेकायदेशीर आहे.

## बड्या सत्ताधीशांना हे नको आहे

ॲ. जनरल : आपला (इस्रायलचा) कायदा निरुपयोगी आहे असं मानलं, तर मग आइशमन जरी स्वखुषीनं इथे आला असता तरीही त्याच्यावर अशा कायद्याखाली इस्रायललमध्येच काय, पण इतर कुठल्याही राष्ट्रात खटला भरणं अशक्य होऊन बसेल की ! चाचेगिरीच्या गुन्ह्यांबद्दल जगातील कोणत्याही राष्ट्राला चाच्यांविरुद्ध खटला भरण्याचा अधिकार प्राप्त होतो, असं आंतरराष्ट्रीय कायद्यानं मानलेलं नि स्वीकृत केलेलं तत्त्व आहे, व ते सर्वश्रुत आहे. आइशमनला आंतरराष्ट्रीय न्यायालयापुढे खेचण्यात यावं, असं सांगण्यात आलं आहे. कोणतं हे आंतरराष्ट्रीय न्यायालय ? हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालय फक्त दोन राष्ट्रांमधील भांडण-तंट्याबाबत निवाडा करतं. वैयक्तिक फौजदारी गुन्ह्यांचा निवाडा करणं त्याच्या कक्षेत येत नाही. न्यूरेनबर्गच्या इंटरनॅशनल मिलिटरी ट्रायब्यूनलचं कार्य संपून ते आता अस्तित्वात नाही. युद्धकाळातील गुन्ह्यांच्या निवाड्याकरता टोकिओला बसलेलं इंटरनॅशनल ट्रायब्यूनलही आज अस्तित्वात नाही. अशा परिस्थितीत इस्रायलनं काय करावं अशी अपेक्षा आहे ? एखादं नवीन आंतरराष्ट्रीय न्यायालय स्थापन करावं अशा विनंतीची अखंड जपमाळ यूनोपुढे ओढीत बसावं ? टोकिओच्या इंटरनॅशनल ट्रायब्यूनलपुढे, युद्ध-गुन्हेगारांवरील खटले सुरू होताच असंख्य भानगडी, कटकटी नि अडचणी निर्माण झाल्या. आंतरराष्ट्रीय न्यायालय स्थापन करावं, असं फक्त म्हणणंच सोपं आहे. आइशमनला आम्ही कुणाच्या ताब्यात द्यायला हवं होतं ? पोलंडच्या, की हंगेरीच्या, की झेकोस्लोव्हाकियाच्या ? त्यांनं या सर्वांविरुद्ध भयंकर पापं केली आहेत, हे खरं आहे. पण त्याचे भयानक अत्याचार नि क्रूर गुन्हे सर्वप्रथम ज्यूंच्या संबंधातच नाहीत काय ? त्याच्या अक्षम्य पापांचा निवाडा करण्याकरता एखादं आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालय स्थापन केलं जावं अशी इस्रायलचीच सर्वप्रथम तळमळीची इच्छा होती. त्यादृष्टीनं १९५१ ते १९५३ या तीन वर्षांच्या काळात इस्रायलनं यूनोची कंठारव करून सतत मनधरणी केलीही. कारण आम्हा ज्यूंचं इस्रायल हे केवळ ठिपक्याइतकं नि कमकुवत राष्ट्र असल्यामुळे, अशा एखाद्या फौजदारी आंतरराष्ट्रीय न्यायालयाकरवीच निर्बलांचं संरक्षण होऊ शकलं असतं, अशी आम्ही आशा बाळगून होतो. इतकंच, काय, पण माझे या खटल्यातील एक जेष्ठ वकील-सहकारी डॉ. जेकब रॉबिन्सन हे, यूनोनं अशा ट्रायब्यूनलच्या निर्मितीकरता १९५१ मध्ये नेमलेल्या International Criminal Jurisdiction Committee ' चे एक हिरीरीनं कार्य करणारे सदस्यही होते. याच कामाकरता ही समिती नेमली गेली होती ना ? मग असं एखादं फौजदारं न्यायालय का बरं अस्तित्वात येऊ शकलं नाही ? कुठे माशी शिंकली ? कारण बड्या सत्ताधीशांना ते नको होतं. परिणामी, आइशमनवरचा खटला चालविणास असं एकही आंतरराष्ट्रीय न्यायालय आजमितीस जगात अस्तित्वात

नाही. म्हणून, साठ लक्ष ज्यूंच्या संहारावद्दलच्या अमानष गुन्ह्यांबद्दल, आपल्या कायद्यानुसार, ज्यूंचं इस्रायल हेच एकमेव राष्ट्र हा खटला चालविण्यास पात्र ठरतं. इस्रायलव्यतिरिक्त जगातील सर्व राष्ट्रात ज्यू जमात पुंजक्यापुंजक्यानं नांदते आहे. तथापि, यूनोनं मान्य केलेल्या इस्रायलच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात नमूद केल्याप्रमाणे, इस्रायल हेच ज्यूंचं जगातील एकमेव अधिकृत राष्ट्र आहे. ज्यूंचे पॅलेस्टाइनशी हजारो वर्षांपासूनचे संबंध आहेत. पॅलेस्टाइन हाच त्यांचा वारसा नि आधार आहे. १९३६ मधील 'रॉयल कमिशन' (Peel Commission) पुढे साक्ष देताना, 'जागतिक ज्यू संघटनेचे अध्यक्ष नि इस्रायलचे पहिले अध्यक्ष डॉ. चाइम वाइझमन यांनी, 'जगात सर्वत्र ठेचल्या जाणाऱ्या, अवमानित जीवनाच्या ६० लाख कफल्लक नि दुर्दैवी ज्यू वाटेकऱ्यांना स्वभूमीची, स्वराष्ट्राची तहान लागली आहे, असं आवर्जून सांगितलं होतं. ज्यांच्या वतीनं डॉ. वाइझमनची द्रष्टी वाणी हे बोलून गेली होती तेव्हा (१९३६) हे साठ लाख ज्यू जिवंत होते. आज त्यांच्या देहांची, मनांची, भावनांची, अस्मितेची, अभूतपूर्व अशी पोकळी निर्माण केलेल्या त्या निर्घृण रक्तपाताच्या, कत्तलींच्या रोमांचकारी नि हृदयं चिरणाऱ्या आठवणी सांगायला, त्यांच्याशी तुलना करायला, आज कोण उरलं आहे ? आइशमनविरुद्ध याच न्यायालयात खटला चालला पाहिजे, पाप-अन्यायाचं परिमार्जन झालंच पाहिजे, असं तारस्वरात जगाला ओरडून सांगायला ज्यूंच्या इस्रायलशिवाय कोण उरलं आहे ? आहे उत्तर ?

न्यायमूर्तींनो, आरोपीच्या हरकती ग्राह्य मानून, अधिकाराअभावी हा खटला चालविता येत नाही, अशी भूमिका घेऊन, जर आपण खटला काढून टाकलात, तर जगातील दुसरं कुठलंही न्यायालय हे काम करू शकणार नाही. दुर्दैवानं जर असं घडलंच, तर साठ लाख निष्पाप ज्यूंच्या रक्ताचे पाट वाहविलेल्या आरोपीला कुठलीही शिक्षा होणार नाही; जातिवंत चोर असूनही तो साव ठरेल नि सन्मानानं आर्जेंटिनाला परत जाईल...

न्या. हॅलवे : जाईल की नाही सांगता येणार नाही. अखेरीस आर्जेंटिनामध्ये 'रिकार्डो क्लेमंट' या बनावट नावानंच तो स्थायिक झाला होता; आणि खुद्द आर्जेंटिनाच्या शासनानंच याची इस्रायलजवळ कबुली दिली आहे.

अॅ. जनरल : पण एक वेळ अशी होती, की आर्जेंटिनानं आरोपीला परत करण्याबद्दल इस्रायलजवळ मागणी केली होती. त्यानुसार त्याला जर परत करण्यात आलं असतं तर रिकार्डो क्लेमंट नावाची भूमिगत व्यक्तीच उघडयावर येऊन उजळ माथ्यानं वावरू लागली असती. अर्थात तिला परत पाठविलं जाण्याची (Extradition) भीती असती तरच ! आर्जेंटिनातील एका कोर्टाच्या निर्णयानुसार, परत करण्यासंबंधीचे करारनामे (Extradition agreements) सोडल्यास, आर्जेंटिनामध्ये स्थायिक झालेल्या युद्ध गुन्हेगाराला, त्याची पंधरा वर्षांच्या

वास्तव्याची कायदेशीर कालमर्यादा त्यानं ओलांडल्यावर, परत करता येत नाही, असा एखादा कायदा करण्याचा अधिकार आर्जेंटिनाच्या शासनाला जरूर आहे. पण आइशमनच्या वकिलाच्या म्हणण्याप्रमाणे, आइशमनला ब्यूनास आयर्समध्ये ११ मे १९६० रोजी पकडण्यात आलं, हे खरं मानलं, तर त्याच दिवशी किंवा ९ मे १९६० रोजीही 'रिकार्डो क्लेमंट' या नावानं उघडपणे वावरू शकला असता, हे ओघानंच आलं. मग त्याला धोका नव्हता. पण मग त्याला परत करण्याचं (Extradite) आर्जेंटिनाच्या शासनावर कायदेशीर बंधन नव्हतं.

न्या. लँडॉ : पंधरा वर्षांची मुदत संपली आहे, असं आर्जेंटिनानं का म्हटलं आहे ?

ॲ. जनरल : ९ मे १९४५ रोजी दुसऱ्या युद्धाची समाप्ती होऊन जर्मनीनं विनशर्त शरणागती पत्करली. ९ मे १९४५ पासून ८ मे १९६० पर्यंत पंधरा वर्षं पुरी होतात.

न्या. लँडॉ : आरोपीला १८ जुलै १९६० रोजी पकडण्यात आलं होतं ना ?

## हा बचाव होऊच शकत नाही

ॲ. जनरल : होय. म्हणजेच पंधरा वर्षांची कायदेशीर मुदत संपल्यावर ! न्यायमूर्तींनो, शेवटी एकच सांगतो. या कोर्टाला हा खटला चालविण्याचा अधिकार आहे. कारण आरोपीनं केलेले गुन्हे ज्यूंच्या विरुद्ध होते. असा अधिकार आंतरराष्ट्रीय कायद्याच्या सर्वमान्य तत्त्वांना धरूनच आहे. कारण आरोपीनं घेतलेले सारे बळी इस्रायल या ज्यू-राष्ट्राचेच होते. इस्रायल हे राष्ट्र जरी १९३६ किंवा १९३७ सालीच अस्तित्वात आलं असतं तर इस्रायलचे आजचे न्यायमूर्ती न्यायबुद्धीनं वागले असते, असं म्हणण्याला कुठलाही आधार नाही. तसंच पाह्यचं तर इस्रायलच्या राजकीय अस्तित्वाचं बीजारोपण १९१७ मध्येच झालं आहे. हे राष्ट्र ज्यूंचं आहे, हे जगानं मानलं आहे. आइशमनच्या साऱ्या कृती 'वरिष्ठांच्या आज्ञेनुसार' आज्ञाधारकपणे झाल्या होत्या, हा बचाव होऊच शकत नाही. वरिष्ठांनी त्याला घालून दिलेल्या कक्षेबाहेर, मर्यादेबाहेर जाऊन आरोपी वागला आहे; एकांगी, अतिरेकी, पशुतुल्य वृत्तीनं वागला आहे. ज्यूंचं निःसंतान करणं या ध्येयाचा त्यानं अव्यभिचारी निष्ठेनं पाठपुरावा केला. 'वरिष्ठांच्या आज्ञेची अंमलबजावणी' हा बचावाचा मुद्दा ग्राह्य मानला, तर जर्मनीतील अत्युच्च कोटीच्या रानटी, हुकुमशाही राजवटीत या पाशवी गुन्ह्यांबद्दल फक्त एकच आरोपी ठरतो. हिटलर ! आणि हा एकमेव आरोपी आता जिवंत नसल्यामुळे, या गुन्ह्यांनी हात बरबटलेले सारेच आरोपी 'आमचा काहीही गुन्हा नव्हता...आमचे हात निर्लेप आहेत.. आम्ही आपण होऊन ज्यूंना मारलं नाही हो.. कारण सर्वसत्ताधीश हिटलरनंच आज्ञा केल्यामुळे आम्हाला –त्याच्या आज्ञाधारक सेवकांना–एक कर्तव्य म्हणून ही पापं करणं भाग पडलं', असा दावा मांडून सटकायला मोकळे होतील...

न्या॰ हॅलवे : शिवाय, 'मी राष्ट्राचा सर्वोच्च अधिपती असल्यानं मी सर्व कायद्यांच्या कचाट्यातून सर्वमुक्त व सुरक्षित (immune) आहे', असं म्हणायला खुद्द हिटलरही मोकळा झाला असता...

## धारवाडी काटा लावा

अॅ. जनरल : शक्य आहे. पण अशा 'सर्वमुक्तते'चा (immunity) दावा फक्त राष्ट्राधिपती या नात्यानं केलेल्या कृतींसंबंधातच करता येतो. पण राष्ट्राधिपतीलाही सर्व गुन्हे माफ आहेत की नाहीत, या मुद्द्यावर जगातील कायदेपंडितांत नि विचारवंतांत मतभेद आहेत. हे मतभेद नेपोलियनला एल्बाला हद्दपार केल्याच्या क्षणापासून निर्माण झाले. काही कायदेपंडितांच्या मताप्रमाणे, राष्ट्रप्रमुखांविरुद्धही कायदेशीर कारवाई करता येऊन, त्यांनाही जाब द्यावा लागतो. सॅक्सनी परगण्यावर हल्ला करून शांततेचा भंग केल्याबद्दल फ्रेड्रिक द ग्रेट यालाही इंपीरियल कौन्सिलनं रॉजेन्सबर्ग येथील न्यायालयापुढे खेचून, 'वनवासात का पाठवू नये', अशी धमकी देऊन, त्याचा जाब विचारला होता. आंतरराष्ट्रीय करार मोडून फ्रान्सच्या सत्तेचं सिंहासन बळजबरीनं पुन्हा काबीज करण्याकरता नेपोलियन एल्बाहून सैन्यानिशी चाल करून आला तेव्हाही युरोपमधल्या राष्ट्रांनी त्याचा जळजळीत निषेध केला; 'शांततेचा शत्रू' म्हणून त्याची संभावना केली; आपल्या सैन्यानिशी त्याच्यावर चाल करून, वॉटर्लूच्या तुंबळ रणसंग्रामात त्याचा पुरा नक्षा उतरवून, त्याला सेंट हेलिना बेटावर यमसदनाला पाठविलं. तेव्हा राष्ट्रप्रमुखही शिक्षेस पात्र ठरतो, असे इतिहासाचे दाखले आहेत. तथापि, इथे आरोपीच्या पिंजऱ्यात अॅडॉल्फ हिटलर बसलेला नसून अॅडॉल्फ आइशमन बसलेला आहे. तेव्हा 'हिटलरच्या आज्ञेचं पालन' ही पळवाटही चालणार नाही. जे कु-योजना आखतात, जे त्यांची जिद्दीनं अंमलबजावणी करतात, जे शांततेला सुरुंग लावून कुरापती काढतात, युद्ध नि अनर्थ घडवून आणतात नि जे त्यात जाणीवपूर्वक सहभागी होतात, ते सारेच गुन्हेगार, एकाच माळेचे मणी असून, शिक्षेस पात्र ठरतात, असं धरून चालण्यास हरकत नाही. जरी आइशमन प. जर्मनीत (फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी) हा खटला चालला असता तरीही बचावाच्या वरील पळवाटेनं त्याला सटकता आलं नसतं. खुद्द आइशमनलाच माझं आवाहन आहे, त्यानं सदसद्विवेकबुद्धीला स्मरून सांगावं, की लक्षावधी निरपराधी ज्यूंचे खून, गॅसचेंबर्समध्ये त्यांची घुसमटवून घडवून आणलेली सामुदायिक हत्या, कॉन्सन्ट्रेशन कॅम्प्समधील त्यांना केलेलं असह्य जीवन, इत्यादी गुन्हे नसून पुण्यकर्म आहेत म्हणून! न्यायमूर्तींनो, इस्रायलमध्ये लोकशाही नि कायद्याचं राज्य आहे. या कायद्याची सुयोग्य अंमलबजावणी करणं तुमच्याच हाती आहे. आरोपीला चिंता करायचं कारणच काय? या कोर्टाचे न्यायमूर्ती ज्यू असले तरी त्यांनाही कायद्याच्या चौकटीत राहूनच निःपक्षपातीपणे वागणं भाग आहे. आरोपी जर्मन असो नाहीतर ज्यू असो, दोघांना न्यायाचा धारवाडी काटाच तुम्हाला

लावायचा आहे. जो न्याय इतरांच्या बाबतीत तुम्हाला करायचा आहे तोच न्याय आइशमनलाही लागू व्हायला पाहिजे. औषधालाही अपवाद नको. इस्रायलमधली निर्भेळ न्यायदानाची परंपरा, शान नि प्रतिष्ठा राखली गेलीच पाहिजे.

न्या. लँडॉ : थँक्यू मि. अॅटर्नी जनरल ! एकच प्रश्न ! इस्रायल नि आर्जेंटिना या दोन राष्ट्रांत गुन्हेगारांना परत करण्यासंबंधीच्या करारासंबंधात काय परिस्थिती आहे ? हा करार अजून अंमलात आहे ?

अॅ. जनरल : नाही. त्यावर १९६० मध्येच सह्या झाल्या होत्या, पण तो अद्याप मंजूर न झाल्यानं प्रत्यक्ष कृतीत आणला गेलेला नाही.

न्या. लँडॉ : डॉ. सरव्हॅशियस, प्लीज...

डॉ. सरव्हॅशियस : माननीय न्यायमूर्तींनो ! आपण इथपर्यंत फक्त हा खटला चालविण्याच्या या कोर्टाचा अधिकार नि पात्रता यासंबंधीच चर्चा करीत आहोत. आरोपीच्या तथाकथित गुन्ह्यासंबंधी किंवा न्यायदानाच्या प्रामाणिकपणाबद्दल आपल्याला कर्तव्य नाही. दुसऱ्या युद्धानंतर आंतरराष्ट्रीय कायद्यात निर्माण झालेली पोकळी भरून निघालेली नाही; उणीवा तशाच राहिल्या आहेत. म्हणूनच जेते व पराभूत झालेल्यांबद्दल बोलायचं, तर जेत्यांनी निर्माण केलेले कायदे फक्त पराभूतांवरच लादले गेले आहे. फक्त पराभूतांवरच त्यांची कडक अंमलबजावणी केली गेली आहे. जगातील जर्मनेतर राष्ट्रात झालेल्या अत्याचार-अनाचरांची कुणीही दखल घेतलेली नाही. राजकीय सत्तेमुळे जडलेल्या मदोन्मत सवयी बदललेल्या नाहीत. जगानं आशेनं अपेक्षिलेल्या प्रगतीच्या वाटा आंतरराष्ट्रीय कायद्यातही गवसलेल्या नाहीत. स्वतःचा असा आगळा कायदा निर्माण करून, इंटरनॅशनल लॉमधील पोकळी नि उणीवा भरून काढण्याचा इस्रायलला अधिकार आहे, असं जरी अॅटर्नी जनरलनं प्रतिपादन केलं असलं, तरीही आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वानुसार एखाद्या व्यक्तीवर खटला भरण्याचं समर्थन करायचं असेल, तर अशा व्यक्तीचा त्या खटल्याशी थोडातरी संबंध अस्तित्वात असायला पाहिजे. इस्रायलनं संमत केलेल्या कायद्यानं असा संबंध प्रस्थापित होत नाही. म्हणूनच त्या कायद्याच्या चौकटीत काम करणाऱ्या इस्रायलच्या या कोर्टाला आइशमनला शिक्षा देण्याचा अधिकार पोचत नाही. इतकंच नव्हे, तर आपल्या कायदेशीर अधिकाराची कक्षा न पोचणाऱ्या इस्रायलबाहेरील व्यक्तींवर खटलाही भरता येणार नाही...

न्या. लँडॉ : गुन्हेगारी कृतीमुळे, अत्याचारांमुळे बळी जाणाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या इस्रायलच्या कायद्याच्या तत्त्वासंबधी आपणास काय म्हणायचय ?

डॉ. सरव्हॅशियस् : बळी गेलेले ज्यू इस्रायलचे नागरीक नव्हतेच. विशेषतः त्यांना यातना भोगाव्या लागल्या त्यावेळी ! (१९३९–४५).

न्या. लँडॉ : पण ही एक निव्वळ औपचारिक किंवा लंगडी सबब नाही का ?

डॉ. सरव्हॅशियस : नाही. या वस्तुस्थितीचा कोर्टाला गंभीरपणे विचार करावाच

लागेल. इस्रायलच्या आजच्या नागरिकांशी आपल्याला कर्तव्य नाही. १९३९ ते १९४५ च्या यातनांच्या काळात इस्रायल राष्ट्रच अस्तित्वात नव्हतं. आइशमनचे तथाकथित गुन्हे इस्रायलमध्ये घडलेले होते. आज मानवतेला आइशमनकडून कुठलाही धोका नाही, हिटलरची सत्ता संपुष्टात आल्यावर आरोपी एक शांतताप्रिय नागरीक बनला. हिटलरच्या अमानुष सत्तेपुढे त्याला मान तुकवावी लागली हे त्याचं दुर्दैव ! त्यावेळी त्याला घ्यायला लावलेल्या शपथेतून आता तो मुक्त झाला आहे. त्या शासनाच्या रानटीपणापासून तो आता खूपच दूर झाला आहे. आरोपीनं या कोर्टाचा अधिकार स्वखुषीनं मानला असता तर या कोर्टाच्या पात्र-अपात्रतेचा प्रश्नच उद्भवला नसता. अॅटर्नी जनरलच्या दृष्टिकोनातून आरोपीचा मे १९६०चा लेखी जाहीरनामा असंबद्ध आहे. तथापि, हे कोर्ट त्याला थोडंतरी महत्त्व देण्याची शक्यता आहेच. प्रथम असं गृहीत धरायलाच पाहिजे, की हा जाहीरनामा स्वखुषीचा मुळीच नसून तो आरोपीकडून दमबाजी-धाकदपटशा देऊनच बळजबरीनं लिहून घेण्यात आला आहे. तो तसा नाही, हे सिद्ध करण्याची जबाबदारी अॅटर्नी जनरलवरच आहे. सिक्युरिटी कौन्सिलमध्ये मतदानाचा हक्क असलेल्या एकाही राष्ट्रानं 'हा जाहीरनामा आरोपीनं स्वखुषीनं लिहून दिला आहे,' असं मत व्यक्त केलेलं नाही. तो स्वखुषीचा असता तर आर्जेंटिनानं त्यासंबंधात केलेल्या तक्रारीला केव्हाच वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या असत्या. इस्रायल व आर्जेंटिनाच्या ३ ऑगस्ट १९६०च्या संयुक्त पत्रकात आरोपीला पळवून आणण्याच्या घटनेवर पडदा पाडण्यात आला आहे, असं जरी नमूद केलेलं असलं, तरी त्याच संयुक्त पत्रकात, ही पळवापळवीची कृती आर्जेंटिनाच्या मूलभूत हक्कावर नि आंतरराष्ट्रीय कायद्यावर गदा आणणारी आहे, असंही पुढे नमूद केलं गेलं आहे, हे दुर्लक्षून चालेल काय ? या आरोपापासून आर्जेंटिनानं माघार घेतलेली नाही. याचाच अर्थ आर्जेंटिनाच्या हक्कावरचं हे इस्रायलचं अतिक्रमण अजूनही अस्तित्वात आहे. आणि याच ढळढळीत वस्तुस्थितीचा फायदा उठविण्याचा आरोपीला जरूर अधिकार आहे. इस्रायल व पश्चिम जर्मनी यांच्यात मतभेद किंवा भांडणतंटे नाहीत. पण या विषयावरून प. जर्मनी हरकत उपस्थित करण्याची अजूनही शक्यता आहे. कुठल्याही क्षणी इस्रायल व प. जर्मनी यांच्यामध्ये या खटल्यासंबंधी मतभेद, तंटा निर्माण होऊ शकेल.

न्या. लँडा : म्हणजे संयुक्त पत्रकानंतरही, इस्रायलची आरोपीला आपल्या राष्ट्रात ठेवून घेण्याची कृती आर्जेंटिनाला मान्य नाही, असं तुम्हाला म्हणायचंय का ?

डॉ. सरव्हॅशियस : काय आहे, की इस्रायल आणि आर्जेंटिना यांच्यातील सलोख्याच्या, मुत्सद्देगिरीच्या संबंधामुळे पळवापळवीच्या घटनेमुळे निर्माण झालेले वांधे दूर झाले इतकंच ! तथापी, या महत्त्वपूर्ण घटनेचा कायद्याच्या दृष्टिकोनातून

विचारच केला गेलेला नाही. प. जर्मनीपुरतं बोलायचं, तर त्या राष्ट्राकडून संरक्षण मागण्याचा आरोपीला मूलभूत हक्कच आहे. कारण आरोपी प. जर्मनीचा नागरिकच आहे आणि तो दुसऱ्या एखाद्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कोर्टात इस्रायलविरुद्ध तक्रार गुदरणारही आहे. तो ऑस्ट्रियाचा नागरीक नाही. आरोपीच्या बापानं जेव्हा ऑस्ट्रियाचं नागरिकत्व मिळवलं तेव्हा आरोपी सज्ञान होता. म्हणूनच या विशिष्ट मुद्यावर प. जर्मनी व इस्रायल यांमध्ये तंटा उद्‌भवण्याची शक्यता आहे. इस्रायलच्या खास आज्ञेवरूनच आरोपीला आर्जेंटिनातून पळविण्यात आलं किंवा नाही, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. इस्रायलच्या पंतप्रधानानं पार्लमेंटमध्ये सांगितलं, की इस्रायलच्या सिक्युरिटी सर्व्हिसेसच्या सदस्यांनी आइशमनला पळवून आणलं.

ॲ. जनरल : असं नसून पंतप्रधानानं सांगितलं, की इस्रायलच्या सिक्युरिटी सर्व्हिसेसनं आरोपीला आर्जेंटिनात विवक्षित ठिकाणी फक्त हुडकून काढलं. 'पळवून आणलं' असं म्हटलेलं नाही.

डॉ. सरव्हॉशियस : काय घडलं असावं याची सिक्युरिटी कौन्सिलच्या कागदपत्रांवरून मला माहिती मिळाली, इतकंच. तपशीलात माझी गल्लत होण्याची शक्यता आहे. एवढ्याच करता झ्वी तोहर व जॅक शिमोनी यांची साक्ष काढावी, अशी मी कोर्टाला सारखी विनंती करीत आलो आहे. त्यांच्याकरवी खुलासा होईल. आंतरराष्ट्रीय कायद्याची पायमल्ली करणारी कृती करण्याचा एखाद्या राष्ट्रानंच हुकूम सोडला तर त्याच राष्ट्राला मग त्याच कायद्याचा आधार घेता येणार नाही. काडीचाही !

न्या. लँडॉ : असं जर मानलं, की आरोपीला पळवून आणण्याची कृती इस्रायलनं केली नसून, चार-दोन खासगी व्यक्तींनीच पुढाकार घेऊन केली, तर या कोर्टाला हा खटला चालविण्याचा अधिकार प्राप्त होतो, असं तुमचं म्हणणं ?

डॉ. सरव्हॉशियस : राष्ट्र काय किंवा खासगी व्यक्ती काय, कुणाच्याही हातून हा प्रकार घडला तरी काहीच फरक नाही. अर्थात, माझ्या दृष्टीनं ! राष्ट्राकरवी अशी कृती घडल्यास त्या गुंतागुंतीत कायद्याचाच प्रश्न निर्माण होतो...माझं निवेदन मी संपवलं आहे. आभार !

## ता. १७ एप्रिल १९६१

न्या. लँडॉ : आम्ही न्यायमूर्ती ज्यू असल्यामुळे आरोपीला योग्य न्याय देऊ शकणार नाही, अशी भीती त्याला वाटत आहे. हा आरोप आम्हांपैकी वैयक्तिक कुणा एकावर नसून तिघांवर आहे. १९३९ ते १९४५ या काळाततील आमच्या ज्यू सगेसोयऱ्यांच्या हत्याकांडाच्या थरारक आठवणींची जागृती सदैव ताजी असल्यामुळे आणि त्याच कत्तलींचा आरोप आरोपीवर असल्यामुळे, आमचा मानसिक तोल जाईल आणि अशा कलुषित मनानं आमची सत्याचा निवाडा करण्याची नि निर्मळ न्याय देण्याची प्रवृत्तीच ढासळून पडेल, सारासार विवेकबुद्धीही नष्ट होईल, असा

आरोपीचा दावा आहे. आम्ही आमची हृदय-तपासणी प्रथम करावी नि मगच निवाडा करावा, असं त्यानं आवाहन आम्हांस केलं आहे. आम्हाला आरोपी गुन्ह्यांना जबाबदार आहे किंवा नाही, हे ठरवायचं आहे, फौजदारी तत्त्वानुसार, कोर्टासमोर आणली गेलेली प्रत्येक व्यक्ती निर्दोषी आहे. असंच प्रथमपासून गृहीत धरावं लागतं नि मगच सादर केल्या जाणाऱ्या पुराव्याच्या अनुषंगानं न्याय-निवाडा करावा लागतो. इस्रायल राष्ट्र याच तत्त्वाचं पूजक आहे. आम्ही तिघेही व्यवसायानं न्यायदान करणारे आहोत. पुराव्याची छाननी करण्याचा आम्हाला अनुभव, सवय आहे. हा खटला गुप्तपणे चाललेला नसून जनताजनार्दनापुढे चाललेला आहे. अनुभवी, ज्ञानी, प्रतिभावान कायदेपंडित आरोपीतर्फे उभे ठाकले आहेत. या खटल्याची पार्श्वभूमी विचारात घेताही, न्यायदानाच्या पद्धतीनुसार, जेव्हा एखादा न्यायमूर्ती न्यायासनावर बसतो, तेव्हा तोही रक्ता-मासाचा, मन, भावना असलेला एक माणूसच असतो; माणूस म्हणूनच राहातो. माणूसच असल्यामुळे त्याला भावनाशून्य बनणं शक्य नसतं, तथापि, त्याचे हात मात्र कायद्यानं जखडलेले असल्यामुळे, 'तुला या सर्वसामान्य भावनातिरेकाच्या पलीकडे गेलं पाहिजे,' अशी कायद्याची त्याला सक्त आज्ञा असते. असं नसेल तर कुठलीही व्यक्ती न्यायदान करण्यास पात्र ठरणार नाही. १९३९–४५ या काळातील ज्यू-संहाराच्या आठवणींनी प्रत्येक ज्यूच्या अंगावर अजूनही सर्रकन काटा उभा रहातो, हे खरं आहे. पण आम्हाला मात्र या भावनांच्या नैसर्गिक मर्यादा ओलांडून पल्याड गेलं पाहिजे. हे आमचं परम कर्तव्य आम्ही पार पाडणार आहोत. आम्ही जाहीर करतो, की आइशमनविरुद्धचा हा खटला चालविण्यास आम्ही पात्र आहोत; तसा अधिकार आम्हाला कायद्यानं प्राप्त झाला आहे. आरोपी ॲडॉल्फ आइशमन, सारे आरोप तुम्हास मान्य आहेत ?

आइशमन :– नाही...नाही...नाही...

आईशमनला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.

ता. ३१ मे १९६२ रोजी तो फासावर लटकला.

ज्यू-संहारात बळी गेलेल्या एका अनामिक ज्यू कवयित्रीनं मृत्यूपूर्वी आपल्या एका कवितेत तळमळीनं लिहिलंय–

"There is no more hope in the white skull,
Among the barbed wire, under the ruins,
And our dust is scattered in the dust.
Out of the broken jars....
Our army will go forth, skullbone and jawbone,
And bone to bone, a merciless line,
We, the hunted, the hunters, will cry out to you:
The murdered, demand justice at your hands!"

ज्यूंना फार प्राचीन इतिहास आहे. युरोपमधल्या दुसऱ्या शतकातील ज्यू समाजाबद्दल एच. ए. एल. फिशर या इतिहासकारानं लिहून ठेवलं आहे, "As the sunshine of religious toleration spread through central and western Europe, the Jews were admitted to civic rights. The hospitality of the Christian state was amply repaid in noble contributions to art, science and literatue."

चालू शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत मिळविल्या गेलेल्या २५७ नोबेल पारितोषिक-विजेत्यांपैकी ३४ ज्यू होते. यांपैकी १२ जणांची नाझींनी हकालपट्टी केली. होती. हिटलरच्या रणगाड्यांखाली भरीत झालेल्या बुद्धिवादी ज्यूंची भली मोठी यादी होईल. तथापि, आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या काही श्रेष्ठ ज्यूंची नावं वानगीदाखल देणं अत्यावश्यक आहे. प्रो. अल्बर्ट आइनस्टाइन, डॉ. सिगमंड फ्राइड, केमिस्ट फ्रिटझ हेबर, तत्त्वज्ञ हेन्री बर्गसन, बायॉलॉजिस्ट पॉल हर्लिच व इल्या मॅक्निकॉव्ह, फिजिसिस्ट निल्स भोर, फिजिऑलॉजिस्ट ओटो वॉरबर्ग व अर्नेस्ट बोरिस चेन, विचारवंत मार्टिन ब्यूबर, कायदेपंडित एच. लॉटरपॅट्, एल. ब्रँडिस व एच. केल्सन, लेखक एमिल लुडविक्, स्टिफन झ्वाइग, फ्रान्झ काफ्का, फ्रान्झ वर्फेल, जेकब वॅसरमन, मॅक्स ब्रॉड व लायन फ्यूटवॅन्जर, शिल्पकार-चित्रकार एम अँन्टोकोलस्की, एम. छगॉल. ए. मोडिग्लियानी व मॅक्स लिबरमन, प्रोड्यूसर रेनहार्ट, संगीतकार बी. ह्यूबरमन व ए. रुबिनस्टाईन, इत्यादी.

ज्यू व युरोपियन वर्धिष्णू संस्कृतीचे व जागतिक शास्त्रीय प्रगतीचे हे मानबिंदू नव्हेत काय ?

यांनी समृद्धी-वैभव-सुसंस्कृतीची निर्माण केलेली वैभव-मंदिरं पायापासून उखडून काढण्याचा आइशमनचा प्रयत्न नि प्रयोग फसला आहे. ज्यू-विश्व नाहीसं झालं नसून इस्त्रायलच्या रूपानं ताठ मानेनं, अस्मितेनं बेडरपणे आज उभं आहे. कालप्रवाहाच्या वाळूवरील आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वाच्या पावलांचे ठसे अर्वाचिन ज्यूंना मार्गदर्शक नि स्फूर्तिदायक ठरले आहेत.

आपल्या घराच्या आवारातील बदामाच्या झाडाचं एक फळ चोरल्याबद्दल आइशमननं एका ज्यू मुलाला ठारकेलं होतं. फासाभोवती नरडं आवळलं जात असताना अॅडॉल्फ आइशमनला त्या मुलाची आठवण झाली असेल का ? अखेरच्या घटकेला तडफडणारं त्याचं मन विव्हळत म्हणालं असेल का 'पापाचं फळ मलाही भोगणं भाग आहे ?'

छे !

तथापी, आइशमनचा विश्वास असो किंवा नसो, प्राक्तन कुणाला चुकलं आहे ?

# स मा प्त

२२ एप्रिल १९७२

# भल्याकाका । माता द्रौपदी

'नाट्यमंदार'च्या आठव्या वर्धापनदिनानिमित्त जी दोन नवी नाटके सादर केली गेली, त्यातील पहिले होते : श्री. विजय तेंडुलकरलिखित 'भल्याकाका'. या नाटकाचे दिग्दर्शन 'आविष्कार'च्या श्री. अरविंद देशपांडे यांनी केले आहे. श्री. अरविंद देशपांडे आणि श्री. विजय तेंडुलकर या नावांची युती मराठी प्रेक्षकाला सुपरिचित आहे. श्री. तेंडुलकरांचे 'शांतता कोर्ट चालू आहे' हे गाजलेले नाटकही श्री. देशपांडे यांनीच कल्पकतेने सादर केले होते. गेली काही वर्षे, अधूनमधून का होईना, श्री. देशपांडे व्यावसायिक नाट्यसंस्थांना आपल्या दिग्दर्शनकौशल्याचा लाभ देत आहेत, ही गोष्ट मराठी रंगभूमीच्या विकासाच्या दृष्टीने श्रेयस्कर आहे. मराठीतील प्रायोगिक आणि व्यावसायिक मंडळ्यांनी दोन विरोधी तंबू न ठोकता एकमेकाला साहाय्य केले तर प्रायोगिक पातळीवर झालेला विकास मराठी रंगभूमीच्या परंपरेत मुरू शकेल असे मला वाटते. त्यामुळेच 'नाट्यमंदार'चे संचालक श्री. राजाराम शिंदे यांनी उत्सवातील दोन्ही नाटके श्री. अरविंद देशपांडे व सौ. विजया मेहता या नवनिष्ठ दिग्दर्शकांकडून बसवून घेण्यात जी विधायक दृष्टी दाखवली त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

**'नाट्यमंदार'च्या आठव्या वर्धापनदिनानिमित्त सादर केली गेलेली दोन नवी नाटके**

'भल्याकाका' या नाटकाच्या निमित्ताने स्मरण झाले ते 'ललितकलादर्श'च्या हीरक महोत्सवात श्री. देशपांडे यांनीच दिग्दर्शित केलेल्या 'झाला अनन्त हनुमंत' या तेंडुलकरांच्या नाटकाच्या प्रयोगाचे. त्या विलक्षण नाटकाचे दिग्दर्शन श्री. देशपांडे यांनी जाणकारीने, दृश्यस्वरूपाचा कल्पक उपयोग करून केले होते. दुर्दैवाने या नाटकाचे नंतर प्रयोग न झाल्यामुळे त्याचे लेखन व दिग्दर्शन दोन्ही उपेक्षित राहिले.

श्री. विजय तेंडुलकरांचे नवे नाटक हा मराठी नाट्यवर्तुळात मोठ्या अपेक्षेचा विषय असतो. अनेक नाटकांचे लेखन केल्यानंतरही श्री. तेंडुलकरांनी स्वतःच्या नाटकांचा एक साचा बनवलेला नाही. नाट्यमाध्यमाविषयीचे अनेक प्रयोग ते सतत करीत आले आहेत. मराठी रंगभूमीच्या विकासाविषयी डोळस आस्था

असणाऱ्यांच्या मनात श्री. तेंडुलकरांच्या नाटकांतील काही वैशिष्ट्यांविषयी असमाधान असले तर ते त्यांच्याविषयीच्या विशेष अपेक्षांनी निर्माण झालेले आहे. अलीकडच्या नाटकांमध्ये, श्री. तेंडुलकरांनी कथानिवेदनापासून दूर जाऊन एखादा विलक्षण अनुभव दृश्यरूपात सादर करण्याचे जे यत्न केले आहेत ते मला मराठी नाटकाच्या दृष्टीने फार महत्त्वाचे वाटतात. त्याच दृष्टिकोनातून 'भल्याकाका' हे त्यांचे नवे नाटक मला लक्षणीय वाटते. कारण 'भल्याकाका' या नाटकाला तीन अंकामध्ये विकास पावणारे कथानक नाही. भल्याकाका हा दिवास्वप्नाच्या पातळीवर वावरणारा मनुष्य आहे. किंबहुना संस्थानी वातावरणामध्ये आयुष्य काढलेल्या भल्याकाकाला त्याचे दिवास्वप्नातील जग खरे व 'बकल नं. २१८' हे त्याचे अस्तित्व खोट वाटत असते. वास्तव जगाशी जुळवून घेऊ न शकणाऱ्या, संस्थानच्या Romantic वातावरणात रमलेल्या भल्याकाकाच्या भावस्थितीचे चित्रण हाच या नाटकाचा अनुभव आहे.

भल्याकाकाच्या दिवास्वप्नासाठी श्री. तेंडुलकरांनी निवडलेला संस्थानी वातावरण हा विषय मराठी वाङ्मयात इतका पुनरावृत्त झाला आहे, की त्याला काही ताजे आवाहन असण्याची फारशी शक्यता नाही. श्री. तेंडुलकरांनी आपल्या अभिजात कल्पकतेने भल्याकाकाचे वस्तुस्थितीतील पोलिसी अस्तित्व आणि त्याची दिवास्वप्ने यात दुवे निर्माण केले आहेत. परंतु या नाटकाच्या अनुभवाचा घटनानिरपेक्ष आवाका तीन अंकांचा वाटत नाही. दुसरा अंक केवळ भल्याकाकाचा एकाकीपणा व तिसऱ्या अंकातील नशेचे सूत्र पुरविण्यासाठी आल्यासारखा वाटतो. प्रस्तुत नाटकाच्या अनुभवामध्ये एकाकीपणा रंगमंचावर प्रस्थापित करणे आवश्यक होते; परंतु ज्या पद्धतीने नाटककाराने दुसऱ्या अंकात ते सिद्ध करण्याचा यत्न केला आहे ती पद्धती फार ठिसुळ वाटते. [ मराठीतील आधुनिक नाटककारही तीन अंकी रचनेचा अट्टाहास का बाळगतात हे कळत नाही. अनेकदा नाट्यानुभवाचा आवाका तीन अंकाचा नसताही तीन अंकी रचना संकेतामुळे नाट्यरचना फसलेल्या दिसतात. हिंदी, बंगाली, कानडी रंगभूमीवर आज दोन अंकी वा केवळ अनेकप्रवेशी नाटके दिसतात, परंतु मराठीतील प्रयोगशील नाटककारही रचनेचा तीन अंकांचा ढाचा सोडायला तयार नाहीत. ] त्यामुळे या नाटकाचा एकूण आकार विस्कळित झाला आहे. इन्स्पेक्टर भोसले व भल्याकाका या दोघांच्या नशांची वेगळी कारणे व वेगळे परिणाम नाटककाराने कल्पकतेने योजले आहेत. या नाटकातील भल्याकाकाची भूमिका दत्ता भट या कसबी नटाने केली आहे. 'रातराणी'तील भूमिकेचा अपवाद वजा करता अलीकडे श्री. भट यांना फार एकसाची भूमिका मिळत होत्या. त्यामुळे प्रेक्षकमानसातील त्यांच्या प्रतिमेवर अन्याय होत होता. परंतु भल्याकाकाची भूमिका नेहमीच्या करारी भूमिकांपेक्षा वेगळी आहे आणि ती श्री. दत्ता भट यांनी नेमकेपणाने सादर केली.

हे नाटक सादर करताना वास्तव आणि दिवास्वप्न यातील अंतर प्रस्थापित करूनही दुवे अतूट राखणे अवघड होते. ते दिग्दर्शक अरविंद देशपांडे यांनी कौशल्याने साधले आहे. दिवास्वप्नातील प्रसंग रंगमंचावर पूर्णपणे सादर न करण्याचा नाटककार व दिग्दर्शक या दोघांचा संयम या नाटचप्रयोगास उपकारक ठरला आहे. मराठी रंगभूमीवरील पोलीस वा इन्स्पेक्टर हे नेहमी खोटे व म्हणून हास्यास्पद वाटतात. श्री. देशपांडे यांनी मात्र या नाटकातील पोलीस वा पोलीस अधिकारी यांना ते हास्यास्पद स्वरूप येऊ दिलेले नाही. या व अशा विविध लहान वेधक तपशीलांमुळे, श्री. तेंडुलकरांचे 'भल्याकाका' हे नाटक समाधानकारक नसूनही संपूर्णपणे निराशादायकही वाटत नाही. ◻

## मराठी पौराणिक नाटकाचा नवा मानदंड

दुसरे होते डॉ. विद्याधर पुंडलीक यांचे 'माता द्रौपदी' हे नवे पौराणिक नाटक. श्री. पुंडलीक हे मराठी वाचकांना अल्पप्रसव परंतु वैशिष्टचपूर्ण कथाकार म्हणून परिचित आहेत. काही वर्षांपूर्वी त्यांनी 'चक्र' ही एकांकिका लिहिली. या एकांकिकेला मानसन्मानही मिळाले; परंतु तिचे प्रयोग मात्र फारच थोडे झाले. आणि जे झाले ते फारच असमाधानकारक असे होते. याच 'चक्र' एकांकिकेतील अनुभवावर 'माता द्रौपदी' हे तीन अंकी नाटक श्री. पुंडलिकांनी सिद्ध केले आहे. परंतु एकांकिकेचे नाटक करताना बहुश: येणारा आशयाचा पसरटपणा जसा या नव्या नाटकात जाणवत नाही तसे 'चक्र'मध्ये जाणवणारे नाटचविघातक शब्द-बाहुल्यही 'माता द्रौपदी' या नाटकात खुपत नाही.

'माता द्रौपदी' हे श्री. पुंडलिकांचे नाटक महाभारती युद्धाच्यानंतर सुरू होते आणि पांडवांच्या महाप्रस्थानापाशी थांबते. मराठी पौराणिक नाटकांमध्ये दुर्लक्षित राहिलेला महाभारताचा मूळ शोकात्म स्वभाव श्री. पुंडलिकांनी नेमका टिपला आहे. जय आणि पराजय, सत्याचा विजय आणि असत्याचा पराजय याच्याही पलीकडची मानवी जीवनाची शोकात्मिका 'माता द्रौपदी' या नाटकातून व्यक्त होते. संपूर्ण महाभारताच्या रचनेत सूडाच्या चक्राला, शाप-उःशापाला फार महत्त्व आहे. किंबहुना महाभारतीय रचनेत दैव म्हणजे या सूडाचे वा शापाचे कोणते ना कोणते तरी रूप आहे. या विशिष्ट स्वरूपाचा श्री. पुंडलिकांनी नाटचपूर्ण उपयोग केला आहे. द्रौपदी आणि अश्वत्थामा यांच्या महाभारतीय चित्रणाचा, भारतीय परंपरेत त्यांना प्राप्त झालेल्या प्रतिकात्मक रूपाचा आणि मूलभूत मानवी स्वभा-वाचा लक्षणीय परस्परसंबंध प्रस्थापित करूनच नाटककाराने ही नवरचना निर्माण केली आहे. अशा प्रकारची तात्त्विक मूलसंकल्पना असणारे नाटक हे काही अंशी संवादप्रधान असणे अपरिहार्य असते; मात्र हा तोल वाजवीपेक्षा ढळल्यास ते नाटक

म्हणून परिणामकारकतेने उभेही राहू शकत नाही. परंतु श्री. पुंडलिकांनी आपल्या तात्त्विक संकल्पनेमध्ये असे काही संघर्ष उभे केले आहेत, की त्यांमुळे या नाटकातील संवादप्राधान्य जाणवले नाही. उलटपक्षी महाभारतीय कथानकावरील पहिले प्रगल्भ मराठी नाटक पाहिल्याचा आनंद 'माता द्रौपदी' या नाटकाने मराठी प्रेक्षकांना दिला. (श्री. शिरवाडकरांचे 'ययाति आणि देवयानी' लक्षात घेऊनही हे विधान केलेले आहे.)

'माता द्रौपदी' या नाटकाचा पहिला अंक लेखकाने जाणीवपूर्वक जरा संथ लयीत रचलेला असावा. या अंकात द्रौपदी व तिची मुले यांचा संबंध-मानवी संबंध-रंगवून पुढील शोकात्म अनुभवाची पार्श्वभूमी लेखकाने निर्माण केली आहे. तसेच वीरसेनाच्या स्वतंत्र निर्मितीने युद्धाविषयीच्या अप्रिय उत्साहाला परिणामकारक छेद दिला आहे. परंतु पहिल्या अंकातील सर्वांत नाट्यपूर्ण निर्मिती म्हणजे श्रीकृष्णाचा युद्ध संपल्यावर—उद्या काय, हा प्रश्न. पहिल्या अंकात भीम आणि द्रौपदी यांच्या संवादातून महाभारतीय युद्धाची प्रेरणा असलेली द्रौपदी उभी राहते. हीच द्रौपदी दुसऱ्या अंकात, अश्वत्थाम्याने पुत्रांची हत्या केल्यामुळे दुःखी माता आहे. या दुःखानंतर तिला पांडवांचा विजय आणि कौरवांचा पराजय यातील अर्थ कळेनासा होतो. गांधारी आणि द्रौपदीला समोर आणून नाटककाराने हा अनुभव मांडला आहे. तरी द्रौपदीचा क्रोध शांत होत नाही, सूडाचे चक्र थांबत नाही. अश्वत्थामा समोर दिसल्यानंतर त्याच्या मस्तकावरील मण्याविषयीचे तिचे कुतूहल उफाळून येते. ती भीमाकरवी तो मणी उपसून घेते. अश्वत्थाम्याची जखम आणि चिरंजीवत्व हे भारतीय परंपरेतील प्रतिकात्मक झालेले अनुभव लेखकाने कौशल्याने प्रस्थापित केले आहेत. त्याला एक पुसटसा आत्मा हरवलेल्या माणसाच्या पाश्चात्य कल्पनेचा छेद दिला आहे. (हा लेखकाला अभिप्रेत आहे वा नाही याची मला खात्री नाही) याही ठिकाणी वीरसेन या पात्राचा, अश्वत्थाम्याला दिलेल्या सल्ल्यासाठी फार चांगला उपयोग केला गेला आहे. तिसऱ्या अंकातील द्रौपदी महाप्रस्थानाला निघालेली आहे. तिच्या मनाला सतत अश्वत्थाम्याचा भास होतो; "द्रौपदी तुला काय हवंय" असा प्रश्न ऐकू येतो. आता द्रौपदी-भीमाचे नाते दुरावले आहे, कारण आता अपमानाचा सूड तिला नको आहे. तिला हवी आहेत जे प्रश्नच भीमाला चुकीचे वाटतात त्या प्रश्नांची उत्तरे. नाटकाच्या अंती अश्वत्थामा आणि द्रौपदी यांच्या संवादातून द्रुपद-द्रोण-धृष्टद्युम्न-अश्वत्थामा-द्रौपदी या सूडचक्राची गती सूचित होते. अश्वत्थाम्याच्या जखमेवर तेल घालणारी द्रौपदी ही पांडवांची सम्राज्ञी नसून एक 'माणसाची आई' आहे.

हे आशयगंभीर नाटक सादर करणे अत्यंत अवघड होते. मराठी पौराणिक नाटकांची एक विशिष्ट शैली आहे; ती या नाटकाला संपूर्णतः विरोधी आहे. परंतु

दिग्दर्शिका सौ. विजया मेहता यांनी श्री. पुंडलिकांच्या नाटचाला अनुकूल अशी अत्यंत धीट शैली या प्रयोगात योजली आहे. पहिल्या अंकात द्रौपदीचे मातृत्व प्रस्थापित करण्यासाठी मुलांच्या व तिच्यातील मनमोकळ्या संवादांचा संपूर्ण प्रवेश मराठी पौराणिक शैलीत न बसणारा परंतु अत्यंत हृद्य होता. संपूर्ण नाटकाच्या दिग्दर्शनामध्येच नाटकातील तात्त्विक संकल्पना आणि महाभारतीय पात्रांचे मानवी-रूप या दोन्हीविषयीची प्रगल्भ जाणीव व्यक्त होत होती. सौ. विजया मेहता यांनीच स्वत: द्रौपदीची भूमिका केली आहे. सौ. मेहतांच्या अभिनयाविषयी जाणकार मराठी प्रेक्षकाला काही सांगायला हवे असे नाही. या नाटकामध्ये आपल्या पतींच्या स्वागतासाठी आतुर झालेली पतिव्रता, मुलांच्या स्पर्शासाठी आसुसलेली आणि पुढे मुलांच्या विरहाने विद्ध झालेली आई, मानवी अस्तित्वाविषयी मूलभूत प्रश्न विचारणारी स्त्री अशी विविध रूपे विजयाबाईंनी सहज उभी केली. द्रौपदी व अश्वत्थाम्याचे बदलते नाते तर त्यांनी फारच नाजुकपणे व्यक्त केले. बऱ्याच वर्षांनी त्यांच्या तोलाची भूमिका त्यांना मिळाली आणि त्यांनी तिला न्याय दिला. श्री. दीनानाथ टाकळकर हे भीम दिसले; भीम म्हणून डौलदारपणे वावरले; परंतु त्यांच्या भाषा उच्चारणातील कृत्रिमता मात्र जाणवत होती. अर्थात हा सदोष उच्चारणाचा दोष द्रौपदीच्या मुलांची कामे करणाऱ्या तरुण नटांतही जाणवत होता. श्री. दत्ता भटांनी अश्वत्थाम्याची भूमिका 'दमदारपणे' उभी केली. अश्वत्थाम्याचे व्यक्तिमत्त्व लक्षात घेऊनही त्याच अभिनय जरा भडकपणाकडे झुकणारा वाटला.

हे नाटक दिग्दर्शित करण्याची शैली वेगळी होती तशीच नेपथ्याचीही शैली वेगळी होती. मुंबईतील सुप्रसिद्ध चित्रकार श्री. बाबूराव सडवेलकरांनी निर्माण केलेल्या नेपथ्यात जुन्या पौराणिक नेपथ्यातील बोजडपणा नव्हता. उलट काळाचा आभास निर्माण करणाऱ्या रेषाकृतीतून नाटचोपकारक नेपथ्य निर्माण झाले होते. विशेषत: तिसऱ्या अंकात मागे आकाश–मोकळे क्षितिज सूचित करण्याची कल्पना नाटचाच्या परिणामास अनुकूल अशीच होती. तर श्री. अशोक रानडे यांचे संगीत आपल्या अस्तित्वाची दाद न मागता नाटकाला साथ करणारे होते. पौराणिक नाटकाच्या संदर्भात विशेष उल्लेख करावयास हवा तो वेशभूषेचा. मराठी पौराणिक नाटकातील वेशभूषा बहुधा भपकेबाज परंतु पात्रांच्या हालचालीत व्यत्यय आणणाऱ्या असतात, पुरुषांची पत्र्यांची चिलखते तर वीरश्रीच्या क्षणी आपल्या पोकळ आवाजाने हमखास दगाफटका करणारी असतात. 'माता द्रौपदी' या नाटकाची वेशभूषा कु. मीना सुखटणकर या तरुण, हौशी अभिनेत्रीची होती. (कु. सुखटणकर यांनी पूर्वी श्री. मतकरींच्या बालनाटचासाठी काही फार चांगले मुखवटे व मुकुट केले होते.) या नाटकातील मऊ चामडचाची चिलखते, वस्त्रांचे धावत्या रेषांचे आकार, यामुळे पौराणिक नाटकातील अवजडपणा निश्चित नाहीसा झाला होता. आपल्या-

कडे नाटकातील छोट्या छोट्या घटकांमध्ये विशेष प्राविण्य संपादन करण्याचे यत्न अलीकडे सुरू झालेले दिसतात. कु. सुखटणकर या अभिनेत्री असल्या तरी त्यांनी या शाखेकडे सतत लक्ष पुरवावे अशी एक नम्र सूचना.

'रंगायन'च्या सौजन्याने 'नाट्यमंदार'ने सादर केलेला 'माता द्रौपदी' या नाटकाचा प्रयोग हा मराठी प्रेक्षकांच्या नाट्यजीवनातील लक्षणीय अनुभव मानला जाईल. किंबहुना पौराणिकतेच्या निमित्ताने केवळ भपकेबाज, संगीत, नयनरम्य नाटक नावाची करमणूक सादर करणाऱ्या मराठी पौराणिक नाटकाला श्री. विद्याधर पुंडलिकांनी एक निश्चित नवे वळण लावले आहे. कोणत्याही राष्ट्रीय महाकाव्यातील कथानक हे घटनांच्या पलीकडील मूलभूत मानवी अनुभव व्यक्त करणारे असते. महाभारताचे मर्म श्री. पुंडलिकांनी ओळखले आहे. महाभारतातील पात्रांचे मानवी रूप आणि त्यांची प्रतिकात्मक प्रतिमा यांतील नाट्यरूप संशोधिणारे 'माता द्रौपदी' हे श्री. पुंडलिकांचे नाटक हा मराठी पौराणिक नाटकाचा नवा मानदंड मानावा लागेल. या नाटकातील मर्म नेमके ओळखून ते समर्थपणे सादर करणाऱ्या दिग्दर्शिका सौ. विजया मेहता यांनीच एकेकाळी केवळ पाश्चात्य वळणाची नाटके सादर करण्याविषयीचे आरोप सहन केले आहेत, परंतु आज हें सिद्ध झाले आहे, की Ionesco चे 'Chairs'सारखे 'न-नाट्य' सादर करणारी दिग्दर्शिका 'माता द्रौपदी'सारखं पौराणिक नाटकही मर्मज्ञतेने सादर करू शकते. उणीव होती ती खऱ्या अर्थाने समृद्ध अनुभव व्यक्त करणाऱ्या 'भारतीय' नाटकाची. ती 'माता द्रौपदी'ने भरून काढली आहे. नाटककार श्री. पुंडलीक, दिग्दर्शिका सौ. मेहता व सचालक श्री. शिंदे यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

पण, (हा 'पण' फार मोठा आहे) मराठी प्रेक्षकांचेही असेच अभिनंदन करता येईल का?

□ □

# ग्रज्युएट

## दर्जेदार लेखन, उत्कृष्ट प्रयोग

दिवे मालवतात—पिस्तुलाचा आवाज कानी पडतो—आय हेट यू. आय हेट यू. एक स्त्री किंचाळते. पडदा उघडतो. नाटक सुरू होते—

कुत्र्याच्या भुंकण्याच्या आवाजाची ॲलर्जी असलेल्या एका साहेबमजकुराचे घर. कुत्रे भुंकले, की साहेबाचे माथे भडकते व साहेब मजकूर कुत्र्याला गोळी घालतात. असे छप्पन दारचे व पाच घरचे कुत्रे साहेबांनी ठार मारले असतात. अर्थात कुत्रें मारल्यावर मात्र सुसंस्कृत साहेब—'सीमां'चे रक्षणासाठी बळी पडलेल्या' त्या कुत्र्याला आदरांजली वाहण्यास—त्याची शानदार अत्यंयात्रा काढण्याला आणि स्मृती-

प्रीत्यर्थ त्याचा फोटो घरातल्या भिंतीवर लावण्यास विसरत नाही.

साहेबांची ही एक तऱ्हा तर बाईसाहेबांची दुसरीच. बाईसाहेबांना कुत्री पाळण्याचा भलताच षौक. दरवेळी त्या ' न भुंकणारा कुत्रा ' आणतात. कुत्रा काही भुंकल्याशिवाय रहात नाही—साहेब त्याला मारल्याशिवाय रहात नाही. अशारीतीने साहेबाच्या कोपाला एकसष्टावा कुत्रा बळी पडतो आणि साहेबाच्या हिंस्र आणि अमानुष वृत्तीविरुद्ध बाईसाहेब आणि नोकर फडके बंड पुकारतात. शीत युद्धास सुरुवात होते तेव्हा ' शांततामय सलोख्यासाठी ' शिखर परिषद आयोजित केली जाते. परीषदेच्या अध्यक्षपदी असतात, साहेबांवर छप्पन कुत्रे ठार मारल्याच्या इतरांनी भरलेल्या केसेस लढवणारे साहेबांचेच वकील. सदर वकीलमहाशय साहेबांच्या मदतीवरच अवलंबून असल्याने आणि प्रतिपक्षही साहेबांच्या मदतीवरच जगत असल्याने—' आखील मानव जातीचे ' हित लक्षात घेऊन—एखाद्या सुशिक्षित इसमासच न भुंकणाऱ्या कुत्र्याच्या नोकरीवर घ्यावे असा असा समझोता केला जातो.

जाहिरात दिली जाते—इंटरव्ह्युला कैक ग्रॅज्युएटस येतात. पैकी निफाडे नामक इसमाला पी. ए. ची जागा देऊन 'बंडखोरीबद्दल ' फडक्याला नोकरीवरून काढून टाकण्यात येते. दुसऱ्या एका तरुणाला न भुंकणाऱ्या मानवी कुत्र्याचे काम करण्यासाठी भरपूर पगारावर नोकरी दिली जाते. ग्रॅज्युएट असलेल्या त्या मानवी कुत्र्याचे लाडके नाव ' ग्रॅट ' ठेवण्यात येते. पुढे पाळून षौकीन साहेब डॉगफाईटिंगमध्ये ग्रॅटचे नाव नोंदवतो. पण जातीने मनुष्य असल्याने ग्रॅटला डॉगफाईटिंगमध्ये प्रवेश मिळत नाहीत, तेव्हा इरेला पेटलेला साहेब स्पर्धेतील यशस्वी कुत्र्याला आणवून त्यांच्या बरोबर ग्रॅटची झुंज लावतो. खरा कुत्रा झुंजताना भुंकू लागतो, तेव्हा तत्काळ साहेब त्याला गोळी घालतो—ग्रॅट विजयी होतो. जखमांनी रक्तबंबाळ झालेल्या ग्रॅटच्या कौतुकात साहेब दंग असतो, तेव्हा कुत्र्याचे विष भिनल्याने ग्रॅट खरोखरीच भुंकू लागतो आणि साहेब संतापून त्याला गोळी घालतो. ग्रॅट मरतो. ' सीमां' चे रक्षणासाठी बळी पडलेल्या ग्रॅटला आदरांजली वाहण्यासाठी साहेब नतमस्तक होऊन रहातो—पडदा पडतो.

अशा थोड्याश्या चमत्कारिक परंतु आशयगर्भ नाट्यकथेला दिलीप खांडेकरांनी दोन अंकात बांधेसुदपणे गुंफले आहे. सदर नाटकाचे दोन प्रयोग अमृत नाट्यभारतीच्या तरुण शिष्यगणांनी साहीत्यसंघ मंदिरात पाच एप्रिलला बहुरूपी नाट्यसंस्थेतर्फे सादर केले.

इतस्तत: विखुरलेल्या प्रेक्षकांच्या तुरळक पुंजक्यांनी संघमंदिरातील रित्या खुर्च्यांची ओसाडता जास्त भयाण वाटत होती. कुणा येरागबाळ्यांचा प्रयोग पाहणे कपाळी येणार या जाणीवेने मठ्ठासारखा बसून राहिलो होतो. पण जसजसे नाटक फुलू लागले तसतसे प्रसंगाप्रसंगातून प्रचलित राजकारणाच्या केलेल्या मर्मभेदक विडंबनामुळे सदर नाटक कायम आठवणीसाठी राहून गेले. नाट्यलेखनाचे तंत्र खांडेकरांनी

चांगलेच आत्मसात केलेले दिसत होते. नाटकावरची त्यांची पकड सुरुवातीपासून अखेरपर्यंत कायम राहिली होती. संबंध नाटकात काढता येण्याजोगा दोष एकच तो म्हणजे प्रेक्षकांना 'रिलीफ' देण्यासाठी दुसऱ्या अंकांत बाईसाहेबांच्या मैत्रिणी विनाकरण येऊन जातात. संपूर्ण नाटकात तेवढा एकच प्रसंग कृत्रिम आणि ठिगळ लावल्यासारखा वाटला आणि माझ्या दृष्टीने सारे नाटकच निराशवादी होते. पण तो दोष नाटककाराच्या माथी मारण्याऐवजी प्रस्थापित समाजात वैफल्याने ग्रासलेल्या नाटककाराच्या माथी मारणेच योग्य–कारण, अखेर लेखक बिचारा त्यांचाच प्रतिनिधी !

अच्युत देशिंगकर यांनी नाटकाचे दिग्दर्शन करताना परंपरागत दिग्दर्शनाचा संपूर्ण त्याग करून नवनाट्याची सारी आधुनिक तंत्रे वापरली होती. नाटकावर त्यांनी घेतलेली मेहनत संपूर्ण फलदायी ठरली. पात्रांच्या हालचालीत विस्कळीत-पणा नव्हताच पण विशेष म्हणजे प्रॉम्प्टिगही अजिबात नव्हते. त्यांनी स्वत: ग्रँटच्या भूमिकेचे वेअरिंगही सातत्याने सांभाळले होते. बाईसाहेब झालेल्या कुंदा निरगुडकर–साहेब बनलेले अशोक साठे–फडके झालेले वसंत डेग्वेकर बेकार तरुण बनलेले मोहन वैद्य आणि नाफडे झालेले शिरीष कर्णिक आपापल्या भूमिकांना आपापल्या व्यक्तिमत्त्वासह फिट बसत होते. वकील बनलेल्या कमलाकर नाडकर्णींनी वकीलापेक्षा चार्ली चॅप्लीननेच काम अधिक केले खरे– पण नाटकाचा बेरंग न करता. कांचन कीर्तीकर आणि परिमल सावंत यांनी घेतलेली मेहनत मात्र बाई-साहेबांच्या मैत्रिणींच्या निर्जीव भूमिकेमुळे वाया गेली.

नाटकाचे नेपथ्य केवळ चार चहाच्या खोकड्यांपासून दिलीप खांडेकर आणि सुरेश हरवंदे यांनी कल्पकतेने बनवले होते. नंदकुमार आठवले आणि अशोक साठे यांची प्रकाश योजना मात्र विशेष परिणाम भासली नाही कदाचित बॅकग्राऊंडच्या काळ्या पडद्याचा परिणाम असावा. मोहन वैद्य आणि सुखींनी ध्वनीसंकलनात तीच तीच रेकॉर्ड सतत वापरली. निदान शेवटच्या डॉग फाइटिंगच्या क्लायमेक्सच्या वेळी तरी प्रकाश योजना आणि ध्वनींचा परिणाम प्रखरतेने व्हावयास पाहिजे होता. आणखी एक विशेष म्हणजे पात्रांचा मेकप कांचन कीर्तीकरांनी केला होता. मेकप करणाऱ्या त्या बहुधा पहिल्याच स्त्री असाव्यात. खटकलेली गोष्ट म्हणजे नेपथ्य बदलण्याची. नेपथ्य बदलण्याचा कार्यक्रम प्रेक्षकांसमोर उरकून नाटकाची कंटीन्युटी तोडण्यात काय मिळवले ते मात्र समजले नाही.

अशा या ग्रॅज्युएट आणि तत्सम नाटकांचे प्रयोग सातत्याने झाले, तर प्रेक्षकांची अभिरुचीही तयार करता येईल. मात्र त्यासाठी सरकारी अनुदानाची झाकली मूठ मात्र उघडली पाहिजे.

**–अनील बर्वे**

शरद गोखले

# चित्रपट

## एकटा जीव !

वसंत सबनीस कथा लिहायला बसले असताना या कथेचा नायक शाहीर दादा कोंडके आहे याची खूणगाठ मनी असल्याने कथा विषय आणि चित्रपट याला काही स्वाभाविक मर्यादा पडल्या आहेत. या मर्यादांचा एक भाग म्हणून सोंगाड्या-मधील नाम्या आणि या चित्रपटातील सदाशिव यांच्यामध्ये विलक्षण साम्य आढळते.

भगवंतराव हे एक कारखानदार. सदाशिव हा त्यांचा मुलगा. तो दम्यासारख्या विकाराने आजारी असल्याने सर्व उपाय थकल्यावर एका वैद्याच्या सल्ल्याने ते आपल्या मुलाला मेंढयांच्या संगतीत म्हणजेच एका धनगराच्या घरी ठेवतात. १९४५ साली ठेवलेल्या आपल्या या मुलाची त्यांना १९७० मध्ये अठवण येते. आणि आपल्या इतर मुलांच्या सल्ल्याप्रमाणे ते सदाशिव याला घरी आणतात. धनगराच्या घरी धनगरा-सारखा वाढलेला सदाशिव भगवंतरावच्या घरा-मध्ये त्यांचा मुलगा म्हणून येतो. वसंत सबनीस यांनी या घरात आलेल्या सदाशिवसाठी अनेक 'जागा' तयार करून ठेवल्या असून सदाशिवची भूमिका करणारे शाहीर दादा कोंडके, दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी, आणि संवादलेखक वसंत सबनीस या तिघांनीही या जागा जबरदस्त लढव-ल्याने त्याचा एकत्रित परिणाम आकर्षक होतो.

मनोरंजनाचा हेतू साध्य होतो. कथेच्या उत्तरार्धामध्ये म्हणजेच सदाशिवने पुरेसा गोंधळ घातल्यावर आणि त्याने भगवतरावांचे घर सोडल्यावर त्याला एका रहस्य-मय प्रकरणामध्ये गुंतवून अखेरीस पुन्हा धनगराच्या घरी आणून सोडला आहे. पोटच्या पोरापेक्षा भगवंतराव पैसा आणि प्रतिष्ठा यांना जास्त जपतात हे लक्षात आल्यावर सदाशिव धनगराच्या घरी रहाणे पसंत करतो.

चित्रपटाची मुख्य मदार दादा कोंडके यांच्यावर आहे. संपूर्ण चित्रपट त्यांच्या-भोवती गुंफण्यात आला आहे. सदाशिवचे हे काम दादा मनमोकळेपणे करतात. क्वचित प्रसंगी विशेषत: गीतांच्या प्रसंगी फाजील वाह्यातपणाही करतात. तथापि भूमिकेचे स्वरूप त्यांना समोर ठेऊन घेतले असल्याने भूमिका जिवंत करणे त्यांना सोपे गेले आहे. उषा चव्हाणला फारसा वाव नाही. शरद तळवळकर यांचा भगवंत-राव फारसा प्रभाव पाडू शकत नाही. खरं सांगायचं तर स्वत: शाहीर सोडले तर अन्य मंडळींना फारसा स्कोपही नाही. पुष्पा भोसले पल्लवीच्या भूमिकेची 'गरज' पूर्ण करते. परतु तशी ही भूमिका नगण्यच आहे. गोविंद कुलकर्णी यांनी दिग्दर्शक या नात्याने ठीक कामगिरी केली असली, तरी दादांना त्यांनी इतके मोकळे (!) सोडावयास नको होते. कथेचे चित्रीकरण त्यांनी कल्पकतेने केले असून, कथेचा वेगही चांगला सांभाळला आहे.

खेबूडकर आणि राम कदम ही पिंजराची जोडी येथे आढळते. दोघांची कामगिरी सर्वसाधारणपणे समाधानकारक आहे. दादा कोंडके यांचेही एक गीत चित्रपटामध्ये आहे. परंतु ते वाजवीपेक्षा जास्त चावट आहे. एकूण चार गीतांपैकी 'मानसापरीस मेंढरं बरी' कानाला बरे वाटते.

छायालेखन ध्वनिलेखन आणि निर्मिती या बाजू समाधानकारक आहेत. चित्र-पटाचे वितरण योग्य वेळी होत असल्याने ८ ते १० आठवड्यांचा सेफ रन या वेळी मिळत असला, तरी पुन्हा याच पद्धतीची व्यक्तिरेखा घेऊन रुपेरी पडद्यावर येणे, शाहीरांना धोकादायक ठरेल असे सुचवावेसे वाटते.



सर्व पढिक तत्वज्ञान जीवनातील समर प्रसंगाना स्वत्वाचे भान ठेवून तोंड देण्याला पुरेसे नाही. अशा वेळी कलाकाराच्या जीवनाकडे पाहून वाटू लागते की सामाजिक तत्वनिष्ठांची पोथी पुराणे न मानताही उमर खय्यामप्रमाणे तो जीवनाचा संप्रदायविहीन पुजारी बनू शकतो. जागीरदारांच्या निवेदनातून मधून मधून हळूच डोकावणारा हा उमर खय्याम मोठा विलोभनीय आहे.

अच्युतराव पटवर्धन

---

# संध्याकाळ

एक
वेधक
आत्मकथन

गजानन
जागीरदार

---

राजहंस
प्रकाशन

मूल्य
दहा रुपये

---

 पृष्ठ २३ वरून

भाषा-शिक्षण हे व्याकरणापासून सुरू न करता संभाषण पद्धतीनं, फिल्मस दाखवून, ध्वनिमुद्रित संभाषणं ऐकवून दिलं जातं. बाजारात गेलात तर बोलावं कसं, कुणाकडे जेवायला गेलात तर कसं वागावं, बस-मेट्रो-रेल्वेच्या प्रवासात काय माहितीची आवश्यकता असते, तसंच कुटुंबातील दैनंदिन घटनांची माहिती या व अशा तऱ्हानी फ्रेंच भाषेशी ओळख करून दिली जाते.

सहज गंमत आठवली हं. रंगीत स्लाईडस्च्या साहाय्यानं जे धडे शिकवले जात नं त्यात थिबो नावाच्या कुटुंबाचा दिनक्रम दाखवला व सांगितला जात असे. तीच तीच नावं व तेच कुटुंब ऐकूनऐकून इतका कंटाळा आला बघ दहा आठवड्यांमध्ये की विचारू नकोस. हे काल्पनिक कुटुंब पॅरिसमध्ये रहाणारं असे बरं का. एके दिवशी आमच्या रेस्टॉरंटमध्ये दुपारी जेवताजेवता सहज याच विषयावर गप्पा वळल्या. समोरच आमच्या वर्गातील एक पाकिस्तानी गृहस्थ श्री. मंझील म्हणतात, ' खरंच बुवा मीही कंटाळलो हं हे थिबो नाव -ऐकून. पॅरिसला गेल्यावर खरंच कुणी थिबो नावाचं आढळलं तर अगदी गोळी घालीन. ' फारच तिखट झाली नाही का ही प्रतिक्रिया !

सकाळी ८ ते ९ लॅबोरेटरीतील तास. भाषेचे उच्चार स्वच्छ व योग्य व्हावेत यासाठी ध्वनिमुद्रित वाक्यं ऐकणे व उच्चारणे हे शिक्षण असे. प्रत्येकाला स्वतंत्र केबीन असे. सर्व केबिन्सवर वर्गशिक्षकाची जागरूक नजर असे. दुपारीही १ ते २, हेच शिक्षण. नंतर वर्गातील शिक्षणात चित्रांच्या साहाय्यानं दुसऱ्या एक प्रोफेसर-मादाम होल्झेर या फार प्रभावीपणानं शिकवत असत. वयानं तिशीच्या आत असलेल्या या बाई फार बुद्धिमान, हजरजबाबी, आपल्या कामात वाकबगार होत्या वर्गामध्ये सुमारे वीस-बावीस राष्ट्रांचे नागरीक. नायजेरिया, इंग्लंड, सीरिया, हाँग-काँग, जर्मनी, अमेरिका, इराक, स्पेन, व्हेनिझुएला, ऑस्ट्रेलिया, लेबनॉन, तुर्कस्तान, जपान अशी सरमिसळ होती. अख्ख्या युनिव्हर्सिटीत मीच एकटी भारतीय होते. बहुतेक जण आपापल्या देशातून शिष्यवृत्त्या मिळवून आले होते.

तुला नवल वाटेल, पण शाळांमधील लहान वयाचे विद्यार्थी जसे दबकून-घाबरून वावरतात नं वर्गात तसे आमच्या वर्गातही आम्ही मोठमोठ्या वयांची माणसं या फटाकड्या, बुद्धिवान प्रोफेसरांना बिचकून होतो. संपूर्ण वर्गभर देवीजी भिर-भिरत असायच्या. विसांपैकी एकही विद्यार्थी बाईंच्या प्रश्नांच्या फैरीतून सुटायचा नाही. फ्रेंचमध्ये शुद्धलेखन, वाचन, फळ्यावर लिहिणं वगैरे करताना खरंच शाळेची आठवण यायची. थोडी भीड चेपली नि मग माझी स्पॅनिश मैत्रिण मादाम आरेगी, जपानी मित्र श्री. ओताके, ज्यांची न् माझी वर्गात कधीच कुंडली जमली नाही ते ऑस्ट्रेलियन गृहस्थ श्री. रिचर्ड आणि मी यांचे हात वर असायचे नेहमी. फळ्यावर

शुद्धलेखन लिहिण्यासाठी, वाचनासाठी. अस्मादिक वर्गांत मादाम निर्मला नावानंच प्रसिद्ध होत्या. कारण पुरंदरे नाव या मंडळींच्या जिभेवर फारच वेगळं वाटतं असं लक्षात आल्यावर हेच नाव सुटसुटीत वाटायला लागलं.

सांगायचं कारण की सकाळी ८ ते ११॥ पर्यंत हे दोनही वर्ग चालत. जेवणाची सुटी दुपारी १॥ पर्यंत. नंतरचा कार्यक्रम सकाळसारखाच. तो दुपारी ४॥ पर्यंत. जेवणासाठी महिन्याची कूपन्स वहुतेकांनी काढलेली असत. संपूर्ण फ्रान्सभर सवलतीच्या दरात भोजनाची विद्यार्थ्यांसाठी, कामगारांसाठी सोय आहे. मीही माझं जेवण रेस्टॉरंटमध्येच घेत असे. यानिमित्तानं अनेक इतर वर्गांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींची ओळख होत असे. सवलतींच्या दरात आरोग्याला आवश्यक त्या काळजीनं बनवलेलं जेवण मिळत असल्यामुळे फारच कमी लोक दुपारच्या जेवणासाठी घरी जातात.

जेवण झाल्यावर कॉफीपान ही फ्रान्समधील आवश्यक व सवयीची गोष्ट. काळी कॉफी. रेस्टॉरंटला लागूनच जवळपास ही कॉफीगृहं असतात. आमच्या कॉलेजच्या समोरचं कॉफीगृह तळघरामध्येच आहे. तेथील सजावट ही खलाशी जीवनाची आठवण यावी अशी. खुर्च्या म्हणजे मोठमोठ्या वृक्षांच्या लाकडांचे ओंडके, टेबलही असंच, मात्र टेलिव्हिजन, खेळांची साधनं असतात हं. जेवणानंतरच्या सुटीत किंवा कॉलेज संपल्यानंतरही कितीतरी लोक गटागटांनी गप्पा मारत, अभ्यास करत, टेलिव्हिजन पहात, कॉफी किंवा इतर पेयांचा आस्वाद घेत बसलेले असायचे. मादाम आरेगी, मि. ओताके यांच्याबरोबर कितीदा तरी गृहपाठासाठी आम्ही उशीरपर्यंत बसलेलो असायचो. किती किती वर्षांनंतर ह्या शालेय जीवनाचा पुन्हा अनुभव घेत होते मी.

अधून मधून आमच्या प्रोफेसर वर्गातल्या विद्यार्थ्यांना आपापल्या देशाची माहिती फ्रेंचमधून सांगायला लावत. फळ्यावर जसा जमेल तसा नकाशा काढून प्रत्येकजण माहिती सांगायचा प्रयत्न करी. प्रश्नोत्तरं होत. मी भारताची माहिती सांगण्यासाठी उशीरात उशीराची तारीख मागून घेतली. जास्तीत जास्त आकर्षक रीतीनं ही माहिती सांगावी असा माझा विचार. पुण्याला मुद्दामहून काढलेल्या रंगीत स्लाइडस मला मिळण्याची वाट पहात होते. अगदी वेळेवर मिळाल्या बघ. मग पार्श्वसंगीत म्हणून बरोबर नेलेलं सतारीचं ध्वनिमुद्रण लावलं, फळ्यावर भारताचा नकाशा लावला व रंगीत स्लाईडसच्या साहाय्यानं माहिती सांगायला सुरुवात केली. शेजारच्या वर्गातले विद्यार्थी येऊन बसले. इतका कार्यक्रम रंगला, की विचारू नकोस. माझी धडपड पाहून प्रोफेसर इतक्या खूष झाल्या म्हणतोस.

खूप प्रश्न विचारले सर्वांनी.

(क्रमशः)

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे यथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

एकीकडे पुण्यामुंबईत वाढत्या कारखानदारीमुळे
दूषित हवेचा प्रश्न निर्माण होतोय–
नासिक परिसरांत जमिनीचे भाव कडाडताहेत
मराठवाड्याच्या नशिबी मात्र वैराण माळावरली मोकळी हवा!
अर्धा कोट जनतेची हुकमी बाजारपेठ
एवढीच राज्यकर्त्यांच्या लेखी मराठवाड्याची किंमत असावी !
एरवी कृषी-विद्यापीठ आंदोलन एवढे भडकतेच ना !
औरंगाबादहून हद्दपार होता होता
माणूस प्रतिनिधी अनिल बर्वे यांनी
या आंदोलनाचा घेतलेला एक तीक्ष्ण वेध–
सामंतशाहीने
आणि
देशी वसाहतवादाने
घेतलेला निर्घृण बळी

# मराठवाडा

पुढील अंकी